# नग्न देवता

## साहित्यिक आणि कम्युनिस्ट पार्टी

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
क्र. ११९६५

लेखक : हॉवर्ड फास्ट

अनुवादक : माधव लिमये

REFBK-0010268
REFBK-0010268

कॉन्टिनेन्टल प्रकाशन : पुणें



# नग्नदेवता

## लेखक आणि कम्युनिस्ट पार्टी

लेखक: हॉवर्ड फास्ट

अनुवादक: माधव लिमये

# नग्न देवता

## साहित्यिक आणि कम्युनिस्ट पार्टी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २८८०६१ वि: निबंध
क्रमांक ११८६ नों: दि: १७/११/८८

लेखक : हॉवर्ड फास्ट

अनुवादक : माधव लिमये

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०२९८
ग्रं. क्र.
REFBK-0010268
REFBK-0010268

कॉन्टिनेन्टल प्रकाशन : पुणें

प्रकाशक :
**अ. अं. कुलकर्णी,**
कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
टिळक रोड, पुणें २.

सर्व हक्क सुरक्षित
प्रथमावृत्ति : ऑक्टोबर १९५९
**किंमत : दोन रुपये**

मुद्रक :
**हरि महादेव गद्रे,**
जनवाणी प्रिंटिंग प्रेस,
४५ बुधवार, पुणें २.

९८।।-

# निवेदन

१९१७ सालीं रशियांत राज्यक्रान्ति होऊन साम्यवादाची व कामगार-राज्याची द्वाही फिरल्याला आतां चाळीस वर्षांच्या वर काळ लोटून गेला आहे. तरीहि रशियाविषयीं सत्य परिस्थिति समजावून घेण्याविषयींचें जगांतील जनतेचें कुतूहल जरादेखील कमी झालेलें नाहीं; आणि म्हणूनच रशिया किंवा ज्या साम्यवादी विचारसरणीचें रशिया प्रतीक समजला जातो त्या साम्यवादासंबंधीं उलटसुलट मतें व्यक्त करणारें वाङ्मय फार मोठ्या प्रमाणांत प्रत्यहीं प्रसिद्ध होत असून तें मोठ्या चवीनें वाचलें जात आहे.

एक काळ असा होता कीं, जगांतील सर्वच देशांतील, आणि विशेषत: भारतासारख्या मागासलेल्या आणि परतंत्र देशांतील सर्वसामान्य जनतेच्या मनांत रशियाविषयीं आपलेपणाची आणि आदराचीच भावना प्रकर्षानें वास करीत होती. त्यामुळें रशिया किंवा कम्युनिझम् यांविषयीं प्रतिकूल विचार व्यक्त करणाऱ्या वाङ्मयाचा अधिक्षेप केला जाई; " भांडवलशाही प्रचाराचा नमुना " म्हणूनच त्याची संभावना केली जात असे.

परंतु रशियांतील " कामगार-राज्या "च्या अधिकाधिक बातम्या जसजशा बाहेर येऊं लागल्या, कामगारांच्या नांवावर कम्युनिस्ट पक्षानें प्रस्थापित केलेली स्वत:ची हुकूमशाही आणि त्या हुकूमशाहीच्या जोरावर चालविलेली निर्घृण दडपशाही, जनतेच्या स्वातंत्र्याचा तेथें झालेला संकोच, खऱ्या क्रांतिकारकांची लावण्यांत आलेली वासलात, या सर्व गोष्टी उजेडांत येऊं लागल्यावर रशियांतील घडामोडींकडे विचारवंत साशंकतेनें बघूं लागले. रशियाविरोधी येणाऱ्या सर्व बातम्या आणि प्रसिद्ध होणारें सर्व वाङ्मय हा केवळ " भांडवलशाही प्रचार " आहे असें म्हणून भागणार नाहीं याची कबुली अनेकांना द्यावी लागली. त्यांतच बॉरिस सुव्हारीन, मॅक्स ईस्टमन, आर्थर कोइस्लर, स्टीफन स्पेंडर इत्यादि एके काळच्या कट्टर कम्युनिस्टांचीच कम्युनिझमविषयीं भ्रमनिरास करणारीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं. त्यांच्या लिखाणाला अनुभवाची झालर होती. त्यांच्यापैकीं अनेकांनीं कम्युनिस्ट पक्षाचें प्रत्यक्ष काम केलें होतें, त्यामुळें त्यांच्या निवेदनांबद्दल संशय घेणें

शक्य नव्हतें. "गॉड दॅट फेल्ड"–( न पावलेला देव ) सारख्या पुस्तकांनीं विचारवंतांच्या जगांत खूपच खळबळ उडवून दिली.

परंतु कम्युनिझम्चें वैशिष्ट्य असें कीं, एकीकडे कम्युनिझम्संबंधींचीं अशा तऱ्हेचीं वस्तुस्थितिनिदर्शक पुस्तकें प्रसिद्ध होत असतांनाहि कम्युनिझम्च्या संपूर्ण आहारीं गेलेले कांहीं "बुद्धिवादी" कम्युनिस्ट विचारसरणीचें अट्टाहासानें समर्थन करण्याचा आटापिटा करीत होते. भूतपूर्व कम्युनिस्टांनीं आपल्या लिखाणांतून उपस्थित केलेल्या मुद्द्यांना समर्पक उत्तरें देण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं किंवा त्याविषयीं शास्त्रशुद्ध विवेचन करण्याऐवजीं त्यांच्यावर हेत्वारोप करून वेळ मारून नेण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत होते. त्यांनीं उजेडांत आणलेल्या घटना नाकारीत होते किंवा त्यांच्यावर 'भांडवलशाही-धार्जिणे', 'प्रतिगामी', 'जनतेचे शत्रू' अशा नेहमींच्या शेलक्या शिव्यांचा वर्षाव करून जनतेपासून सत्य लपवून ठेवण्याची ते धडपड करीत होते.

परंतु सोव्हिएट यूनियनमधील कम्युनिस्ट पक्षाच्या विसाव्या कॉंग्रेसमध्यें स्टॅलिनचे वारसदार निकिता कुश्चेव्ह यांनीं जें 'भयानक' भाषण केलें त्यामुळें कम्युनिस्ट बुद्धिवाद्यांचा सारा आधारच उखडला गेला. आजपर्यंत कम्युनिस्ट राजवटीवर किंवा स्टॅलिनच्या झोटिंगशाहीवर करण्यांत आलेले आरोप आणि त्या संदर्भांत प्रसिद्ध झालेली माहिती शंभर टक्के खरी होती, इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष वस्तुस्थिति त्याहूनहि विदारक होती याची स्पष्ट कबुली कुश्चेव्हनें पुराव्यानिशीं देऊन टाकली. मानवी प्रतिष्ठेला लाज आणणाऱ्या कम्युनिस्टांच्या ज्या अनेक कृत्यांची इतके दिवस नुसती कुजबूज ऐकूं येत होती त्यांना कम्युनिस्ट जगांतील कर्तुमकर्तुम् शक्ति असलेल्या अधिकारी व्यक्तीनें दुजोरा दिल्यामुळें त्यांच्या खरेपणाविषयीं शंका घेण्याला जागाच उरली नाहीं.

कुश्चेव्हच्या त्या भाषणानें कम्युनिस्ट जगांत मोठ्याच उलथापालथी घडून आल्या. अनेक विचारवंत पक्ष सोडून गेले, इतकेंच नव्हे तर त्यांनीं कम्युनिस्टांच्या पाशवी सत्तेविरुद्ध उघड बंड पुकारलें. हंगेरीसारख्या कम्युनिस्ट पक्ष सत्तारूढ असलेल्या देशांत याचें पर्यवसान जनतेच्या प्रत्यक्ष उठावांत झालें; तर ज्या देशांत कम्युनिस्ट अधिकारावर नव्हते त्या देशांत या असंतोषाचें पर्यवसान वैचारिक बंडखोरींत झालें.

अमेरिकेंतील विख्यात कादंबरीकार हॉवर्ड फास्ट याच्या या पुस्तकाची पार्श्वभूमि हीच आहे. हॉवर्ड फास्ट याचा जन्म एका अत्यंत गरीब कुळांत झाला. त्याची आई लहानपणींच वारली. वडील पेशानें कामगार असले तरी बेकारीच्या संकटाला त्यांना सतत तोंड द्यावें लागे. अशा परिस्थितींत छोटा हॉवर्ड आपल्या आळींतील मवाल्यांच्या अड्डयांत सांपडला नसता तरच नवल. पण सुदैवानें त्याला वाचनाचें वेड लागलें आणि अट्टल गुन्हेगार बनून फांशीवर जाण्याऐवजीं किंवा जन्मभर खडी फोडीत बसण्या-ऐवजीं तो एक महान् साहित्यिक म्हणून उदयास आला.

हॉवर्ड फास्टला जीवनांत अतिशय खडतर प्रसंगांना तोंड द्यावें लागलें. अनेक लहानसहान नोकऱ्या त्यानें पत्करल्या. त्यासाठीं पायपीटाहि खूप केली. किंबहुना एखादी नोकरी धरावी, चार पैसे गांठीं जमले कीं ती सोडून फिरून भ्रमंती करावी, पैसे संपले कीं नाइलाजानें पुन्हा दुसरी एखादी नोकरी पत्करावी, असा त्याचा क्रम अनेक वर्षें चालू होता. अखेर १९३६ सालीं त्यानें शारीरिक श्रमाच्या या नोकऱ्यांना कायमचा रामराम ठोकून लेखनव्यवसायावरच आपली उपजीविका करण्याचा निर्णय घेतला. त्यापूर्वीं १९३३ सालीं 'टू व्हॅलीज्' ही त्याची पहिली कादंबरी प्रसिद्ध झाली होती. १९३७ सालीं मात्र "दि चिल्ड्रेन", "सॅम स्लोअन" आणि "प्लेस इन् द सिटी" या त्याच्या कादंबऱ्या एकामागोमाग प्रसिद्ध झाल्या आणि त्यांनीं त्याला खूपच प्रसिद्धि मिळवून दिली.

हॉवर्ड फास्टनें स्वतः दारिद्र्याचा अनुभव घेतला होता. समाजांतील पिळल्या जाणाऱ्या वर्गाबद्दल त्याला विशेष आस्था होती. कारण तो स्वतःच त्या वर्गाचा घटक होता. त्याच्या या प्रवृत्तींना प्रवासांत आलेल्या विविध अनुभवांची जोड मिळाल्यामुळें त्याचें लिखाण अत्यंत समृद्ध असें झालें. फास्ट न्यूयॉर्कमधील एका ग्रंथालयांत पट्टेवाल्याचें काम करीत असतांना त्याच ग्रंथालयांत ग्रंथपालाचें काम करणाऱ्या एका बाईनें प्रथम त्याचा साम्यवादी वाङ्मयाशीं परिचय करून दिला. तो कम्युनिस्ट विचारसरणीच्या लेखकांच्या बैठकींना जाऊं लागला. हॉवर्ड फास्टच्या कम्युनिस्ट पार्टी प्रवेशाची ती पहिली पायरी होती असें म्हटलें तरी चालेल.

पण पुढें हॉवर्ड फास्ट कम्युनिस्ट पक्षाचा सभासद झाला. पक्षासाठीं

त्यानें अनंत हाल सोसले. त्याला कारावासहि पत्करावा लागला. पक्षामुळें त्याला रशियांत खूप मानमान्यता मिळाली तरीदेखील तो कम्युनिस्ट पार्टीशीं समरस असा कधींच होऊं शकला नाहीं. कम्युनिस्ट विचारसरणीपेक्षां कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यपद्धतींतील अनेक गोष्टी त्याला खटकत; त्यामुळें तो बेचैन होऊन जाई. पण त्याच्या मनांत असा वैचारिक संघर्ष सुरु झाला कीं, त्यापासून स्वतःची सोडवणूक करून घेण्यासाठीं तो स्वतःला पक्षाच्या कामांत अधिकच गुरफटून घेई.

त्याच्या या मानसिक संघर्षाची कहाणीच फास्टनें आपल्या या पुस्तकांत सांगितली आहे. स्वतःला बुद्धिवादी म्हणविणाऱ्या कम्युनिस्टांना कम्युनिस्ट पक्षाचे आदेश मानतांना स्वतःची बुद्धि गहाण कशी ठेवावी लागते, पददलितांची कैवारी म्हणविणारी कम्युनिस्ट पार्टी मानवतेला कलंक लावणाऱ्या गोष्टी अगदीं लीलेनें कशी करते, जगांतील सारे कम्युनिस्ट डोळ्यांवर कातडें ओढून त्याचें समर्थन कसे करतात; आणि स्वतःच्या बुद्धिवादाला जागून पक्षांत कोणीं अवघड प्रश्न उपस्थित केलेच तर त्याची 'भांडवलशाही मनोवृत्तीचा' म्हणून संभावना कशी केली जाते, तें फास्टनें स्वतःला आलेले अनेक अनुभव देऊन मोठ्या बहारदारपणें या पुस्तकांत विशद केलें आहे.

पण तरीहि हॉवर्ड फास्ट हा कुश्चेव्हचें विसाव्या कॉंग्रेसपुढील भाषण होईपर्यंत पक्षांत टिकून राहिला होता, इतकेंच नव्हे तर अमेरिकन कम्युनिस्ट पक्षांत त्याच्याविरुद्ध ज्या ज्या वेळीं वादळें उठविण्यांत आलीं त्या त्या वेळीं तो त्या सर्वांना पुरून उरला. पक्षांतून स्वतःची हकालपट्टी होऊं नये यासाठीं शेवटपर्यंत तो झगडला. पण कुश्चेव्हचें तें भाषण वाचल्याबरोबर मात्र त्यानें कम्युनिस्ट पार्टीचा त्याग केला. इतकेंच नव्हे तर कम्युनिस्ट पार्टी ज्या उदात्त आणि विशाल ध्येयांवर अधिष्ठित झाली आहे त्या ध्येयांची प्रतिष्ठा राखावयाची असेल, तर ती बरखास्त करून टाकली पाहिजे अशा निर्णयाला तो आला आणि अमेरिकन कम्युनिस्ट पार्टीसमोर त्यानें आपलें मत ठामपणें मांडलेंहि.

हॉवर्ड फास्टचा आक्षेप आहे तो मुख्यतः कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यपद्धतीवर. मार्क्सवाद किंवा साम्यवादी विचारसरणीशीं त्याचा तात्त्विक

मतभेद दिसत नाहीं; निदान या पुस्तकांत तरी त्यानें त्याचा ऊहापोह केलेला नाहीं.

कम्युनिझम्‌विरोधी जें वाङ्मय आज वैपुल्यानें प्रसिद्ध होत आहे त्यांत मार्क्सवादाचें किंवा साम्यवादी तत्त्वप्रणालीचें तात्त्विक आणि सैद्धान्तिक खंडन करणारें वाङ्मयहि पुष्कळ आहे. मार्क्स, एंगल्स, लेनिन यांनीं प्रतिपादिलेल्या सिद्धान्तांवरच अशा लेखकांनीं आक्षेप घेतले आहेत.

हॉवर्ड फास्टच्या ' नेकेड गॉड 'मधील प्रतिपादनाची भूमिका यापेक्षां निराळी आहे. मार्क्सवादी सिद्धान्तांचा प्रपंच करण्याचें त्यानें टाळलें आहे. परंतु मार्क्सच्या सिद्धान्तांचे कम्युनिस्ट नेत्यांनीं कसे धिंडवडे काढले आणि कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रानुवर्ती संघटनेचा तो अपरिहार्य परिपाक कसा आहे त्याचेंच विवरण फास्टनें आपल्या पुस्तकांत केलें आहे, आणि हें विवेचन लेखकानें प्रत्यक्ष अनुभवलेल्या प्रत्यक्ष प्रसंगांवर आधारलेलें असल्यामुळें तें सजीव आणि रसरशीत असें झालें आहे.

हॉवर्ड फास्टनें कम्युनिस्ट पार्टीवर जे आक्षेप घेतले आहेत किंवा जी माहिती उजेडांत आणली आहे त्यांत वस्तुतः नवीन असें कांहीं नाहीं. परंतु अनेक वर्षें कम्युनिस्ट पार्टीचें काम केलेला, आणि कम्युनिस्टांवर घेण्यांत येणाऱ्या आक्षेपांचें पोटतिडकीनें खंडन करणारा एक कट्टर कम्युनिस्टच ते आक्षेप उघडपणें करीत आहे आणि कांहीं प्रसंगांची अगदीं तपशीलवार नोंद करून या आक्षेपांचा खरेपणा शंकातीतपणें सिद्ध करीत आहे हेंच या पुस्तकाचें वैशिष्ट्य आहे.

कम्युनिस्टविरोधी वाङ्मय वाचतांना सर्वसामान्य वाचकाला नेहमीं असा प्रश्न पडतो कीं, कम्युनिस्ट पक्ष हा जर इतका भयानक आहे, त्यांत काम करतांना जर स्वतःशीं इतकी प्रतारणा करावी लागते, तर ही मंडळी वर्षानुवर्षें त्या संघटनेंत राहिलींच कशी ? आणि नुसती राहिली इतकेंच नव्हे तर कम्युनिस्ट पार्टीच्या प्रत्येक गोष्टीची ते हिरीरीनें तरफदारी तरी कशी करीत होते ? या शंकेला कम्युनिस्ट प्रचाराची जोड मिळाली म्हणजे हे कम्युनिस्टविरोधक " असंतुष्ट आत्मे " असले पाहिजेत, " भांडवलशाही प्रवृत्ति "च त्यांतून डोकावत असली पाहिजे, या कम्युनिस्टांकडून सुचविल्या जाणाऱ्या उत्तराचा पगडा मनावर बसूं लागतो.

हॉवर्ड फास्टनें या शंकेचें आपल्या निवेदनांत विस्तारपूर्वक विवेचन केलें आहे. त्याचें हें विवेचन संपूर्णपणें पटणारें नसलें तरी तें विचार करावयाला लावणारें खासच आहे. कम्युनिस्ट हा या बाबतींत स्वतःच निर्माण केलेल्या जाळ्यांत कसा गुरफटतो आणि मग त्याला कम्युनिस्ट पार्टीचा त्याग करणें कसें मुष्किल होऊन बसतें त्याचें फास्टनें एक नवेंच दर्शन आपल्या पुस्तकांत घडविलें आहे.

कम्युनिस्ट राज्यांत स्वतंत्र विचाराला अवसर असत नाहीं. व्यक्तीचें व्यक्तिमत्त्व गुदमरवून टाकणारें कम्युनिस्ट पार्टी हें एक षड्यंत्र आहे. आणि पार्टीच्या प्रमुखपदीं कोणीहि स्थानापन्न झाला तरी कम्युनिस्ट पक्षाच्या या स्वरूपांत बदल होत नाहीं हा अनुभव जगांतील सर्वच स्वतंत्र बुद्धीच्या विचारवंतांना आला आहे. कम्युनिस्ट तत्त्वप्रणालींतील सर्व दोषांचें खापर स्टॅलिनच्या पिसाटपणावर आणि कम्युनिस्ट देशांतील "व्यक्तिमाहात्म्य" माजविण्याच्या मनोवृत्तीवर फोडून भागणार नाहीं. लोकशाहीचा दावा करणाऱ्या पक्षांत एखाद्या व्यक्तीच्या हातीं इतकी कर्तुमकर्तुम् शक्ति एकवटतेच कशी आणि बुद्धिप्रामाण्य मानणारे कम्युनिस्ट एखाद्या व्यक्तीचे देव्हारे माजविण्याइतके आंधळे बनतात तरी कसे, या मूलभूत प्रश्नालाच हॉवर्ड फास्टनें हात घातला आहे. स्टॅलिनचीं अघोरी कृत्यें चव्हाट्यावर मांडणारा क्रुश्चेव्ह पुन्हा झपाट्यानें त्याच मार्गाकडे कसा चालला आहे तें दाखवून फास्ट म्हणतो कीं, 'कम्युनिस्ट पार्टीच बरखास्त करून टाकल्याशिवाय हें दुष्ट चक्र थांबणार नाहीं.'

वैचारिक गुलामगिरी ही केव्हांहि वाईटच. पण लेखकाला तर ती अधिकच असह्य होते. कारण, लेखकावर किंवा साहित्यिकावर जर वैचारिक बंधनें लादलीं, तर त्याच्या हातून मुळीं म्हणण्यासारखें लेखनच होऊं शकणार नाहीं. फास्ट म्हणतो कीं, 'एखाद्या कामगाराकडून त्याच्या मर्जीविरुद्ध तुम्ही चोपून काम करून घेऊं शकाल; फार काय, शास्त्रज्ञालादेखील तुम्ही सक्तीनें त्याचें संशोधन चालू ठेवायला भाग पाडूं शकाल. परंतु साहित्यिकांवर मात्र तुम्ही अमुकच लिही असें लादूं शकणार नाहीं.' रशिया किंवा रशियाच्या अंकित देशांतील वाङ्मयाचा दर्जा अलीकडे कमालीचा घसरला आहे तो यामुळेंच, असें दाखवून देण्याचा फास्टनें प्रयत्न केला आहे.

साहित्यिक हा मूलतःच सृजनशील असतो. त्याची साहित्यकृति हें त्या सृजनशीलतेचें प्रतीक असतें. आणि म्हणून आपल्या लिखाणावर बंधनें यावींत किंवा एखाद्या विशिष्ट हेतूसाठीं आपली लेखणी राबवली जावी हें त्याला सहन होत नाहीं. साहित्यिकाची स्वातंत्र्याकांक्षा पाशवी अत्याचारानेंहि मरूं शकत नाहीं, हें हंगेरीमधील उठावांत साहित्यिकांनीं जी महत्त्वाची कामगिरी बजावली त्यामुळें पुन्हा एकदां सिद्ध झालें आहे. लेखकाला थोडें जरी स्वातंत्र्य उपभोगूं दिलें तरी अंतीं तो पक्षाला घातक ठरल्याशिवाय राहणार नाहीं याची कम्युनिस्ट पुढाऱ्यांना बरोबर जाणीव असते असें फास्टनें दाखवून दिलें आहे. स्टॅलिनविरोधी जमाना सुरू झाल्याबरोबर "नॉट बाय ब्रेड अलोन" सारखें पुस्तक प्रसिद्ध होतें व तें निर्दाळून टाकण्यासाठीं स्वतः क्रुश्चेव्हला पुढें सरसावावें लागतें, यांतच साहित्यिकाच्या अपार सामर्थ्याचें मर्म सांठवलेलें आहे असें तो म्हणतो.

पण साहित्यिकांना शत्रु समजणाऱ्या कम्युनिस्ट पक्षांत साहित्यिकांचा उदोउदो केला जातो; जगभर त्यांना नाचविलें जातें ही विसंगति नाहीं का? हाडानें साहित्यिक असलेल्या फास्टला कम्युनिस्ट पार्टींत हा अनुभव पदोपदीं आला. साहित्यिक म्हणून त्याच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव होत असतांनाच पक्षाच्या बैठकींत त्याच्या लिखाणावर कडाक्याची टीका व्हावी, आणि त्यानें विशिष्ट शब्द वापरले किंवा एखाद्या पात्राचें स्वभावचित्र विशिष्ट तऱ्हेनें रेखाटलें म्हणून त्याला पक्षांतून अर्धचंद्र देण्याची धमकी देण्यापर्यंत पाळी यावी, असें अनेकवार घडलें आहे. या विसंगतीची फास्टनें केलेली छाननी विशेष वाचनीय आहे. स्वतःच्या मतप्रचारार्थ उपयोगी पडत असेल तोंपर्यंतच कम्युनिस्ट जगांत लेखकाचा उदोउदो होऊं शकतो. पण तो प्रस्थापित विचारांच्या चाकोरीबाहेर जातोसें दिसल्याबरोबर त्याचें अस्तित्वच संपुष्टांत आणलें जातें. ज्या देशांत कम्युनिस्ट पार्टी अधिकारारूढ असते तेथें अशा साहित्यिकाचें भौतिक अस्तित्वच नष्ट केलें जातें; पण जेथें कम्युनिस्ट पक्ष सत्ताधारी नसतो तेथें मात्र त्या साहित्यिकाला "भांडवलदारांचा भाट", "प्रतिगामी" असल्या शेलक्या शिव्यांनीं बदनाम केलें जातें किंवा कम्युनिस्ट जगांत त्याच्या लिखाणाचा मागमूसहि राहूं दिला जात नाहीं. ज्या हॉवर्ड फास्टचा रशियांत एवढा गुणगौरव होत होता,

आणि ज्याच्या पुस्तकाच्या लक्षावधि प्रती खपत होत्या त्या फास्टनें कम्युनिस्ट पार्टीचा राजीनामा दिल्याबरोबर त्याच्या बाबतींत रशियांतील सारा नूरच पालटून गेला. त्याला येणारीं सारीं पत्रें बंद झालीं, त्याच्या लिखाणावर होणारी उलटसुलट टीका थांबली, ग्रंथालयांतून त्याचीं पुस्तकें नाहींशीं झालीं, फार काय, त्याच्या नांवाचे सारे उल्लेखहि पुसले गेले. जणूं कांहीं हॉवर्ड फास्ट या नांवाची व्यक्ति कधीं होऊनच गेली नाहीं ! कम्युनिस्ट जगांतील "पोलादी पडद्या"च्या हकीकतींचा फास्ट आजवर इन्कार करीत होता; पण आतां त्याला स्वतःलाच तो अनुभवावा लागला. फास्टनें या साऱ्या प्रकाराचें वर्णन हृदय पिळवटून टाकणाऱ्या भाषेंत केलें आहे.

बुद्धिप्रामाण्याचा कैवार घेऊन कम्युनिस्ट हुकूमशाहीविरुद्ध उशिरां का होईना, पण बंडाचें निशाण उभारण्यांत हॉवर्ड फास्टनें फार मोठी कामगिरी बजावली आहे असेंच म्हटलें पाहिजे. विशेषतः कम्युनिस्ट जगांतील घटना नाकारून त्या आधारावर कम्युनिस्टांची तरफदारी करणारांच्या डोळ्यांत तर फास्टनें चांगलेंच अंजन घातलें आहे. स्वतःला बुद्धिवादी व विचारवंत म्हणविणाऱ्या कम्युनिस्टांच्या सहप्रवाशांची कम्युनिझम्‌च्या भुरळांतून सुटका करण्याच्या कामीं हॉवर्ड फास्टचें हें पुस्तक फार उपयुक्त ठरणार आहे.

कम्युनिस्टांच्या प्रत्येक गोष्टीचें समर्थन करणारा आणि वर तसें करतांना त्याला बुद्धिवादाचा आधार देऊं पाहणारांचा एक वर्ग हिंदुस्तानांतहि आहे. अशा परप्रत्ययनेय बुद्धीच्या लोकांना हॉवर्ड फास्टच्या पुस्तकामुळें विचारा-साठीं नवें खाद्य मिळाल्यावांचून राहणार नाहीं.

हिंदुस्थानांत १९२० सालीं कम्युनिस्ट पार्टीची स्थापना झाली. पण हिंदी कम्युनिस्ट पार्टी हा जागतिक कम्युनिझम्‌चाच एक भाग असल्यानें अन्य-देशीय कम्युनिस्ट पार्टींतील दोष हिंदी कम्युनिस्ट पार्टींतहि आढळून येतात आणि म्हणूनच हॉवर्ड फास्टनें तेथील कम्युनिस्ट पार्टीसंबंधीं केलेलें विवेचन हिंदी कम्युनिस्ट पार्टीलाहि तंतोतंत लागू पडतें. हॉवर्ड फास्टचें पुस्तक वाचतांना त्यांतील विवेचनाशीं वाचक चटकन् तादात्म्य पावतो तो यामुळेंच.

हॉवर्ड फास्ट याच्या पुस्तकाचा अनुवाद करण्याची परवानगी मला 'कॉंग्रेस फॉर कल्चरल फ्रीडम' या संस्थेच्या भारतीय शाखेचे चिटणीस

श्री. वसंतराव कर्णिक यांनीं मिळवून दिली. त्यामुळेंच कम्युनिस्ट कार्य-पद्धतीवर झगझगीत प्रकाश टाकणारे हें पुस्तक मराठी वाचकांना सादर करण्याची संधि मिळाली, त्याबद्दल मा श्री. कर्णिक यांचा आभारी आहें.

हॉवर्ड फास्ट हे विख्यात साहित्यिक आहेत. त्यांच्या ग्रंथाचा अनुवाद करण्याचें माझें धाडस कितपत यशस्वी झालें आहे तें मराठी वाचकांनींच ठरवावयाचें आहे. हॉवर्ड फास्ट यांच्या सर्वच्या सर्व पुस्तकाचा अनुवाद मीं केलेला नाहीं. ज्यामुळें पुस्तकाच्या मूळ गाभ्याला धक्का लागणार नाहीं असा कांहीं भाग मीं वगळला आहे. त्यामुळें मूळ पुस्तकापेक्षां या पुस्तकाच्या प्रकरणांतहि अपरिहार्यपणें कांहीं बदल झाले आहेत.

सीमा सत्याग्रहाच्या निमित्तानें बेल्लारीच्या तुरुंगांत असतांना मीं हा अनुवाद पुरा केला. जेमतेम मराठी सहावी-सातवीपर्यंत शिक्षण झालेल्या अनेक सत्याग्रहींनीं माझ्या अनुवादाच्या वह्या वाचल्या आहेत. अनुवाद करतांना राजकीय प्रवाहांची ओळख असणारा, रोजचीं वर्तमानपत्रें वाचणारा आणि मराठीचें थोडेंफार शिक्षण झालेला असा वाचकवर्ग माझ्या नजरेसमोर होता. माझे बहुतेक सत्याग्रही बंधु याच वर्गांत मोडणारे होते. त्यांना माझा हा अनुवाद आवडल्याचें त्यांनीं बोलून दाखवलें आहे. आणि तुरुंगांतील जीवनांत जे अकृत्रिम संबंध निर्माण होतात तें लक्षांत घेतां केवळ तोंडदेखलेपणानें त्यांनीं माझी भलामण केली असावी असें मला वाटत नाहीं. पण माझी ही समजूत कितपत खरी आहे तें मराठी वाचक या अनुवादाचें स्वागत कसें करतात यावरूनच ठरणार आहे.

'कॉंटिनेंटल प्रकाशन संस्थे'चे चालक माझे मित्र श्री. अनंतराव कुलकर्णी यांनीं प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली नसती तर हा अनुवाद प्रसिद्ध तरी झाला असता कीं नाहीं याची मला शंका आहे. परंतु मीं शब्द टाकतांच आपलेपणानें त्यांनीं मूळ पुस्तक व माझा अनुवाद वाचून काढला, आणि पुस्तकाचें महत्त्व त्यांना पटतांच पुस्तक प्रकाशित करण्याचें त्यांनीं मान्य केलें, याबद्दल मी त्यांचाहि आभारी आहें.

गणेशचतुर्थी, १९५९
नाशिक.

**—माधव लिमये**

" जे सरकारला प्राठिंबा देतील किंवा सत्ताधारी पक्षाचे सभासद असतील त्यांनांच तेवढें स्वातंत्र्य उपभोगूं द्यावयाचें—मग अशांची संख्या केवढी कां असेना—याला कांहीं स्वातंत्र्य म्हणत नाहींत. जो भिन्न मतें मांडतो त्यालादेखील स्वपक्षीयांप्रमाणेंच स्वातंत्र्याचे हक्क उपभोगावयास मिळाले तरच तें खरें स्वातंत्र्य. 'न्याया' संबंधींच्या अमूर्त कल्पनांमधून स्वातंत्र्याचा हा विचार विकसित होत नाहीं, तर राजकीय स्वातंत्र्याच्या बुडाशीं असलेलीं उदात्त मूल्यें त्याच्या अनिर्बंध स्वरूपावर आधारलेलीं असतात. स्वातंत्र्याला खास अधिकाराचें स्वरूप प्राप्त झालें कीं त्याची सर्व कळा निघून जाते...

" सबंध देशांतील राजकीय जीवनाचा कोंडमारा करून टाकल्यानें खुद्द सोव्हिएट पद्धतींतील जोमहि हळूहळू क्षीण होत जाणार आहे. सार्वत्रिक निवडणुकी, भाषण, मुद्रण, आणि संघटना-स्वातंत्र्य यांच्या अभावीं सार्वजनिक संस्थांचें कार्य मंदावत जातें. त्याला विकृत वळण लागतें आणि नोकरशाहीच सर्वशक्तिमान होऊन बसते. या नियमांतून इतिहास कोणाचीहि सुटका करीत नाहीं..."

—रोझा लक्झेंबर्ग, १९१८

अनुक्रम ... वि: निबंध
क्रमांक ७७८६ नों दि १८-११-

१

सुरुवात कोठपासून करायची असा माझ्यापुढें प्रश्न पडला आहे. मी जी हकीगत निवेदन करणार आहें तिला शेवट असा नसतोच. निवेदकाच्या अंताबरोबरच तिचा अंत झाला तर? पण पुष्कळदां त्याच्या मृत्यूनंतरहि त्यानें सोडलेला धागा घेऊन मागें राहिलेलें लोककथेचें सूत्र तसेंच चालू ठेवतात. मी ज्या ज्या वेळीं माझ्या स्मृतींना उजळा देऊं लागतों त्या त्या वेळीं किती तरी प्रसंग माझ्या डोळ्यांसमोर तरळूं लागतात. लुई कॅरोलनें म्हटलें आहे ना कीं, गोष्टीची सुरुवात तिच्या प्रारंभापासूनच केली पाहिजे.

मी एका देवतेच्या भजनीं लागलों होतों. ती देवता नागवी होती. पण माझ्याप्रमाणें जे जे लोक तिची आराधना करीत होते त्यांच्यापेक्षां कोणालाहि तसें म्हणण्याची हिंमत नव्हती. हॅन्सअंडर नांवाच्या राजाची एक गोष्ट सांगतात. त्या राजाच्या एका आश्रितानें असें सांगावयाला सुरुवात केली कीं, ज्याला राजानें परिधान केलेले कपडे दिसूं शकणार नाहींत ते नालायक व मंदबुद्धीच असले पाहिजेत. मग स्वतःवर नालायकीचा व मंदबुद्धीचा शिक्का बसूं नये म्हणून राजा नागवा फिरायला लागला तरी तसें म्हणणार कोण? मी ज्या जगांत वावरत होतों त्यांत वावरणाऱ्यांनीं देखील अशीच समजूत करून घेतली होती कीं, ज्यांनीं आपली प्रतिष्ठा, धैर्य आणि अभिमान गमावला असेल तेंच ही देवता नागवी आणि हिडीस आहे असें म्हणूं शकतील.

आणि त्या राजाच्या गोष्टीप्रमाणें हे सगळे गुण आपण गमावून बसलों आहोंत असें स्वतःच्या तोंडानें कोण म्हणवून घेईल? मी ज्या गांवांत राहतों तें गांव फारसें मोठें नाहीं. तेथें एक लहानसें दुकान आहे. तसें पाहिलें तर त्या दुकानाकडे फारसें कुणाचें लक्ष जात नाहीं. एक म्हातारा इसम कसें तरी आपलें पोट भरीत असे. पण त्या म्हाताऱ्याच्या काळजाला कसली तरी जखम झाली आहे. तो सदां आपल्या दुःखांत चूर असतो. हातातोंडाशीं आलेला त्याचा मुलगा २० वर्षांपूर्वीं स्पॅनिश लोकसत्ताकाच्या बाजूनें जनतेच्या स्वातंत्र्यासाठीं लढतां लढतां धारातीर्थीं पतन पावला होता. आज त्याचा देह स्पेनमध्यें कोठें तरी चिरविश्रान्ति घेत पडला असेल. पण

त्याच्या म्हाताऱ्याला मात्र अजूनहि तो अगदीं काल-परवां गेल्यासारखें वाटतें. गेलीं २० वर्षें त्याच्या डोळ्यांचें पाणी खळलेलें नाहीं.

त्याला झालेल्या या जखमेवर फुंकर घालण्यासारखी एकच जागा होती आणि ती म्हणजे त्याच्या मुलानें एका उदात्त ध्येयासाठीं आत्माहुति दिल्याचें समाधान. पण १९५६ सालीं क्रुश्चेव्ह नांवाच्या कोण्या एका व्यक्तीनें म्हणे एक ' गुप्त अहवाल ' सादर केला. त्या अहवालांतून त्यानें रशिया आणि कम्युनिस्ट आंदोलन यासंबंधीं ज्या हकिकती उजेडांत आणल्या त्या मी आणि माझे मित्र पूर्वींहि अनेकवार ऐकत आलों होतों. पण त्यावर विश्वास ठेवायला आम्ही तयार नव्हतों. निव्वळ अपप्रचार म्हणून गेलीं २५ वर्षें आम्ही ज्यांची संभावना करीत होतों त्या सर्व घटनांचे प्रत्यक्ष पुरावेच आतां क्रुश्चेव्हनें जगापुढें मांडले, त्यामुळें अनेकांचे डोळे खाडकन् उघडले. आमच्या गांवांतला तो म्हातारा दुकानदारदेखील त्यांपैकींच एक होता.

जून महिन्यांत मी एकदां सहज त्याच्या दुकानांत गेलों होतों. त्या वेळींहि तो म्हातारा आंसवें गाळीतच होता. मी कांहीं बोलण्यापूर्वींच त्यानें मला प्रश्न केला :

" माझा मुलगा कशासाठीं मेला ? "

एखाद्या व्यक्तीचा मुलगा हा कांहीं केवळ त्या व्यक्तीचाच असतो असें नाहीं. सबंध मानवसमाजानेंहि त्याला आपला मुलगा मानलें पाहिजे असें मी माझ्या लिखाणांतून सतत प्रतिपादन करीत आलों आहें. त्या म्हाताऱ्याच्या डोळ्यांतील अश्रु मला माझ्या या विचारांचीच आठवण करून देत होते. तो माझ्यावर खेकसला नाहीं, तावातावानें हातवारे करीत माझ्या अंगावरहि तो धांवला नाहीं. कारण स्वभावानें जे सरळ असतात ते दुःखाचा डोंगर कोसळला तरीदेखील आपलें सौजन्य सोडीत नाहींत. धारातीर्थीं मरण पावलेल्या तरुणाच्या त्या वीरपित्यानें माझ्याकडे फक्त एक नेत्रकटाक्ष टाकला. त्याची ती नजरच जणूं मला विचारीत होती—

" माझ्यासारख्या अडाण्याला यांतलें कांहीं एक समजलें नाहीं. पण हॉवर्ड फास्ट, तूं सुद्धां कसा फसलास ? तुझ्या भाषणांतून आणि लेखांतून तूं

त्यांची तरफदारी करीत तरी कसा होतास ? कसा तूं याचा पाठपुरावा केलास ? सांग, सांग मला त्याचीं कारणें ! ”

मी काय उत्तर देणार. मला माझ्या या निवेदनाची सुरुवात कशी करावी याचें कोडें पडलें होतें. गोष्टीचा धागा एकदां बरोबर सांपडला कीं, मग माझें लिखाण कसें व्यवस्थित व कोठें न अडखळतां सुरू होतें. आतांचा प्रकारहि कांहींसा असाच आहे. आम्ही ज्या देवतेच्या भजनीं लागलों होतों ती नागवी नाहीं, तिचें स्वरूप हिडीस नाहीं, अशी आम्ही स्वतःची फसवणूक करून घेत होतों, आणि साऱ्या जगालाहि ओरडून ओरडून तेंच सांगत होतों. आम्ही असें कां करीत होतों त्याची निरगांठ या एका प्रसंगानें अवचित सुटली.

पण माझ्या गतकालांतहि इतक्या गुंतागुंतीच्या आणि भावनोत्कट घटना घडल्या आहेत, इतके दारुण प्रसंग माझ्यावर ओढवले आहेत; पण माझेंच कशाला, मी ज्या लहानशा जगांत वावरत होतों त्या जगाची परिस्थितीदेखील अशीच होती. त्यामुळें एखाद्या कसबी कारागिरानें एक एक वीट रचून इमला उभा करावा तसा एक एक विचार संगतवार मांडून त्यांतून एक संपूर्ण कलावस्तु निर्माण करणें मला केवळ अशक्य आहे.

त्याचप्रमाणें दीर्घ कालपर्यंत उराशीं बाळगलेल्या श्रद्धेचा डोलारा ढांसळून पडल्यानंतर वर्ष दोन वर्षें मी त्याची तात्त्विक मीमांसाहि करूं शकलों नाहीं. गेल्या पंचवीस वर्षांत घडलेल्या भयानक घटनांबद्दल क्षमायाचना करतांना त्याला सैद्धान्तिक मुलामा चढवणारीं क्रेमलिनमधील पिसाटांची लांबलचक वक्तव्यें मीं वाचलीं आहेत. त्या काळांत रक्ताच्या ज्या नद्या वाहिल्या त्याचा खुलासा त्यांनीं ‘ व्यक्तिमाहात्म्य ’ या शब्दानें केला आहे.

कधींहि न केलेल्या गुन्ह्यांचे खोटे कबुलीजबाब काढून घेण्यासाठीं ज्यांचा अनन्वित छळ केला जाईल त्यांच्या डोळ्यांतून ओघळलेल्या एका आंसवाला मी जें महत्त्व देईन तें असल्या खुलाशांना—आणि असे खुलासे मीं पुन्हा पुन्हां वाचले आहेत—देणार नाहीं. वीस किंवा त्यांहूनहि जास्त वर्षें स्वतःला मार्क्सवादी म्हणविणारांनीं बसविलेल्या सिद्धान्तांवर मी माझ्या कल्पनासृष्टींतील जगाचीं

चित्रें रंगवीत होतों; पण स्वतः मार्क्सनेंच ' मी मार्क्सवादी नाहीं,' असें टाहो फोडून कां सांगितलें त्याचें मर्म मला इतक्या उशीरा समजलें !

सैद्धान्तिक विचारसरणी ही विचाराची एक शास्त्रीय पद्धति आहे. परंतु कम्युनिझमचें मर्म आपल्याला समजावून घ्यावयाचें असेल तर कम्युनिस्ट विचारप्रणाली ही समाजशास्त्रावर आधारलेली नाहीं, इतकेंच नव्हे तर तिला कोणत्याहि शास्त्रीय पद्धतीचें अधिष्ठान नाहीं हें आपण आधीं लक्षांत ठेवलें पाहिजे. कम्युनिस्ट विचारसरणी ही अमानुष अत्याचार, आत्यंतिक दडपशाही आणि अतिरेकी अडाणीपणा यांवर आधारलेली असते हें विसरून चालणार नाहीं.

आज आपण ज्या जमान्यांत वावरत आहोंत त्या जमान्यांत युगप्रवर्तक असे राष्ट्रीय संघर्ष उद्भवले आहेत आणि प्रचंड आन्दोलनें घडून आलीं आहेत; पण हीं सर्व आंदोलनें व्यक्तिनिरपेक्ष आणि अर्थशून्य ठरूं पाहात आहेत. अशा प्रकारच्या चळवळी मला आकर्षित करूं शकत नाहींत. केवळ वस्तुनिष्ठ किंवा व्यक्तिनिरपेक्ष दृष्टीनें मला विचार करतां येत नाहीं. मीं जें पाहिलें, जें अनुभविलें त्यासंबंधानेंच मी लिहितों. माझ्या लिखाणांतून राग, लज्जा व तिरस्कार या भावना अवश्य डोकावतात. पण त्याचें कारण असें आहे कीं, माझी एकट्याचीच वंचना झाली आहे, माझ्या एकट्या-च्याच वांट्याला अधःपात आला आहे, असें नव्हे तर ज्यांनीं धरणीवर स्वर्ग उतरविण्याचें ध्येय उराशीं बाळगलें आणि त्यासाठीं कोणताहि त्याग करावयाला मागेंपुढें पाहिलें नाहीं अशांचीदेखील वंचना झालेली नाहीं काय ? आपलें ध्येय आतां अगदीं हातातोंडाशीं आलें आहे असें वाटूं लागतें न लागतें तोंच आपण ज्याला स्वर्ग म्हणत होतों तो शुद्ध नरक आहे हें समजून चुकलें नाहीं काय ?

एकाददुसऱ्या कम्युनिस्टानें या बाबतींत ज्या मानसिक अवस्था उपभोगल्या असतील त्यांची प्रत्यक्ष अनुभूति घेतल्यावांचून इतरांना त्याची सत्यता पटणार नाहीं. मोठमोठे सैद्धान्तिक प्रबंध किंवा ऐतिहासिक वास्तवता यांचा काथ्याकूट या कामीं उपयोगी पडणार नाहीं.

कॉमरेड केड्रोनें हा अनुभव घेतला आहे. त्यानें ज्या वेळीं आमच्या या जगांत प्रवेश केला, त्याचा अनुभव घेतला, त्यासाठीं तो झगडत राहिला

आणि अखेर आपल्या ध्येयमंदिराच्या शिखरापर्यंत जाऊन पोहोंचला त्या वेळेपर्यंत मला त्याचा परिचय नव्हता. परंतु तो ज्या ध्येयापाठीमागें लागला होता तें ध्येय अत्यंत विकृत आणि हिडीस असल्याचें त्याला समजून आल्यानंतर आणि त्यापायीं तो स्वतःचे प्राण गमावून बसल्यानंतर मीं त्याचें नांव ऐकलें. सोव्हिएट यूनियनमधील कम्युनिस्ट पार्टीच्या विसाव्या अधिवेशनांत क्रुश्चेव्हनें त्याचा उल्लेख केला तेव्हांच आम्हांला ती सारी हकीगत समजली. सोव्हिएट यूनियनमधील तुरुंगांत मृत्यूचे क्षण मोजीत असलेल्या कॉमरेड केड्रोनें लिहून ठेवलेलीं खालील वाक्यें क्रुश्चेव्हनें आपल्या भाषणांत उद्धृत केलीं आहेत :

"प्रत्येक गोष्टीला मर्यादा ही असतेच. माझ्या छळाचीहि अशीच परिसीमा झाली आहे. माझी प्रकृति खालावलेली आहे. माझी शक्ति, माझा उत्साह पार मावळून गेला आहे. मी आतां अखेरचे क्षण मोजीत आहें. सोव्हिएट यूनियनच्या तुरुंगांत आणि तेंदेखील स्वतःच्या पितृभूमीचा एक नीच विश्वासघातकी म्हणून मरणें यापरतें एखाद्या स्वाभिमानी माणसाला अधिक यातनामय तें काय असूं शकणार ? हें सर्व मला असह्य झालें आहे. आत्यंतिक वेदनांनीं आणि कटु भावनांनीं माझें हृदय पिळवटून निघत आहे...."

कम्युनिझमवरचें हें भाष्य अर्थपूर्ण नव्हे काय ? मानव आपल्या हयातींत केव्हां ना केव्हां तरी जुलमांचा बदला हा घेतोच. कम्युनिस्ट आंदोलनाची देखील अशीच एक दिवस इतिश्री होणार हें ठरल्यासारखेंच आहे. पण त्यानें तरी काय साधणार ? त्या वेळीं तरी कॉमरेड केड्रोची कदर केली जाईल काय ? त्याचें स्मारक उभारण्याचें कोणाच्या मनांत तरी येईल का ? कम्युनिस्टांच्या ठोकळेबाज विचारशृंखलांतून बंधमुक्त झालेला एखादा रशियन कादंबरीकार त्याला सहन कराव्या लागलेल्या मनोव्यथा शब्दबद्ध करावयाला पुढें सरसावेल का ? का इतर अनेक अनामिकांप्रमाणें केड्रोहि विस्मृतीच्या पडद्याआड गडप होऊन जाईल ?

मी तरी निदान त्याची स्मृति कधींच विसरूं शकणार नाहीं. कारण त्यानें अगदीं थोडक्या शब्दांत माझ्या भूमिकेचें सार सांगून ठेवलें आहे. जो कम्युनिस्ट असेल त्यालाच केड्रोच्या म्हणण्याची प्रचीति येऊं शकेल.

कारण प्रत्येक कम्युनिस्टाला केव्हां ना केव्हां तरी त्याच्यासारखीच जबर किंमत द्यावी लागलेली असते.

केड्रोचें जीवन आणि त्याचा मृत्यु ही आजच्या काळांतील एक भेसूर विसंगतीच म्हटली पाहिजे. पण त्यांतहि वास्तवता भरलेली आहे. कॉमरेड केड्रो काय किंवा माझ्यासारखे एका काळचे इतर कट्टर कम्युनिस्ट काय, फसून या जाळ्यांत सांपडलेले नाहींत. बुद्धीच्या निकषावर घासूनच आम्हीं हा मार्ग पत्करला. उलट बुद्धिवादाचा निकष सोडून देऊन आम्ही नसत्या भावनांच्या आहारीं गेलों म्हणूनच केड्रोसारख्यांची अशी दशा झाली.

कम्युनिस्ट म्हणून आम्ही नव्या जगाचीं जीं स्वप्नें रंगवीत होतों तीं महाभयानक होतीं. मानवाविषयींचा दुर्दम्य आशावाद हा आमच्या पुढील आदर्श होता. परंतु पक्षाच्या हितासाठीं आम्हीं आमच्या आत्म्याशीं प्रतारणा केली; आणि आमच्या ध्येयाची हवी तशी विटंबना होऊं दिली. मानवानें परिश्रमपूर्वक मिळविलेल्या स्वातंत्र्याच्या हक्काला देखील आम्हीं काडी लावायला तयार झालों. त्यामुळेंच आम्हीं मानवतेचा सर्वनाश ओढवून घेतला आणि कम्युनिस्ट पक्षाला एखाद्या संहारक शस्त्राचें स्वरूप प्राप्त करून दिलें.

परंतु कॉमरेड केड्रोला तरी या सर्व गोष्टींचें यथातथ्य आकलन कोठें झालें होतें? कारण तसें तें झालें असतें तर "कम्युनिस्ट पार्टी किंवा सोव्हिएट सरकार...या क्रूर आणि अपरिमित अन्यायाची कधींहि गय करणार नाहीं" असें त्यानें म्हटलेंच नसतें.

त्याचें हें विधान किती भाबडेपणाचें होतें! त्याचा छळ कम्युनिस्ट पार्टी-कडूनच केला जात होता ना? आणि सोव्हिएट सरकार तरी कम्युनिस्ट पार्टीच्या तालावरच नाचत होतें ना?

◎ ◎ ◎

## २

१९४३ सालीं मी कम्युनिस्ट पार्टीचा सभासद झालों. पण त्या वेळच्या आमच्या पिढींतील अनेक जणांप्रमाणें १९३० पासूनच मी त्या पार्टीकडे ओढला गेलों होतों. १९३२ सालीं न्यू यॉर्कमधील एका सार्वजनिक ग्रंथालयांत मी पट्टेवाल्याचें काम करीत असें. लहानपणापासून—अगदीं सातव्या वर्षापासून—मला अशीं अनेक सटरफटर कामें मिळवूनच पोट भरावें लागलें आहे. घरची अतिशय गरिबी असल्यामुळें वर्तमानपत्रें विकण्यापासून तों अशी एखादी नोकरी करण्यापर्यंत अनेक कामें मीं केलीं आहेत. आनंद किंवा हास्य या बालसुलभ वृत्तींचा आस्वाद मला कधींच घेतां आला नाहीं. विवंचना हात धुऊन माझ्या पाठीशी लागलेली असे. पण एक गोष्ट मात्र खरी कीं, कोणतें ना कोणतें तरी काम मला हटकून मिळत असे.

अंगापिंडानें मी चांगला धिप्पाड होतों. पण घरच्या गरिबीमुळें आणि सतत उपसाव्या लागलेल्या कष्टांमुळें मी माझ्या आळींतील मवाल्यांच्या टोळक्यांत सांपडलों. कसे तरी चार तुकडे पोटांत भरावे, दिवसभर अर्वाच्य शिव्या देत उडाणटप्पूपणा करावा आणि ढेकणांनीं भरलेल्या कोठल्या तरी मुशाफिरखान्यांत रात्र काढावी. हा त्या वेळचा माझा दिनक्रम होता. दुसऱ्यांना पिटून काढण्यांत आणि प्रसंगीं स्वतःहि तसाच मार खाण्यांत माझा पाय नेहमीं पुढें असे. आईचें छत्र मला फार दिवस लाभलें नाहीं. बिचारी माझ्या लहानपणींच मरून गेली. कोठल्या तरी कारखान्यांत वडील कामावर जात. पण बहुधा ते बेकारच असत. म्हातारे, प्रकृतीनें खंगलेले आणि बेकारींत दिवस कंठणारे असे वडील आणि आई तर कधींच मरून गेलेली; अशा मुलाला मग दाबता-दडपता कोण असणार ?

त्या वेळचा माझा एकहि मित्र आतां शिल्लक नाहीं. त्यांच्यापैकीं कांहींजण कदाचित् अजून हयात असतील. पण अनेकजण तुरुंगांत पिचत पडले आहेत किंवा फांसावर तरी गेले आहेत. अजूनहि रस्त्यांत मला भिकारी दिसला कीं चटकन् माझ्या मनांत येतें कीं, दैवानें खैर केली म्हणूनच; नाहीं तर माझ्या वांट्याला हाच भोग आला असता !

मला धड आठवतहि नाहीं तेव्हांपासून एक व्यसन–हो, व्यसनच नाहीं तर काय,—मला जडलें आणि तें अद्यापहि सुटलेलें नाहीं. माझ्या कष्टमय जीवनाचा तोच एक मात्र विरंगुळा होता. तें व्यसन कोणतें म्हणाल तर वाचनाचें. जें जें म्हणून पुस्तक हातीं लागेल तें तें मी आधाशीपणानें वाचून काढीत असें. त्यांत आवडीनिवडीचा भाग नव्हता कीं, बऱ्यावाइटाची पारख नव्हती. वाचनालयांतील पुस्तकांचा एक एक विभाग मी वाचून संपवीत होतों. एकामागून एक लेखक आणि विषय यांचा मी पिट्टा पाडीत होतों. त्यांतलें फारसें कांहीं पचनीं पडत होतें अशांतला भाग नाहीं. पण मी खूपसें वाचन करीत आहें एवढें एकच समाधान मला पुरेसें होतें.

यावरून सहज एक गंमतीदार प्रसंग आठवला म्हणून सांगतों. रीडर्स क्लबनें माझ्या ‘ दि लास्ट फ्रांटिअर ’ या पुस्तकाची निवड केली होती. अलेक्झांडर उलकॉट हे त्या निवड-समितीचे एक सभासद होते. ते सहज एकदां म्हणाले कीं, अँथनी ट्रोलोपसारख्या श्रेष्ठ लेखकाचे ग्रंथ वाचलेले तर सोडाच, पण त्याचें नांव ऐकलेलेदेखील आपल्या देशांत सहसा कोणी सांपडत नाहीं. तेव्हां मीं ट्रोलोप वाचला आहे असें हळूच सुचविलें. त्या वेळीं त्यांनीं थापाड्या म्हणूनच माझी संभावना केली.

“ काय तूं ट्रोलोप वाचला आहेस? आणि तो कां म्हणून– त्याचीं कोण-कोणतीं पुस्तकें तूं वाचलीं आहेस ? ” त्यांनीं पृच्छा केली.

‘ दि वॉर्डर ’ आणि ‘ बर्चेस्टर टॉवर ’ या दोन पुस्तकांचीं नांवें मला आठवलीं. पण मीं तीं कां वाचलीं होतीं तें काय सांगणार कपाळ ! वाचनालयांतील लेखकांच्या यादींत त्याचें नांव होतें आणि कपाटांत तीं पुस्तकें होतीं यापलीकडे माझ्या वाचनाचा हेतु तो कोणता असणार ? पण अलेक्झांडर उलकॉटना तें कसें पटावें ?

याच ग्रंथालयांत १९३२ सालीं मी कामावर असतांना ग्रंथपालाचें काम करणारी एक सज्जन बाई माझ्या परिचयाची झाली. मीं लिहिलेल्या गोष्टी ती आस्थेनें वाचून पाही. आणि त्यांविषयीं मला कांहीं सूचनाहि देई. माझ्या गोष्टी या बहुतेक मला जीवनांत आलेल्या निरनिराळ्या अनुभवांवरच आधारलेल्या असत.

तिनेंच प्रथम मला कम्युनिस्ट वाङ्मयाचें दालन उघडून दिलें. एक दिवस तिनें मला 'शॉ'चें 'इंटलिजंट वूमन्स गाइड टु सोशालिझम् ॲण्ड कॅपिटॅलिझम्' हें पुस्तक वाचावयास दिलें. एका रात्रींत मी तें वाचून काढलें. आणि तेव्हांपासून शॉ हें माझें आराध्यदैवत बनलें. अर्थात् आज शॉचीं पुस्तकें वाचून कोणी समाजवादाकडे वळेल असें मी मानीत नाहीं. तें पुस्तक वाचल्याबरोबर मी कम्युनिस्ट पार्टीचा सभासद झालों नाहीं. कारण आपल्या हिंमतीवर निरनिराळ्या समस्या सोडविण्यांत आणि संकटांना तोंड देण्यांत मी गर्क होतों. तथापि, याच काळांत अमेरिकेंतील जहाल गटाशीं आणि पार्टीशीं माझा संबंध घडून आला. जॉन रिड क्लबच्या बैठकींना मी अधूनमधून जाऊं लागलों. तेथें जमणाऱ्या मंडळींची भाषा माझ्यापेक्षां निराळी असे. पुस्तकांत लिहिलेली भाषा लोक बोलतात हें तेथेंच मला प्रथम आढळून आलें. बैठकींत बोलतांना माझ्या अशुद्ध आणि गांवढळ भाषेची मला लाज वाटे. पण तेथून परत येतांना माझें मन कावून गेलेलें असें. तेथें जमणाऱ्या लोकांबद्दल माझ्या मनांत विलक्षण अढी होती. हा सगळा बनवाबनवीचा तर प्रकार नसेल ना, अशी शंका मनांत घर करी. पण गुद्द्यापेक्षां मुद्द्यांनीं लढण्याचाहि एक प्रकार असूं शकतो याची मला त्याच वेळीं प्रथम जाणीव झाली. अनेक कम्युनिस्टांशीं त्या काळांत माझी दोस्ती झाली. 'डेली वर्कर' हें त्यांचें मुखपत्र मी मोठ्या उत्सुकतेनें वाचूं लागलों. पण त्यांच्या सर्वच गोष्टी मला पटत असत असें नाहीं. कांहीं कांहीं गोष्टींची तर मला चीड येत असे. १९३९ सालीं हिटलरच्या जर्मनीबरोबर सोव्हिएट यूनियनचा तह झाल्याची वार्ता प्रसिद्ध झाली. त्या वेळीं माझा आणि माझ्या पत्नीचा कम्युनिस्टांबरोबर कडाक्याचा वाद झाला. मी कट्टर फॅसिस्टविरोधक होतों. हिटलरशाही आणि सुसंस्कृतता या एकत्र नांदूंच शकत नाहींत अशी माझी पक्की खात्री होती. संस्कृति व कला यांचा आस्वाद मला लहानपणीं घेतां आला नव्हता. पण आतां माझ्या जीवनाचा तो अपरिहार्य भाग बनला होता. या सांस्कृतिक आणि कलात्मक जीवनाचा विकास व्हावयाचा असेल तर हिटलरशाहीचा बींमोड झालाच पाहिजे अशी माझी धारणा होती. आणि तसा तो होईल अशी श्रद्धा माझ्या पिढींतील इतर अनेकांप्रमाणेंच मीहि बाळगून होतों. त्यामुळेंच कम्युनिस्टांशीं माझें

वांकडें आलें. इतकेंच नव्हे तर त्यांच्याबद्दल मला कमालीचा तिरस्कार वाटूं लागला.

आणि तरीहि चार वर्षांनंतर मी कम्युनिस्ट पक्षाचा सभासद झालों—हिटलर-स्टॅलिन कराराबद्दलची माझी मतें बदललीं किंवा त्याबद्दलचा कम्युनिस्टांवरचा माझा राग गेला म्हणून मी पक्षाचें सभासदत्व स्वीकारलें असें नाहीं. आणि ही गोष्ट माझ्या कम्युनिस्ट मित्रांनाहि ठाऊक आहे. पण सारें जग दुसऱ्या महायुद्धाच्या खाईंत सांपडलें असतांना फॅसिझमविरोधी लढ्याचें निशाण जर कोणीं प्राणपणानें फडकत ठेवलें असेल तर तें कम्युनिस्टांनींच अशी ज्या वेळीं माझी खात्री झाली त्या वेळीं मी कम्युनिस्ट पार्टींत सामील झालों.

अनेक लेखक कम्युनिस्ट पार्टीचे सभासद झालेले मीं बघितले होते. त्याचबरोबर कम्युनिस्ट पार्टीविषयीं भ्रमनिरास होऊन कम्युनिस्ट पार्टीवर टीकेची झोड उठवीत त्या पार्टींतून बाहेर पडलेले लेखकहि मला माहीत होते. मीं त्यांचीं निवेदनें वाचलीं होतीं, पण या भूतकालीन गोष्टी झाल्या अशी मी माझ्या मनाची समजूत करून घेत असें. शिवाय बरावाईट कसा का असेना माझा निर्णय मीं स्वत:च घेतला पाहिजे. इतरांच्या खुंटीवर तें गांठोडें अडकाविण्यांत काय अर्थ आहे, अशी त्या वेळची माझी वृत्ति होती. आणि अजूनहि ती बदलली नाहीं. आणि म्हणून इतर अनेकांप्रमाणें साहित्यिक म्हणूनच मी कम्युनिस्ट पार्टींत सामील झालों. इतर कोणत्याहि धंद्यापेक्षां लेखनावर उपजीविका करणाऱ्यांना अबाधित स्वातंत्र्य उपभोगतां येणें अत्यावश्यक आहे. इतरांच्या बाबतींत स्वातंत्र्य ही चैनीची बाब असूं शकेल. पण लेखकाच्या दृष्टीनें मात्र ती निकडीची गरज असते. कारण त्याशिवाय त्याचा विकासच होऊं शकत नाहीं. १९४३ सालीं कम्युनिस्ट हे मानवाच्या स्वातंत्र्यासाठीं झगडणारे शूर आणि हिकमती लढवय्ये आहेत असें मी धरून चाललों होतों. ती माझी चूक ठरली. पण एकदां उराशीं बाळगलेली दृढ समजूत सहजासहजीं दूर सारतां येत नाहीं.

◎ ◎ ◎

## ३

कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यपद्धतीमुळें कलावंताचें स्वातंत्र्य, कसब आणि बुद्धि यांचा कसा कोंडमारा होतो त्याचें विवेचन पुढें येणार आहे. विशिष्ट समाज कलावंताकडे बघण्याचा कोणता दृष्टिकोन स्वीकारतो त्यावरून त्या समाजाचें मूल्यमापन सहज करतां येतें. पण त्या प्रश्नाकडे वळण्यापूर्वीं प्रथम मला माझे कांहीं व्यक्तिगत अनुभव येथें नमूद केले पाहिजेत.

कम्युनिस्ट पक्षांत सामील झाल्यानें आंतरिक समाधान किंवा सुख लाभतें अशी जर कोणाची समजूत असेल तर ती बरोबर नाहीं. उलट त्याला आपल्या आत्म्याशीं प्रतारणा करावी लागते आणि अशी प्रतारणा करण्यानेंच समाजाच्या विमोचनाचा मार्ग मोकळा होऊं शकेल अशी विचित्र समजूत तो करून घेतो. साहजिकच एखाद्या व्यक्तीवर अवहेलनेची वर्षा झाली तरी त्याचें कांहीं वाटेनासें होतें. पक्षांत येणारा सभासद हा आपल्या ‘ भांडवलशाही वृत्तीचें ’ गांठोडें बरोबर घेऊन येतो आणि त्यामुळेंच त्याच्या पदरीं अशी अवहेलना येते हें कम्युनिस्ट विचारसरणीचें सूत्र आहे. स्वाभिमान, भावनोत्कटता आणि व्यक्तिस्वातंत्र्याची ऊर्मि यांचा समावेश देखील भांडवलशाही वृत्तींतच केला जातो. आणि ही वृत्ति टाकून देऊन आपण कामगारवर्गाशीं समरस झालों नाहीं अशी वारंवार कबुली देणें हें मोठें शतकृत्य समजलें जातें. मी स्वतः एका कामगाराच्या पोटीं जन्माला आलों. माझी सारी हयात उपासमारींत आणि कष्टांत गेली तरीदेखील भांडवलशाही वृत्तीच्या आरोपांतून माझी सुटका होऊं शकली नाहीं.

कम्युनिस्ट पार्टीशीं तादात्म्य पावण्याचा प्रयत्न करीत असतांना मी कोणत्या मानसिक अवस्थेंतून गेलों, १९४३ सालीं पार्टींत दाखल झाल्यापासून तों १९५७ सालीं तिचा त्याग करीपर्यंत माझ्या मनांत कोणकोणते विचारतरंग उमटत गेले त्याचें वर्णन करणें अशक्य आहे.

कॉमरेड केड्रो किंवा त्याच्यासारख्या असंख्य दुर्दैवी जीवांप्रमाणें कम्युनिस्ट सत्ताधाऱ्यांच्या छळाला मी कधीं बळी पडलों नाहीं हें खरें, पण

माझें शरीर शाबूत राहिलें तरी मन मात्र तितकें निकोप राहूं शकलें नाहीं. कम्युनिस्टांच्या मोहजालांतून माझ्या मनाची सोडवणूक कशी झाली तें विस्तारानें सांगावयाचें म्हटलें तर अशीं किती तरी पानें खर्चीं घालावीं लागतील आणि सदभिरुचीच्या वाचकाला न रुचणाऱ्या किती तरी गोष्टी त्यांत नमूद कराव्या लागतील.

पण कम्युनिस्ट पार्टीविषयीं माझें मन हळूहळू कसें विटत चाललें होतें, कोणत्या मानसिक प्रक्रिया घडून येत होत्या तें सूचित करणारे कांहीं प्रसंग येथें देण्यासारखे आहेत. १९४५ सालीं अमेरिकेला जाण्यासाठीं म्हणून मी कलकत्त्यांत बोटीवर चढलों. हिंदुस्थानचा किनारा सोडण्यापूर्वीं हिंदी कम्युनिस्ट पार्टीच्या एका वरिष्ठ नेत्यानें माझी भेट घेतली. वृत्तपत्राचा बातमीदार या नात्यानें तो मला भेटला. पण त्याच वेळीं कम्युनिस्ट पक्षाचा प्रवक्ता म्हणून किती तरी वेळ तो माझ्याशीं बोलत होता. हिंदुस्थानांतील राजकीय घडामोडींसंबधींचीं हिंदी कम्युनिस्टांचीं मतें अमेरिकेंतील कम्युनिस्ट पक्षाचा प्रमुख युजेनी डेनिस याला कळविण्याविषयीं त्यानें मला आवर्जून सांगितलें.

त्याच्या निरोपाचा मथितार्थ काय होता ह्याला विशेष महत्त्व नाहीं. इंग्रज लवकरच हा देश सोडून जातील या व्यतिरिक्त त्यानें वर्तविलेलीं सारीं भाकितें खोटीं ठरलीं आहेत. पण १९४५ सालीं मला अर्थातच त्याची कल्पना येणें शक्य नव्हतें. एका ‘ पार्टी कॉमरेडनें ’ एवढें बजावून सांगितलें आहे तर त्याचा निरोप लगेच पोहोंचतां केला पाहिजे या भावनेनें स्वदेशीं आल्याबरोबर मीं प्रथम डेनिसची भेट घेण्याचा प्रयत्न केला.

पण तो म्हणे फार कामांत होता ! युद्धाचा वणवा भडकलेल्या प्रदेशांतून १५ हजार मैलांचा कंटाळवाणा प्रवास संपवून मी माझ्या बायकामुलांत परत येत होतों तरीहि आपल्या सहकाऱ्याचा निरोप पोहोंचविण्यासाठीं धडपडत मी डेनिसची भेट घ्यावयास गेलों. पण त्याला मात्र मला भेटावयाला फुरसद नव्हती. दिवसांमागून दिवस व आठवड्यांमागून आठवडे लोटले तेव्हां कोठें एकदांची आमच्या भेटीची वेळ ठरली.

अमेरिकन कम्युनिस्ट पार्टीच्या मुख्य कचेरीच्या मुख्य कचेरींत आमची मुलाखत होणार होती. तेथें गेल्यावर मला डेनिससाहेबांच्या अद्ययावत् सुखसोईंनीं सुशोभित केलेल्या दालनांत नेण्यांत आलें. डेनिससाहेब एखाद्या नबाबासारखे एकटेच बसले होते. मी आंत प्रवेश केल्यावर त्यांनीं खुणेनेंच जें काय सांगावयाचें असेल तें सांगण्याची मला सूचना दिली. हिंदी कम्युनिस्टांचा तो निरोप त्यांच्या कानावर घालण्यांत सुमारें दहा मिनिटें लागलीं असतील. माझें बोलणें संपल्यावर माझ्याशीं एकहि अधिक शब्द न बोलतां डेनिस म्हणाला, "बरें आहे, तुम्ही जाऊं शकतां."

तो सारा प्रकार पाहून मी तर चाटच पडलों. बंगालमधील भीषण दुष्काळ मी प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहून आलों होतों. दुसऱ्या कोठल्याहि अमेरिकनाला न भेटलेल्या अनेक व्यक्तींची मी समक्ष गांठ घेतली होती. भारतांत घडणाऱ्या अनेक महत्त्वपूर्ण सामाजिक घटनांचें प्रत्यक्ष अवलोकन करण्याची संधि मला लाभलेली होती. पण हें सर्व क्षणभर बाजूस ठेवलें तरी मी अमेरिकेंतील एक ख्यातनाम लेखक होतों. माझ्या अनेक पुस्तकांवर साऱ्या देशांतील लोकांच्या उडया पडत होत्या हें तर डेनिसला माहीत होतें ना? पण यांपैकीं कशाचेंहि महत्त्व त्याला वाटलें नाहीं. मला कांहीं प्रश्न विचारावे, माझ्याकडून आणखी माहिती काढून घ्यावी, असें त्याच्या मनांतहि आलें नाहीं. इतकेंच काय, पण आम्ही अगदीं प्रथमच भेटत असून देखील त्यानें माझें साधें क्षेमकुशलहि विचारलें नाहीं. कपडयावरील कोळिष्टक बोटानें झटकून टाकावें तसें नुसत्या खुणेनें त्यानें मला वाटेला लावलें.

ही घटना दिसावयाला अगदीं क्षुल्लक अशी आहे, पण अवहेलनेचे असे अनेक प्रसंग मीं अनुभविले आहेत. कम्युनिस्ट पक्षांत मला हा जो अनुभव अनेकवार आला तो इतरत्र मात्र कोठेंहि आला नाहीं. फार काय, पुढें मला तुरुंगांत डांबण्यांत आलें तेव्हां तेथील अधिकाऱ्यांचें वर्तनदेखील जास्त सौजन्याचें व माणुसकीला धरून होतें.

डेनिसनें केलेल्या अपमानानें माझ्या अंगाची नुसती लाही लाही झाली. त्याच्या कचेरींतून मी जो निघालों तो थेट खालच्याच मजल्यावर असलेल्या

'डेली वर्कर 'च्या कचेरींत जाऊन जो नार्थपुढें माझें अंतःकरण उघडें केलें. जो नार्थ हा माझा एक जुना विश्वासू मित्र होता. त्यानें सहानुभूतिपूर्वक माझें म्हणणें ऐकून घेतलें. माझ्या भावना त्याला समजूं शकल्या. कारण १९३९ सालीं तो स्पेनमधून परत आला त्या वेळीं त्यालाहि नेमका असाच अनुभव आला होता. फरक इतकाच कीं, त्या वेळीं पार्टीचें नेतृत्व डेनिसऐवजीं दुसऱ्या कोणाकडे तरी होतें.

"पण कां ?" मीं त्याला म्हटलें, "आपल्या पक्षांतले लोक असे माणुसकी नसल्यासारखें कां वागतात ?"

जो नार्थ तरी काय उत्तर देणार? त्यानें फक्त खांदे उडविले. पार्टींतील इतरांनीं मात्र माझ्या या भावनोत्कटतेची 'भांडवलशाही वृत्तीचें गांठोडें' म्हणून संभावना केली.

झिनोव्हिव, बुखारीन आणि ट्रॉट्स्की यांच्यावरील खटले हा देखील कम्युनिस्ट कार्यपद्धतींत मुरलेल्या अतिमाणूसपणाचाच एक भाग होता. हे त्या वेळीं मला उमगलें नव्हतें. त्यासाठीं बरींच वर्षे जावीं लागणार होतीं आणि बऱ्याच घटना याव्या लागणार होत्या.

पण तो अनुभव आल्यानंतरहि मी त्या पक्षाला इतके दिवस चिकटून कसा राहिलों आणि तेथील माझ्या इतर सहकाऱ्यांचा मीं त्याग कां केला नाहीं याचीं चार कारणें संभवतात. तीं म्हणजे स्वाभिमान, जबाबदारीची जाणीव, शरम आणि भीति. आपण ज्या आंदोलनाशीं समरस झालों, त्यावर चोहों बाजूंनीं टीकेचे हल्ले चढविले जात असतांना त्यांतून अंग काढून घेणें स्वाभिमानी माणसाला चटकन् रुचत नाहीं. जबाबदारीच्या जाणिवेचेंहि असेंच आहे. पुढारी कसेहि असले तरी आपण त्यांच्या खांद्याला खांदा लावून एकत्र काम केलें आहे. वर्षानुवर्ष त्यांच्याबरोबर कैदखान्यांत काढलीं आहेत. हें मनांत आलें म्हणजे त्यांना सोडून जाण्याची कल्पना असह्य वाटूं लागते. ज्यांनीं यापूर्वींच आपल्या चळवळींतून काढता पाय घेतला त्यांची आपण आणि आपल्या इतर सहकाऱ्यांनीं निर्भर्त्सना केली होती व त्यांना भ्याड ठरवलें होतें याची आठवण अगदीं ताजी असल्यामुळें तोच प्रसंग आपल्यावर येणें लाजिरवाणें वाटावें हें साहाजिक नव्हे का ?

शिवाय चोहोंबाजूनें संकटांनीं वेढल्यानंतर आपण जर बाहेर पडलों तर आपल्या एकट्याचा निभाव कसा लागणार, अशी भीति देखील मनांत डोकावत असते. कम्युनिस्ट पार्टीचा त्याग करावयाला मन एकदम तयार होत नाहीं. त्याची कारणमीमांसा कांहींशी अशी आहे : पक्षाकडून आज कितीहि चुका होत असल्या तरी आज ना उद्यां पक्ष योग्य वळणावर येईल अशी वेडी आशाहि मनांत वसत असते.

कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीनें मी ज्या वेळीं भारावून गेलों होतों त्या वेळीं देखील कांहीं घटनांमुळें माझें मन कसें बंड करून उठत असे, तें माझ्या चांगल्या परिचयाचें आहे. त्या वेळच्या रुमानियाच्या अमेरिकेंतील वकिलानें सांस्कृतिक विषयाला वाहिलेल्या ' मेन स्ट्रीम ' मासिकाच्या संपादक-मंडळा-वरील आम्हां पांच-सहा जणांना एकदां खान्याला बोलाविलें होतें. त्या वेळचा प्रसंग मी कांहीं केल्या विसरूं शकत नाहीं.

रुमानियाचा तो वकील आपल्या आलीशान मोटारींतून आमच्या कचेरींत आला आणि आम्हां सर्वांना एका बादशाही उपाहारगृहांत घेऊन गेला. आम्ही सर्वजण मोटारींतून उतरल्यावर तो जेव्हां उपाहारगृहाच्या पायऱ्या चढूं लागला तेव्हां आम्ही थोडे घुटमळलों. कारण, त्याचा ड्रायव्हर मोटारींतच थांबला होता. आमच्यांत कुजबूज सुरू झाली. शेवटीं एकानें ' ड्रायव्हर आपल्याबरोबर येत नाहीं का ? ' असें धाडसानें विचारलें.

त्यावर त्या रुमानियन मुत्सद्द्यानें दिलेलें उत्तर मोठें मासलेवाईक होतें. तो म्हणाला, " ड्रायव्हर ? तो सच्चा ' पार्टी कॉमरेड ' आहे ! आपलें जेवण होईतोंपर्यंत तो बिनतक्रार गाडींत बसून राहील." पण आम्हांला मात्र तें चांगलेंच खटकलें. कारण ड्रायव्हर झाला तरी तोदेखील माणूसच आहे हें आम्ही विसरूं शकत नव्हतों. म्हणून त्यानेंदेखील आम्हां सर्वांच्या-बरोबरच जेवावयास बसावें असें आम्हीं सुचविलें. स्वतःला आम्ही कामगार-कार्यकर्ते समजत होतों. सामान्य माणूस आणि कम्युनिस्ट यांच्यांत फरक असतो हें आम्हांस कोठून उमगणार ? पण आमच्या यजमानाला मात्र आमच्या सूचनेमुळें चांगलाच धक्का बसला. ड्रायव्हर आणि राजनैतिक मुत्सद्दी व विख्यात, बुद्धिवादी विचारवंत यांच्या खुर्चीला खुर्ची लावून बरोबरीनें जेवणार ? हें कसें शक्य आहे ?

तसें पाहिलें तर हा प्रसंग देखील अगदीं क्षुल्लकच. पण पुढें किती तरी दिवस कांट्यासारखा तो माझ्या मनांत सलत राहिला. कम्युनिस्ट राष्ट्रांतील एका जबाबदार अधिकाऱ्यानें ज्या अर्थी तशी भूमिका घेतली होती त्या अर्थी ती बरोबर असलीच पाहिजे असें आम्हीं स्वतःला कितीहि बजावलें तरी मनांत विचारांचें काहूर माजल्याशिवाय राहात नसे. पुढें कित्येक वर्षांनंतर रुमानियांतील ज्यूविरोधी मोहीम, अनन्वित दडपशाही, राजकीय कैद्यांचा करण्यांत येणारा छळ व त्यांना गोळी घालण्यासाठीं उभारण्यांत आलेलीं खास पथकें आणि हें सारें समाजवादी रुमानियांत–यांच्या हकीगती जसजशा कानांवर येऊं लागल्या तसतसा त्या क्षुल्लक प्रसंगाचा अन्वयार्थहि उमगूं लागला.

◎ ◎ ◎

४ आणि तरीहि मी कम्युनिस्ट पार्टीला रामराम ठोकला नाहीं. उलट पार्टीतील ह्या अपप्रवृत्तींशीं झगडून त्या नष्ट करण्याचा मीं मनाशीं निर्धार केला. डेनिस म्हणजे कांहीं पार्टी नव्हे अशी मी स्वतःची समजूत करून घेत असे. पण डेनिससारख्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढतच होती. तरीदेखील मी म्हणे हे लोक म्हणजेहि पार्टी नव्हे आणि माझ्याप्रमाणें पार्टीच्या इतर असंख्य चाहत्यांतहि तीच भावना वसत होती. मी थिल्लरपणें पार्टींत सामील झालों नव्हतों. आणि पक्ष सोडून देण्याच्या बाबतींतहि माझ्याकडून थिल्लरपणा होतां कामा नये असा माझा कटाक्ष होता. आपली अवहेलना झाली या सबबीवर जे पक्ष सोडून गेले त्यांची निंदा-नालस्ती करण्याचें वळण मीं प्रयत्नपूर्वक स्वतःला लावून घेतलें होतें.

अशा परिस्थितींत मी जाणूनबुजून स्वतःला पक्षाच्या नानाविध कार्यक्रमांत गुंतवून घेऊं लागलों. त्या योगानें तरी पक्ष सोडण्याचे विचार माझ्या मनांत उद्भवणार नाहींत अशी माझी समजूत होती. आपण होऊन मी कम्युनिस्ट आहें असा डांगोरा मी पिटत असें हें खरें. पण कम्युनिस्ट

म्हणून माझा कोणीं उल्लेख केला तर त्याचा इन्कारहि मी करीत नसे. व्याख्यानासाठीं आलेलीं निमंत्रणें मीं कधींहि नाकारलीं नाहींत. कम्युनिस्टांतर्फे केल्या जाणाऱ्या शेंकडों अर्जांवर मी माझी स्वाक्षरी देऊं लागलों. तसेंच त्यांच्या निरनिराळ्या समित्यांचें सभासदत्वहि मी पत्करूं लागलों.

परंतु या कामकाजांत मी स्वतःला जसजसा अधिकाधिक गुंतवून घेऊं लागलों तसतशी माझी स्थिति अधिकच केविलवाणी होऊं लागली. मला त्याची मीमांसा करतां येईना कीं, त्याचें नीट आकलनहि होईना. मनाच्या अशा अवस्थेंत असतांनाच मला तुरुंगांत जावें लागलें. मी सुटून आलों त्या वेळीं माझें सारें जीवन कमालीचें भीतिग्रस्त बनलें होतें. मला भीति वाटत नव्हती कशाची ? पुन्हा अटक होईल, माझ्यावर कोणी हल्ला करील, बायका-मुलांना कोणी त्रास देईल किंवा माझ्याविरुद्ध नाहीं नाहीं त्या कंडया पिकवून माझ्यावर भलभलते आरोप लादण्यांत येतील, मला पार्टींतून हाकलून देण्यांत येईल— पक्षाचे कांहीं नेते तर त्यासाठीं टपूनच बसले होते— आणि तसें झालें म्हणजे मी जगांतून कायमचा उठेन. अशा नाना प्रकारच्या भयानें मी पुरता पछाडला गेलों होतों.

म्हणून पुन्हां पुन्हां मी माझा जीव धोक्यांत घालीत होतों. पक्षासाठीं प्राणांची कुरवंडी करावयालादेखील मी मागेंपुढें पाहाणार नाहीं, हें मला दाखवून द्यावयाचें होतें. मला जे जे आदेश देण्यांत येत त्यांची मी निमूटपणें तामिली बजावीत असें. हजारों डॉलर्स मीं पक्षाला देऊन टाकले. पण तेवढ्यानें भागण्यासारखें नव्हतें. माझ्या एका पुस्तकाचे सर्व अधिकार मीं सिव्हिल राईट कॉंग्रेसला दिले आणि तरीहि तें पुस्तक मी कोठल्याहि सभेच्या ठिकाणीं विकू लागलों म्हणजे, 'पहा, लेकाचा स्वतः गबर होऊं पाहातो आहे' अशी कुजबूज सुरू होई. पार्टीसाठीं इतकी झळ सोसूनहि माझ्यावर अशा तऱ्हेचे आरोप करण्यांत येत होते.

पार्टीला सदान् कदा पैशाची जरूर लागे. मग मला निधि गोळा करून आणण्याचा आदेश येई. स्वतःला पुरोगामी समजणाऱ्या चार धनाढ्य लोकांकडे जाऊन मला तोंड वेंगाडावें लागे. त्यांचीं अपमानास्पद बोलणीं ऐकून घेण्याची लाचारी पत्करावी लागे. आणि इतकें करून पैसे किती मिळत तर पांच नाहीं

तर दहा डॉलर्स ! पुष्कळ वेळां ही लाचारी टाळण्यासाठीं मी माझ्या पदरचे पैसे घालून तेच गोळा करून आणलेला निधि म्हणून पुढाऱ्याजवळ नेऊन देत असें. तरी देखील मीं पक्षाचा त्याग केला नाहीं. उलट, पक्षाशीं जास्त जास्त एकरूप होण्याची धडपड करूं लागलों.

पण असें किती दिवस चालणार ? कुश्चेव्हनें २० व्या काँग्रेसपुढें केलेल्या भाषणाचा तो दिवस अखेर उजाडला. त्याचें तें भाषण माझ्या वाचनांत आलें आणि माझे डोळे साफ उघडले. माझ्या मनांतील सारा संभ्रम दूर झाला. भीति पार पळून गेली आणि कम्युनिस्ट पक्षाबद्दल अतीव दुःखाची आणि तिरस्काराची भावना काय ती मागें उरली. मीं कम्युनिस्ट पक्षाला एकदांचा रामराम ठोकला. भुतानें पछाडलेला माणूस तें मानगुटीवरून उतरल्यावर हायसें वाटून जसा सुस्कारा सोडतो तसें माझें झालें. म्हणून कुश्चेव्हच्या त्या भाषणाबद्दल मला त्याचें सदैव ऋणी राहिलें पाहिजे.

तें गुप्त भाषण वाचल्यापासून सध्यां अस्तित्वांत असलेली कम्युनिस्ट पार्टी नामशेष झाली पाहिजे अशा निष्कर्षाप्रत मी येऊन चुकलों आणि पुढें घडत गेलेल्या घटनांमुळें माझ्या या निष्कर्षाला बळकटीच येत गेली. तेव्हांपासून एकच ध्येय मीं उराशीं बाळगलें. आणि तें म्हणजे ज्याला आम्ही अगदीं आराध्यदैवत समजत होतों तें वस्तुतः किती हिडीस आणि विद्रूप आहे त्याची इतरांना प्रचीति आणून द्यावयाची. त्यायोगें तरी आम्हांला सोसाव्या लागलेल्या यातना आणि खोट्या ध्येयाच्या मृगजला-मागें लागल्यानें झालेली आमची परवड यांपासून भावी पिढ्यांचें तरी निदान संरक्षण होऊं शकेल.

◎ ◎ ◎

## ५

मी भरकटतों आहें तरी कुठें ? असा कदाचित् हें वाचतांना कोणाला प्रश्न पडेल. आणि आजवर अनेकांना माझ्या बाबतींत ही शंका आली आहे. पण मी असें मानतों कीं, जे लोक सत्प्रवृत्त असतात त्यांनीं एक ध्येय आपल्या मनाशीं ठरविलेलें असतें आणि तें गांठण्यासाठीं त्यांची

घडपड चालू असते. त्यांचें सारें लक्ष त्या साध्यावर केंद्रित झालेलें असतें. पण कांहीं जणांना मात्र साध्यापेक्षां साधनांचेंच महत्त्व वाटूं लागतें.

माझ्या जीवनांत निरनिराळीं संक्रमणें घडून आलीं असतील, पण साऱ्या मानवजातीबद्दलचा बंधुभाव आणि जीवनांतील उदात्त मूल्यें हें माझें ध्येय अविचल राहिलेलें आहे.

आमच्यापैकीं अनेकांना असें वाटत होतें कीं, हें ध्येय साध्य करण्याचें कम्युनिस्ट पार्टी हेंच सर्वोत्तम साधन होऊं शकेल. पण पुढें दुर्दैवानें त्यांपैकीं बहुतेकांना त्या ध्येयापेक्षां कम्युनिस्ट पार्टीच महत्त्वाची वाटूं लागली. म्हणजेच साध्य बाजूला राहून त्यांनीं त्या साधनाचेंच स्तोम माजवून ठेवलें.

जीवनांत कांहीं गोष्टी अत्यंत पवित्र अशा असतात. पण कम्युनिस्ट पार्टी ही त्यांपैकीं खासच नव्हे. ज्याप्रमाणें मानवी जीवित हें पवित्र आहे. त्याचप्रमाणें त्याच्या आशा-आकांक्षा, त्यांनीं संपादन केलेलें यश आणि डोळ्यांपुढें ठेवलेलीं उदात्त ध्येयें हींदेखील पवित्र आहेत. स्वातंत्र्य, न्याय आणि समता या मार्गावर मुख्यतः मला माझ्या स्मरणशक्तीवरच विसंबून राहावें लागणार आहे. पण सत्याशीं जराशीसुद्धां प्रतारणा न करतां किंवा नसते फांटे फोडून घडलेल्या गोष्टींना विकृत स्वरूप देण्याचा यत्किंचितहि प्रयत्न न करतां मी माझें म्हणणें मांडणार आहें.

हें पुस्तक लिहिण्यामागचा माझा हेतूहि मी सांगून टाकतों. कारण त्याविषयींहि बरेंच वादंग माजणार आहे. मी क्रुश्चेव्हचें तें कुविख्यात भाषण वाचल्यापासून ठामपणें एका निर्णयाला येऊन पोहोंचलों आहें कीं, आजच्या स्वरूपांत कम्युनिस्ट पार्टी अस्तित्वांत राहतां कामा नये. आणि त्या दिशेनें अनेक शक्ति आज कार्यप्रवण होऊं लागल्या असल्या तरी जागतिक पातळीवर ही गोष्ट जवळ जवळ अशक्यप्राय आहे याची मला जाणीव आहे. पण निरनिराळ्या देशांतील लोकांनीं तेथील परिस्थिति आणि स्वतःची कुवत लक्षांत घेऊन या प्रश्नाचा सांगोपांग विचार केला पाहिजे असें मात्र मला जरूर वाटतें.

अर्थात् अमेरिकेंतील परिस्थिति फार निराळी आहे. येथील जनतेची पार्श्वभूमि आणि तिला आलेला अनुभव याच्या आधारावर स्वतःचें विसर्जन

करून घेण्याचा ठराव १९५६ च्या जून महिन्यांत—त्याच महिन्यांत कुश्चेव्हचें भाषण इकडे प्रसिद्ध झालें—पास करून घेणें सहज शक्य झालें असतें. अनेक जबाबदार कम्युनिस्ट कार्यकर्ते त्या निर्णयाला येऊन पोहोंचले होते. अर्थात् हा निर्णय घेतांना त्यांना कमालीचें दुःखहि झालें. कांहींनीं हीं मतें जाहीरपणें बोलून दाखविलीं, तर कांहींनीं फक्त पार्टीच्या परिवारांतच त्यांचा उच्चार केला. मीदेखील त्याच निर्णयाला आलों होतों. सर्व परिस्थिति अमेरिकन जनतेपुढें अगदीं प्रांजलपणें मांडण्यांतच कम्युनिस्ट पार्टीची इज्जत आहे असें मला वाटे, आणि कम्युनिस्ट पार्टीची इज्जत हेंच तर आम्ही आमचें सारसर्वस्व मानीत आलों होतों. कम्युनिस्ट पार्टींतील तळचे सभासद हे सत्प्रवृत्त आणि प्रामाणिक असतात अशी माझी समजूत होती आणि आजहि आहे. आणि म्हणून त्यांची प्रतिष्ठा राखण्यासाठीं तरी निदान पुढीलप्रमाणें एखादें निवेदन प्रसिद्ध करणें मला अवश्य वाटत होतें.

"आम्हीं फार उच्च आणि उदात्त ध्येयें उराशीं बाळगलीं होतीं. आणि तीं साध्य करण्यासाठीं आम्हीं जिवापाड धडपड केली. पण आमची चळवळ हा जागतिक आंदोलनाचाच एक भाग असल्यामुळें उपलब्ध झालेल्या नव्या माहितीच्या आधारें आमच्यासंबंधींचें मूल्यमापनहि नव्यानें करणें अवश्य होऊन बसलें आहे. त्यावरून पाहतां आम्हांला आमचा पराभव खुलेपणानें कबूल केला पाहिजे. त्यांतच आमची प्रतिष्ठा आहे. आम्ही ज्या स्वरूपाची संघटना उभारूं पाहात होतों त्यांतील अंगभूत धोक्याचा लाल कंदील जगाला दाखवून आमच्या संघटनेचें कायमचें विसर्जन करणें एवढा एकच पर्याय आमच्यापुढें उरला आहे. अमेरिकन जनता आणि येथील कामगारवर्ग यावर आमचा दृढ विश्वास आहे. त्यामुळें आम्हांला अशी खात्री वाटते कीं, कम्युनिस्ट पार्टीचें विसर्जन केल्यामुळें अमेरिकेंतील लोकशाही आणि सामाजिक प्रगति यांच्यासाठीं चाललेला आमचा लढा कमकुवत तर होणार नाहींच, उलट त्याला अधिक धार चढेल."

जर ठरल्याप्रमाणें १९५६ च्या जून महिन्यांत पक्षाचें अधिवेशन भरलें असतें तर विसर्जनाचा ठराव हमखास पास झाला असता. पण पार्टींतील सभासदांना वश करून घेऊन आपलें हुकमी बहुमत होऊं शकेल अशी खात्री वाटेपर्यंत पक्षनेत्यांनीं नाना हिकमती करून तें अधिवेशन लांबणी-

वर टाकलें. पण त्यामुळें स्वतःची प्रतिष्ठा टिकविण्याची फार मोठी संधि पक्षानें गमावली असें मला वाटतें. ताकदीच्या जोरावर किंवा शस्त्रबळानें कम्युनिस्ट पार्टीचा बींमोड करतां येणार नाहीं. कारण, कम्युनिस्ट पार्टी म्हणजे एक विशिष्ट तत्त्वप्रणाली किंवा विचारसरणी आहे. आणि कोणतीहि विचारसरणी पाशवी बळानें नष्ट करतां येत नाहीं, हें विचारवंतांच्या जितकें लवकर ध्यानांत येईल तितकें चांगलें. कोणतीहि विचारसरणी सत्याच्या ऐरणीवर घालून सत्यरूपी हातोड्याच्या प्रहारांपुढें टिकते कीं नाहीं तें पाहिलें पाहिजे. सत्याच्या कसोटीला उतरेल तीच तत्त्वप्रणाली टिकूं शकते. कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीच्या अंगीं तें सामर्थ्य आहे असें मला वाटत नाहीं.

मराठी ... का. क्र. १०२६८

◎ ◎ ◎

६

कुश्चेव्हनें २० व्या कॉंग्रेसपुढें केलेल्या भाषणासंबंधीं ‘डेली वर्कर’च्या १२ जून १९५६ च्या अंकांत मीं एक लेख लिहिला होता. त्यांत मीं म्हटलें होतें :

“ त्या भाषणाचें वृत्त मोठें भयानक आहे. इतिहासांत बहुधा त्याला तोड सांपडणार नाहीं. जगांतील आजवरच्या साऱ्या रानटीपणाचा आणि रक्तपिपासु वृत्तीचा एक लाजिरवाणा नमुना म्हणून तें भाषण सुसंस्कृत माणसाच्या फार काळ स्मरणांत राहील.”

तो लेख प्रसिद्ध होण्यापूर्वी सोव्हिएट रशियांत सर्वत्र माझा बहुमान केला जात असे. माझ्या वांट्याला जें भाग्य आलें तें रशियांतीलच नव्हे तर अन्य देशांतील विद्यमान लेखकांच्याहि वांट्याला क्वचितच आलें असेल. माझ्या पुस्तकाच्या लक्षावधि प्रती रशियांत खपत असत. “ दि पॅशन ऑफ सॅको ॲण्ड व्हेंजेटी ” या माझ्या पुस्तकाची पहिली आवृत्तीच ५० हजारांची काढण्यांत आली होती. माझीं दोन नाटकें तेथील रंगभूमीवर आलीं होतीं. शिवाय, दुसऱ्या दोन पुस्तकांचीं नाटकांत रूपांतरें झालीं होतीं. तसेंच माझें आणखी एक पुस्तक पटकथेसाठीं निवडण्यांत आलें होतें. माझ्या लिखाणावर टीकात्मक असे अनेक लेख निरनिराळ्या नियत-

कालिकांतून प्रसिद्ध होत असत. रशियांतील वाचक आणि टीकाकार यांनीं माझ्यावर प्रेमाचा आणि स्तुतिसुमनांचा नुसता वर्षाव चालविला होता. खरें म्हणजे त्यांत बरीच अतिशयोक्तिहि होती—पण मी हें कबूल करतों कीं, त्यामुळें मी खुशावलों नाहीं असें नाहीं. बेफाट स्तुतीनें हुरळून गेला नाहीं असा एकहि लेखक निदान माझ्या तरी पाहण्यांत नाहीं.

माझीं पुस्तकें लोकप्रिय होऊं लागल्यापासून माझा पत्रव्यवहारहि खूप वाढला होता. कम्युनिस्टांकडे माझा ओढा आहे हें साऱ्या जगाला कळून चुकलें होतें. छक्के-पंजे किंवा लपवाछपवी माझ्या स्वभावांतच नाहीं—नव्हे मला त्याचा प्रथमपासून तिटकारा आहे. म्हणून कोणालाहि पत्र लिहितांना मी अगदीं निर्भीडपणें लिहीत असें. दर आठवड्याला निदान ५–६ तरी पत्रें मला रशियांतून येत असत आणि त्या पत्रलेखकांत विद्यार्थी, शिक्षक, लहान मुलें, शास्त्रज्ञ व टीकाकार अशा सर्वांचा भरणा असे.

सोव्हिएट यूनियनहून अमेरिकेला विमानानें टपाल येण्यास साधारणपणें दोन ते तीन दिवस लागतात. कम्युनिस्ट पक्षाबरोबरचे संबंध तोडून टाकल्याची घोषणा करणारी माझी मुलाखत १ फेब्रुवारी १९५७ रोजीं प्रसिद्ध झाली. त्यानंतर लेखक-संघाच्या दोन अधिकाऱ्यांनीं मला पाठवलेलीं दोन पत्रें सोडलीं तर रशियाचा दरवाजा माझ्यापुरता कायमचा बंद केला गेला होता. ज्या पोलादी पडद्याचा इतके दिवस मी मोठ्या हिरीरीनें इन्कार करीत असें तोच पडदा आतां माझ्याभोंवतीं टाकण्यांत आला होता. रशियांतील टपाल खात्यानें माझ्या नांवाचीं सारीं पत्रें कसलाहि गाजावाजा न करतां पद्धतशीरपणें अडकवून ठेवलीं होतीं. तेथल्या पार्टींतील वरिष्ठ अधिकाऱ्यांखेरीज इतर कोणाला 'हॉवर्ड फास्ट' मध्यें कांहीं फरक घडून आला आहे याची कल्पना सुद्धां नव्हती. 'टाईम्स'मधील माझ्या मुलाखतींतील एक अक्षर देखील रशियांतील वृत्तपत्रांत सात महिनेपर्यंत आलें नाहीं किंवा त्या मुलाखतीनंतर 'मेनस्ट्रीम' मध्यें माझ्या भूमिकेचें समर्थन करणारा जो लेख प्रसिद्ध केला होता त्यालादेखील तिकडे प्रसिद्धि मिळाली नाहीं.

ता. १ फेब्रुवारीपासून जणूं पृथ्वीच्या एकशष्ठांश भागावरून माझें अस्तित्व एकदम लोप पावलें. इतकेंच नव्हे तर, त्यापूर्वींचे माझ्यासंबंधींचे

सर्व उल्लेखहि नष्ट करून टाकण्यांत आले. म्हणजे माझें नुसतें अस्तित्वच संपलें असें नाहीं तर माझा मागमूस, माझ्या खाणाखुणादेखील पुसून टाकण्यांत आल्या. जणूं 'हॉवर्ड फास्ट' नांवाची व्यक्ति कधीं होऊन गेलीच नव्हती !

◎ ◎ ◎

७

१९५६ च्या जूनमध्यें 'डेली वर्कर'मधील एका लेखांत मीं सोव्हिएट यूनियनमध्यें नागरिक हक्काची कशी गळचेपी होते तें दाखवून दिलें होतें व त्यावर सडकून टीका केली होती. तो लेख प्रसिद्ध झाल्यापासून पुढें मीं कम्युनिस्ट पार्टीबरोबरचे संबंध तोडल्याचें जाहीर होईपर्यंत (१ फेब्रुवारी १९५७) अमेरिकेंत ज्यांना सोव्हिएट रशियाचे अंकित देश म्हणून संबोधलें जातें अशा अनेक देशांतील पत्रकार व मुत्सद्दी मला भेटून गेले.

ते आपलीं मनें माझ्यापुढें मोकळीं करीत. क्रुश्चेव्हनें आपल्या भाषणांत उल्लेख केलेल्या अनन्वित कृत्यांपेक्षां किती तरी अघोरी घटनांचा त्यांनीं माझ्यापुढें पाढा वाचला होता. त्यांच्यापैकीं कित्येकजण त्या जुलुमाला बळी पडलेल्या त्यांच्या सहकाऱ्यांच्या आठवणीनें माझ्यापाशीं ढसढसां रडले देखील ! पण त्यांपैकीं बहुतेकांचें पालुपद एकच असे : 'योग्य वेळ येईपर्यंत आम्हांस वाट पाहात बसलें पाहिजे. कारण आम्हांला आमच्या देशाचा 'हंगेरी' व्हावयाला नको आहे. इतिहास कधीं ना कधीं तरी सत्य उजेडांत आणतोच; तोंपर्यंत आम्ही दम धरला पाहिजे.'

अशाच एका उच्चपदस्थ कम्युनिस्ट अधिकाऱ्याचे शब्द अजूनहि माझ्या कानांत घुमत आहेत. त्याच्या देशांत पसरलेलें दहशतीचें वातावरण आणि सर्वसामान्य जनतेचें बाह्य जगाबद्दलचें कमालीचें अज्ञान यांबद्दल जो कोणी सत्ताधाऱ्याशीं मतभेद व्यक्त करील किंवा स्वतःचें स्वतंत्र मत प्रतिपादन करील त्याला सोसावे लागणारे अनन्वित हाल यांबद्दल तो किती तरी वेळ माझ्याशीं बोलत होता. देशावर हुकूमत गाजविणाऱ्या कम्युनिस्ट

पुढाऱ्यांचा रुबाब, त्यांचीं प्रासादतुल्य निवासस्थानें, अंगाखांद्यावर अलंकार ल्यालेल्या त्यांच्या बायका, त्यांचीं प्रेमपात्रें आणि त्यांच्या प्रेमाचे चाळे– आणि याउलट सामान्य माणसाला जगावें लागणारें खडतर जीवन, असे किती तरी विषय आमच्या संभाषणांत येऊन गेले. तो स्वतः ज्यू होता. त्यामुळें ज्यू लोकांच्या विद्वेषाबद्दलहि तो मोठ्या पोटतिडकीनें बोलत होता.

त्यानें सांगितलेल्या बऱ्याचशा गोष्टी त्या वेळीं मला नवीन असल्या तरी आज बहुतेकांना त्या माहीत झाल्या आहेत. त्यांपैकीं कांहींचा या ठिकाणीं इच्छा असूनहि मला उल्लेख करतां येणार नाहीं. कारण ज्या वेळीं तो जायला निघाला त्या वेळीं अत्यंत कातर आवाजांत तो म्हणाला होता,

"माझा तुम्ही तिरस्कार करूं लागाल अशी एक विनंती तुम्हांस करावयाची आहे. मलासुद्धां त्याची मोठी शरम वाटते. पण— पण माझ्या-करितां नव्हे तर माझ्या बायकामुलांकरितां ती करण्यावांचून मला गत्यंतर नाहीं. मि. फास्ट, मी आज तुमच्याशीं जें कांहीं बोललों तें जर आमच्या शिष्टमंडळांतील इतर सभासदांना समजलें, फार काय, आपली एकान्तांत गांठ पडली होती, एवढें जरी त्यांच्या कानांवर गेलें तरी मी स्वदेशीं गेल्या-बरोबर मला अटक होईल आणि बहुधा मला गोळी घालून ठार करण्यांत येईल. स्वतःचा जीव वांचावा म्हणून आपलें आतांचें बोलणें षट्कर्णी होऊं न देण्याची विनंती तुम्हांला करतों आहें असें नव्हे, पण माझ्या बायका-पोरांना माझी फार गरज आहे हो! आमच्या देशांतील आजच्या परिस्थितींत माझ्यामागें जगणें त्यांना असह्य होईल. म्हणून म्हणतों कीं, मला जगण्यांत मोठें स्वारस्य वाटतें आहे असें नव्हे, पण माझ्या बायका-मुलांसाठीं मला एवढी भीक घाला— आपल्या भेटीची बातमी बाहेर फुटूं देऊं नका."

आम्ही दोघांनींहि जीं स्वप्नें रंगविलीं होतीं त्याची कशी वासलात लागली तें एकमेकांना समजून चुकलें. सुदैवानें मी त्या जगांतून बाहेर पडून त्यांतील घटना उजेडांत आणूं शकलों, पण त्याला तोहि मार्ग मोकळा नव्हता. त्या अनामिक अधिकाऱ्याची स्मृति अजूनहि माझ्या मनांत तरळत राहिली आहे. याच्या खुणा या पुस्तकांत जागोजागीं विखुरलेल्या दिसतील.

◎ ◎ ◎

८

लोक कम्युनिस्ट पार्टींत कसे जातात आणि त्याहिपेक्षां नंतर ते कम्युनिस्ट पार्टीचा इतक्या कडवटपणानें त्याग कसा करतात याचें अमेरिकेंतील कांहीं कम्युनिस्टविरोधी गटांना गूढ वाटतें. बुद्धिवाद्यांच्या बाबतींत तर हा प्रश्न अधिकच ठळकपणें नजरेंत भरतो. कारण, एखादा कामगार ज्या वेळीं पार्टी सोडतो त्या वेळीं तो त्याचा गाजावाजा करीत नाहीं. पण बुद्धिवादी मात्र त्याग करतांना सारीं निवेदनें प्रसिद्ध करून आणि इतर मार्गांनीं आपल्या भूमिकेचें जोरदार समर्थन केल्याशिवाय राहत नाहीं.

मार्क्सवाद हीच आजची सामाजिक गरज आहे असें मानणारे दोन वर्ग आजच्या समाजांत आढळतात आणि कम्युनिस्ट पार्टीचा तर असा दावा असतो कीं, मार्क्सवादी सिद्धान्त प्रत्यक्ष व्यवहारांत उतरवून दाखविण्याचें कार्य जर कोण करीत असेल तर ती कम्युनिस्ट पार्टीच. कामगारवर्ग मार्क्सवादाकडे ओढला जातो तो त्याचे दैनंदिन लढे लढविण्याचें एक हत्यार म्हणून. या उलट, समाजाचें आजचें वास्तव स्वरूप मार्क्सवादामुळेंच आकलन होऊं शकेल अशा समजुतीनें बुद्धिवादी त्याचा स्वीकार करतात. कारण, समाजांतील निरनिराळ्या अंतःप्रवाहांचें नीट आकलन झालें नाहीं तर निराशा आणि वैफल्य यांत आपण गाडलें जाऊं असें त्यांना वाटत असतें. या ठिकाणीं मला मार्क्सवादाच्या गुणावगुणांची चर्चा करावयाची नाहीं, तर मार्क्सवाद ही एक शक्ति कशी होऊन बसली आहे एवढेंच मला सांगावयाचें आहे.

तरुणवर्ग मार्क्सवादाचा अंगीकार करतो तो केवळ उच्छृंखलपणा म्हणून नव्हे. जनतेंत पसरलेलें अज्ञान, अडाणीपणा आणि अंध रूढि यांचा प्रतिकार करण्याच्या हिरीरीनें तो मार्क्सवादी आंदोलनांत सामील होतो. पण जनतेला समाजाच्या जोखडांतून मुक्त करण्याच्या प्रयत्नांत तो स्वतः कम्युनिस्ट पार्टीचें जोखडच आपल्या गळ्यांत बांधून घेतो, हा भाग निराळा !

कम्युनिस्ट पार्टी म्हणजेच मार्क्सवाद असें मला म्हणावयाचें नाहीं. कम्युनिस्ट पार्टी स्वतःला मार्क्सवादी म्हणवून घेत असल्यामुळें आज

मार्क्सवादाला एक प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे आणि तें नांव सर्वतोमुखीं झालें आहे हें मात्र खरें ! पण त्याचबरोबर कम्युनिस्ट पार्टीमुळेंच मार्क्स-वादाचें विडंबन होत आहे. आणि त्या संघटनेला व तिच्यांत सामील होणाऱ्या व्यक्तींना विकृत वळण लागत आहे हेंहि कांहीं खोटें नाहीं. घरच्या अठरा विश्वें दारिद्र्यामुळें १९३० सालच्या सुमारास मी जहाल मतवादी बनलों. अर्थात् त्या वेळीं कामगारवर्गाच्या दृष्टिकोनांतून मी त्या आंदोलनाकडे पाहात असें. १९४३ सालीं मी कम्युनिस्ट पार्टीचा प्रत्यक्ष सभासद झालों त्या वेळेला मी कामगार राहिलों नव्हतों. परंतु लेखक म्हणून मी प्रतिपादीत असलेलीं तत्त्वें कम्युनिस्ट पार्टीच्या मार्फतच आचरणांत येऊं शकतील अशी माझी खात्री होऊन चुकली होती. तथापि, त्यासाठीं विचारांची जी घडी बसली होती ती त्यामुळें अजिबात विस्कटून जाणार आहे याची त्या वेळीं मला कल्पना आली नाहीं.

पूर्व युरोपांतील असाच आणखी एक मुत्सद्दी स्वतः कम्युनिस्ट असून देखील आपल्या पुढाऱ्यांविषयीं अत्यंत तिरस्कारानें बोलत होता. त्या-पाठीमागची भावना नीट समजावून घेतली पाहिजे. ती जाणून न घेतां कम्युनिझमला नांवें ठेवलीं तर तें अदूरदर्शीपणाचें ठरेल. कारण कम्युनिस्ट पक्षांतील बडीं धेंडें म्हणजे कांहीं कम्युनिझम् किंवा रशिया नव्हे. इतकेंच काय, पण पुढारी म्हणजेच त्यांचा पक्ष असेंहि नव्हे. उलट पक्षामुळें पुढाऱ्यांना महत्त्व प्राप्त झालेलें असतें. सोव्हिएट रशियांत समाजवादाची उभारणी केली ती या पुढाऱ्यांनींच असें मानणें म्हणजे फार मोठी प्रतारणा करण्यासारखें आहे. जर कोणाची तशी समजूत असेल तर त्यानें क्रुश्चेव्हचें तें कुप्रसिद्ध भाषण वाचावें म्हणजे स्टॅलिन आणि त्यांच्याभोंवतीं जमा झालेले मारेकरी हे शिल्पकार होते कीं शत्रु होते याविषयीं कसलीहि शंका त्यांच्या मनांत उरणार नाहीं. क्रुश्चेव्हनें स्वतःच असा निर्वाळा दिला आहे कीं, नाझींचा पाडाव झाला त्याचें खरें श्रेय स्टॅलिन किंवा त्याची हांजी हांजी करणारे त्याचे सहकारी यांच्याकडे मुळींच जात नाहीं. उलट त्यांनीं केलेल्या अनंत चुकांमुळें सारें राष्ट्र बेचिराख होण्याच्या पंथाला लागलेलें असतांना देखील केवळ तेथील जनतेच्या असामान्य कर्तृत्वामुळें त्याचें पुनरुत्थान होऊं शकलें. कोणीं स्वतंत्र वृत्ति दाखविली किंवा थोडेंसें निराळें

मत प्रदर्शित केलें तर त्याला स्टॅलिनचें एकच उत्तर असे आणि तें म्हणजे, " दंडुका, बदडा अन् पुन्हा बदडा." स्टॅलिनचें हें वर्णन रशियाच्या शत्रूनें केलेलें नाहीं, तर मीं खुद्द रशियन मुत्सद्द्याच्या तोंडूनच तें ऐकलेलें आहे. स्टॅलिन-सारख्या वरिष्ठ पुढाऱ्यांनीं समाजवादाची उभारणी तर केली नाहींच; उलट समाजवादाचें थडगें मात्र त्यांनीं आपल्या दुष्कृत्यांनीं खोदून ठेविलें.

त्या स्टॅलिनच्या मृत्यूनंतरहि एके काळच्या त्याच्या सहकाऱ्यांच्या एकमेकांविरुद्ध ज्या कारवाया चालल्या आहेत, आपल्या मार्गांत येणाऱ्यांचा कांटा काढण्यासाठीं ते जीं कारस्थानें रचीत आहेत तें पाहिलें म्हणजे असें वाटूं लागतें कीं, आपल्या नित्याच्या व्यवहारांत चूर असलेल्या सामान्य नागरिकांच्या असंतोषाचा केव्हां ना केव्हां भडका उडेल आणि मग त्यापुढें कोणाचाच निभाव लागणार नाहीं.

लेनिननें उभारलेल्या केन्द्रानुवर्ती पक्षसंघटनेची ही करुण कहाणी आहे. गेल्या तीस वर्षांत कम्युनिस्ट पार्टीच्या नांवाखालीं जे अनन्वित प्रकार झाले, त्यांची संगति केवळ 'व्यक्तिमाहात्म्य' असें म्हणूनच लावतां येणार नाहीं. क्रुश्चेव्हच्या भाषणावर मल्लिनाथी करतांना या व्यक्ति-माहात्म्याचें स्तोम माजविण्यांत आलें आणि क्रुश्चेव्हनेंच ती व्यक्तिपूजा मोडून सामुदायिक नेतृत्व प्रस्थापित करण्याचें आश्वासन दिल्यामुळें आतां सर्व दुःखाचें मूळ नाहींसें होईल अशी भाबडी आशा निर्माण केली जाते. पण कम्युनिस्ट तत्त्वप्रणालींत व्यक्तीला इतके अमर्याद अधिकार मिळतातच कसे? किंवा पक्षाच्या हातीं कर्तुमकर्तुम् शक्ति येते कशी? सत्तेचा हव्यास कशामुळें निर्माण होतो? आणि जुलमाला अवसर मिळाल्यामुळें जुलूम-शहांची चलती कशी होऊं लागते, याचें विश्लेषण करण्याच्या भानगडींत कम्युनिस्ट कधींच पडत नाहींत.

◎ ◎ ◎

१

कुश्चेव्हचें २०व्या कॉंग्रेसपुढील भाषण ' न्यू यॉर्क टाईम्स 'च्या ५ जूनच्या अंकांत प्रथम छापून आलें. दुसऱ्या दिवशीं तें ' डेली वर्कर ' मध्यें प्रसिद्ध करावयाचें किंवा नाहीं याची चर्चा करण्यासाठीं आम्ही ॲलन् मॅक्सच्या कचेरींत जमलों होतों. तेथें जमलेल्या सर्वांनीं तें भाषण वाचलेलेंच होतें. आणि त्यांतील भयानकतेची छाया अजूनहि त्यांच्या चेहऱ्यावर दृग्गोचर होत होती. त्या वेळीं घडलेला प्रसंग मी कधींहि विसरणार नाहीं. कुश्चेव्हच्या भाषणानें झालेलें सत्यदर्शन इतकें विदारक होतें कीं, त्याचें वर्णन करणें केवळ अशक्य आहे. आम्ही सर्वचजण प्रौढ होतों. पोरसवदा असा आमच्यांत कोणीच नव्हता. आम्हीं आमचीं जीवन-पुष्पें कम्युनिझमच्या प्रचाराकरितां वाहिलेलीं होतीं. आमच्यापैकीं प्रत्येकानें कमालीचा त्याग केलेला होता. पार्टीसाठीं हंसतमुखानें कारावास पत्करला होता. इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष मृत्यूला कवटाळण्यास देखील आम्ही सदैव तयार होतों. संपत्ति, मानमरातब किंवा कीर्ति या सर्वांवर लाथ मारून समता आणि बंधुभाव प्रस्थापित करण्याच्या ध्येयानें आम्हीं वेडे झालों होतों. गेलीं दहा-बारा वर्षें राज्यसत्तेचा रोष पत्करून आम्ही हालअपेष्टांत दिवस काढीत होतों. परंतु या ध्येयवादाची आणि पराकोटीच्या त्यागाची परिणति शेवटीं कशांत होईल तें कुश्चेव्हच्या भाषणानें मला पुरतें समजून चुकलें होतें. म्हणून चर्चेच्या ओघांत मी म्हणलों होतों, " आज आपण जें वाचतों आहोंत, आणि त्यावरून आपणाला जो बोध होतो आहे, तो लक्षांत घेतां आपल्या पक्ष-प्रमुखांच्या हातीं देखील अशी सत्ता असती तर आपल्यापैकीं कोणीच आजच्या ठिकाणीं दिसला नसता, याबद्दल आपणा सर्वांचीच खात्री पटली असेल."

सर्वांनीं आपल्या नजरा माझ्याकडे रोखल्या, परंतु तेथें पसरलेल्या शांततेचा भंग मात्र कोणींच केला नाहीं. आमचे मार्ग यापुढें एक राहिले नव्हते. आम्ही मृत्यूच्या तडाख्यांत सांपडलों नव्हतों; पण त्याच्या दारापर्यंत डोकावून खासच आलों होतों. अनेकांच्या मृत्यूचें रहस्य आतां उघड झालें होतें. आणि ती जाणीव किती भयानक होती? आमच्यापैकीं प्रत्येकानें

एकाच ध्येयानें प्रेरित होऊन आपापल्या कुवतीनुसार आपलें सारसर्वस्व समर्पण केलें होतें, आणि त्याबद्दल आम्हांला इनाम काय मिळणार होतें तर मृत्यु ! आमच्यापैकीं प्रत्येकाला आतां त्याची जाणीव होऊन चुकली होती.

◎ ◎ ◎

१० या पुस्तकांत क्रुश्चेव्हच्या भाषणांचा उल्लेख वारंवार आला आहे. कारण त्या भाषणांमुळेंच माझ्या आयुष्याला निराळें वळण लागलें. त्या भाषणांत नमूद केलेल्या अनेक गोष्टींचा उल्लेख यापूर्वींहि कम्युनिस्ट विरोधकांनीं जाहीरपणें केलेला होता हें मला एकदम मान्य आहे. पण त्रयस्थ निरीक्षकाच्या दृष्टीनें कम्युनिस्ट पक्षावर करण्यांत आलेले आरोप एवढेंच त्याचें स्वरूप होतें. त्यासंबंधींचा निर्णायक असा पुरावा सादर करण्यांत आलेला नव्हता. आरोप आणि पुरावा यांत फार फरक आहे, हें तर मान्य केलेंच पाहिजे. पण क्रुश्चेव्हच्या भाषणामुळें त्या आरोपांना पुराव्याची बळकटी आली.

ज्यांनीं तें भाषण वाचलेंच नाहीं त्यांचा कम्युनिस्ट विरोधकांवर विश्वास कसा बसावा ? त्या गुप्त भाषणाच्या हजारों प्रती बेकायदेशीरपणें हंगेरींत वांटल्या गेल्या आहेत अशी माझी खात्री आहे. इतकेंच नव्हे तर तेथें घडून आलेल्या क्रांतीला त्यामुळें बराच हातभारहि लागलेला आहे. अमेरिकेंतील कम्युनिस्ट पार्टीवर देखील त्याचा असाच परिणाम घडून आला. पोलंड-मधील कम्युनिस्ट पार्टीच्या एका वर्तमानपत्रांत ज्यू लोकांवर कसे अनन्वित अत्याचार करण्यांत आले आणि कितीजणांना यमसदनास पाठविण्यांत आलें त्याची यादी प्रसिद्ध झाली होती. विख्यात अशा ज्यू लेखकांचे रशियांतील गुप्त पोलिसांनीं कसे मुडदे पाडले त्यासंबंधींच्या त्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेल्या हकीगतींवर आमचा विश्वासच बसला नसता. कारण रशियासंबंधीं आम्हीं भलत्याच कल्पना करून घेतल्या होत्या.

पण त्या बाबतींत आमचा संपूर्ण भ्रमनिरास झाल्यानंतर—मला वाटतें १९५६ च्या जुलैंत असेल—पक्षाचा एक सभासद माझ्याकडे आला व त्यानें अशी सूचना केली कीं, ज्यू लोकांवर झालेल्या अत्याचारांसंबंधीं सोव्हिएट पुढाऱ्यांना खुलासा विचारणारें एखादें अनावृत पत्र आपण प्रसिद्ध करावें. ( अद्यापपर्यंत असा कोणताहि खुलासा सोव्हिएट पुढाऱ्यां-कडून प्रसिद्ध करण्यांत आलेला नाहीं. )

मला ती सूचना पसंत पडली. मीं पत्राचा एक मसुदा तयार केला. तो प्रसिद्ध करण्यापूर्वीं प्रमुख कम्युनिस्ट पुढाऱ्यांच्या सह्या मिळविण्यासाठीं म्हणून आम्हीं पक्षाची खास बैठक बोलाविली. पक्षाच्या प्रमुख नेत्यांपैकीं एकटा जॉन गेस्ट काय तो त्या बैठकीला हजर होता. त्याशिवाय मॉरिस शॅप्स् हा ज्यू इतिहासकारहि आला होता. चर्चेच्या वेळीं ' मॅन्चेस्टर गार्डियन '-मध्यें आलेल्या एका लेखमालेचा उल्लेख त्यानें केला. माझ्या समजुतीप्रमाणें मॉस्कोंतील २० ज्यू इसमांवर भरण्यांत आलेल्या खटल्याचे वेळीं तेंथील कोर्टांत हजर राहिलेल्या एका ब्रिटिश बातमीदारानें ती लेखमाला लिहिली होती. त्या सर्वांवर ' झिओनिस्ट ' ज्यूवादी वाङ्मय जवळ बाळगल्याचा आरोप ठेवण्यांत आलेला होता. आणि त्यासाठीं त्यांना तीनपासून दहा वर्षांपर्यंतच्या सजा ठोठावण्यांत आल्या होत्या.

शॅप्स ही हकीगत सांगत होता. त्या वेळीं नुकताच तुरुंगांतून सुटून आलेल्या जॉन गेस्टचा चेहरा भीतीनें पांढरा फटफटीत पडला होता. त्यानें एकदम विचारलें, " पण कोणत्या कायद्याखालीं ? "

शॅप्स्‌नें रशियांतील फौजदारी कायद्याच्या एका कोणत्याशा कलमाचा उल्लेख केला. पण पुढें तो म्हणाला कीं, आपल्यापेक्षां तेथील कायदा किती तरी पटीनें वाईट आहे. त्या बैठकीला जमलेल्या आमच्यापैकीं कोणालाच ' साधा न्यू यॉर्क टाईम्स 'चा अंक किंवा तशा प्रकारचें इतर वाङ्मय जवळ बाळगल्याबद्दलदेखील रशियांत कायद्यानें शिक्षा होऊं शकते हें त्या वेळे-पर्यंत माहीत नव्हतें. पण विशेष म्हणजे शॅप्स्‌नें सांगितलेल्या त्या हकीगतीवर आम्हीं विश्वास ठेवला. क्रुश्चेव्हच्या भाषणापूर्वीं कोणीं आम्हांला हें सांगितलें असतें तर त्या वेळीं मात्र आम्हीं त्याच्यावर विश्वास ठेवला नसता. पार्टीकडे

बघण्याचा आमचा दृष्टिकोण आतां मूलतःच बदलून गेला होता. बैठकीला जमलेल्यांपैकीं अनेकांना जरी त्या पत्रकावर सही करण्याचें धैर्य झालें नाहीं, तरी त्यांनीं आपला तिरस्कार आणि संताप त्या बैठकींत व्यक्त केला.

केवळ क्रांतिकारी गरज म्हणून क्रुश्चेव्हला तो गुप्त अहवाल प्रसिद्ध करावा लागला हें मी कधींच मान्य करणार नाहीं. कारण, रशियन राज्यक्रान्तीचा इतिहास ज्यानें वाचला आहे त्याला हें माहीत आहे कीं, क्रान्तीच्या सुरुवातीच्या काळांत जनतेच्या स्वातंत्र्यावर फार मोठा भर देण्यांत आला होता. वर ज्या दडपशाही कृत्यांचा उल्लेख केला आहे, त्याची सुरुवात १९३० पासून झाली. स्टॅलिन सत्ताधारी झाल्यापासून रशियांतील परिस्थितीचें सत्यदर्शन आतां प्रथमच होत आहे, आणि क्रुश्चेव्हच्या भाषणानें त्याला बळकटीच आली आहे.

रशियाचें किंवा कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीचें अंतरंग नीट जाणून घ्यायचें असेल तर प्रत्येकानें क्रुश्चेव्हचें हें भाषण वाचलें पाहिजे. सोव्हिएट पद्धतीची बदनामी करावी म्हणून केवळ मी असें म्हणत नाहीं, तर जागतिक शांतता आणि सामाजिक न्याय यांच्या रोखानें जनतेचीं पावलें पडावींत असें वाटत असेल तर त्यांनीं हें भाषण वाचणें अवश्य आहे असें मला वाटतें. प्रगतीची मक्तेदारी कम्युनिस्ट पार्टीनें निर्माण केलेल्या सोव्हिएटछाप समाजवादाकडेच असूं शकते ही भावना जोंपर्यंत जात नाहीं तोंपर्यंत जगांत स्वातंत्र्याचें वारें खेळूं शकणार नाहीं. असा प्रश्न विचारला जातो कीं, वासाहतिक देशांतील जनता आपल्या स्वातंत्र्यासाठीं झगडत असतांना कम्युनिस्ट पार्टी तिला नेहमीं पाठिंबाच देते, आणि तेथील जनताहि कम्युनिस्ट विचारसरणीकडे अधिकाधिक आकृष्ट होते हें कसें? या प्रश्नाचें उत्तर इतकेंच आहे कीं, जगांत आज सत्तेसाठीं जो संघर्ष चालू आहे त्यांत रशियन मुत्सद्दी हे आपल्यापेक्षां अधिक चातुर्यानें वागत आहेत.

सुमारें वर्षापूर्वीं सोव्हिएट यूनियनला जाऊन आलेल्या एका मित्राचा अनुभव येथें देण्यासारखा आहे. कम्युनिस्ट पार्टीतर्फे गेलेल्या एका ज्यू लोकांच्या समितीचा प्रतिनिधि म्हणून तो गेला होता. पूर्वींइतकाच आजहि तो कम्युनिस्ट पार्टीशीं एकनिष्ठ आहे. अर्थात् तेथें आलेल्या अनुभवानंतर तो कम्युनिस्ट कसा राहूं शकतो हें मात्र मी सांगूं शकत नाहीं.

तिकडून परत आल्यानंतर तो माझ्याकडे आला होता आणि जवळ-जवळ दोन तास आम्ही बोलत बसलों होतों. त्या वेळीं आमच्यांत जो संवाद झाला तो यापूर्वी कधींच होऊं शकला नसता. कुश्चेव्हच्या भाषणामुळेंच आम्ही एकमेकांशीं इतक्या विश्वासानें आणि आत्मीयतेनें बोलूं शकलों. शेवटीं एका जबाबदार पोलिस अधिकाऱ्याचा निर्वाळा देऊन तो मला म्हणाला,

" हॉवर्ड, ही गोष्ट क्षुल्लक आहे असें तूं समजूं नकोस. त्यानें – पोलीस अधिकाऱ्यानें–मला खात्रीपूर्वक असें सांगितलें आहे कीं गेल्या कांहीं वर्षांत सुमारें दीड कोटी लोकांना तुरुंगाची किंवा कॉन्सेन्ट्रेशन कॅम्पची हवा खावी लागली आणि त्यांपैकीं जवळजवळ ५० लाख लोक मृत्युमुखीं पडले."

माझा त्यावर विश्वासच बसेना आणि मीं त्याला तसें सांगितलेंहि. तेव्हां तो अत्यंत दुःखपूर्ण आवाजांत मला म्हणाला, " अरे माझासुद्धां विश्वास बसत नव्हता, पण ही एक सत्य घटना आहे. हें दुर्दैवानें मला कळून चुकलें आहे." हा प्रसंग विसरून जाणें कधीं तरी शक्य आहे काय ? हे सर्व प्रकार कानांवर पडत असतांना त्यासंबंधीं मूग गिळून आपल्या नित्याच्या व्यवहारांत रमून जाणें म्हणजे स्वतःची माणुसकी विसरण्यासारखें नाहीं का ? "

◎ ◎ ◎

११

या पुस्तकाचा मुख्य हेतु लेखक आणि राजकारणी यांचा अन्योन्य संबंध कम्युनिस्ट पार्टींत कसा असतो तें विशद करण्याचा आहे. कम्युनिस्ट पक्षाचा सारा इतिहास हा लेखकांना पक्षाच्या निष्ठेमुळें सहन कराव्या लागलेल्या यातना आणि पक्षाविषयीं त्यांच्या मनांत वसत असलेली नितान्त आदराची भावना यांमधील संघर्षांनीं भरलेला आहे. पण हा एक भाग झाला. माझ्या दृष्टीनें कम्युनिस्ट पार्टीचें संपूर्ण आकलन न होतां केवळ त्या पक्षांतील लेखकांच्या मनःस्थितीची कल्पना आली तरी त्यानें विशेष

क्रमांक १२७६ नों० दि:

कांहीं साधणार नाहीं. कम्युनिस्ट पार्टी ही केन्द्रानुवर्ती असते. विशिष्ट ध्येयासाठीं सर्वांनीं आपापलीं मतें बाजूला सारलीं पाहिजेत आणि केन्द्रस्थानीं असलेल्या नेत्याचे आदेश बिनतक्रार पाळले पाहिजेत. हा कम्युनिस्ट चौकटीचा गाभा म्हणतां येईल. पण त्यामुळें पक्षांत दोन घृणास्पद अशा प्रवृत्ति निर्माण होतात. एक म्हणजे पुढाऱ्यांविषयींचा तिरस्कार आणि दुसरा म्हणजे गटबाजी. या दोन प्रवृत्तींचा बुजबुजाट होऊन पार्टी आंतून अगदीं पोखरली जाण्याची वेळ आली तरी तिचें स्वरूप केन्द्रानुवर्ती असल्यानें पक्षांत गट असल्याचा साफ इन्कार करण्यांत येतो. गटबाजी आणि निरनिराळ्या पुढाऱ्यांच्या विरुद्ध कारवाया या मात्र चालूच असतात.

वर नमूद केल्याप्रमाणें ' डेली वर्कर 'मध्यें काम करणारे आम्ही कांहीं जणच तेवढे पक्ष विसर्जित करून टाकावा अशा मताचें होतों असें नाहीं. कम्युनिस्ट पार्टीचें जें स्वरूप आहे त्यामुळें छळणूक, पाशवी अत्याचार आणि देहदंड हे कसे अनिवार्य होऊन बसतात याची जाणीव झालेले आणखीहि बरेचसे लोक या वेळीं पक्षांत होते. तो गुप्त अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर कांहीं दिवसांनीं माझा एक जुना मित्र डेट्रॉइटहून मला भेटण्यासाठीं न्यू यॉर्कला आला होता. अनेक दिवसांपासून कम्युनिस्ट पार्टीचा एक सच्चा कार्यकर्ता म्हणून मी त्याला ओळखत होतों. डेट्रॉइटमधील कामगारांची संघटना उभारण्यासाठीं त्यानें अनन्वित कष्ट उपसले होते. आणि अपार त्याग केला होता. त्यामुळें सरकारचा त्याच्यावर रोष होता. त्यामुळें कोठल्याहि कारखान्यांत त्याला थारा मिळत नसे. माझ्याशीं झालेल्या चर्चेच्या वेळीं तो मला म्हणाला,

" हॉवर्ड, मी कुठेंहि गेलों, माझ्याविषयीं मालकांच्या मनांत अढी असली, क्वचित् प्रसंगीं ते माझा तिरस्कारहि करीत असले, तरी मी एवढें निश्चित सांगूं शकतों कीं, ते मला अप्रामाणिक समजत नाहींत. मला कांहीं एक प्रतिष्ठा आहे, मानसन्मान आहे, हें तेहि जाणून आहेत. पण क्रुश्चेव्हच्या भाषणानें ही प्रतिष्ठा आणि मानसन्मान पार धुळीला मिळून गेला आहे. आतां मी हें तोंड तरी जगाला कसें दाखवूं ? "

पण इतकें सारें होऊनहि शेवटीं तो पार्टींतच राहिला. कारण पार्टीवरच त्याचें जीवन अवलंबून होतें.

इतर व्यवसाय करणाऱ्या बुद्धिवाद्यांना पक्ष सोडण्याचा निर्णय घेणें सोपें असतें; कारण त्याच्या आशा-आकांक्षांचीं क्षितिजें ते रुंदावूं शकतात किंवा दुसऱ्या एखाद्या संघटणेंत सामील होणेंहि त्यांना शक्य असतें. पण कामगारांच्या दृष्टीनें मात्र कम्युनिस्ट पार्टी हेंच एकमेव आशास्थान असतें. पक्षांतील दोष आज ना उद्यां सुधारतां येतील अशी भाबडी आशा ते तरी निदान बाळगूं शकतात. पण कम्युनिस्ट पक्षच नष्ट करून टाकला तर त्यांच्या विमोचनाचा मार्ग कोण दाखविणार, असें त्यांना वाटत असतें.

ही झाली एका कामगाराची प्रतिक्रिया. याच्या उलट एका उच्चभ्रू महिलेचा मला आलेला अनुभव हादेखील येथें नमूद करण्यासारखा आहे. मोठी सुसंस्कृत, सुविद्य आणि मनमिळावू अशी मध्यमवर्गीतील एक स्त्री माझ्या आणि माझ्या पत्नीच्या दाट परिचयाची होती. ती स्वतः चांगली बुद्धिमान्, कर्तबगार आणि समाजांत प्रतिष्ठा असलेली अशी होती. आणि तिचें लग्नहि एका चांगल्या विद्वान् माणसाशीं झालेलें होतें. क्रुश्चेव्हचें भाषण प्रसिद्ध झाल्याच्या दुसऱ्या दिवशीं मला तिचा टेलिफोन आला : " मी तें भाषण वाचण्यांत निष्कारण वेळाची खराबी तर केली नाहीं ना ? " असें तिनें मला विचारलें, " एकदांच नव्हे तर दोनदां आणि तें देखील अतिशय काळजीपूर्वक. मीं तें भाषण वाचलें आहे." असें सांगून उलट, ' तिनें तें वाचलें नाहीं का ? ' असें जेव्हां तिला मीं विचारलें तेव्हां, " सोव्हिएट यूनियनची नालस्ती करण्यासाठीं सरकारतर्फे प्रसिद्ध होणारीं असलीं बनावट पत्रें मी वाचीत नसतें " असें मोठ्या फणकाऱ्यानें तिनें उत्तर दिलें. आणि ती पुढें म्हणाली, " आणि समजा, कधीं काळीं मी तीं वाचलींच तरी त्याचा माझ्यावर कांहींहि परिणाम होणार नाहीं. सोव्हिएट यूनियन किंवा कम्युनिस्ट पार्टी यांविषयींचीं माझीं मतें असल्या अपप्रचारानें जरादेखील बदलणार नाहींत. कारण, त्या दोहोंचीहि मला पुरती माहिती आहे."

गंमत अशी कीं, ती कधीं रशियाला गेली नव्हती किंवा कम्युनिस्ट पार्टीची सभासदहि नव्हती. पक्षांतील ज्या सभासदांशीं तिचा संबंध आला होता, त्यांच्याबद्दल तिचें मत फार चांगलें होतें. आणि तेवढ्यावरूनच कम्युनिस्ट पार्टीविषयीं तिनें वरील ग्रह करून घेतला होता. कशामुळेंहि

तिच्या मतांत पालट घडून येणें शक्यच नव्हतें. आणि आजहि ती आणि तिचा नवरा पूर्वीइतकेच कम्युनिस्ट पार्टीचे कट्टर अभिमानी आहेत.

ही झाली एक तऱ्हा! पण एखादें निवेदन प्रसिद्ध झालें तरी तें न वाचणारी मंडळी किती तरी असतात. आणि विशेषतः तें निवेदन प्रदीर्घ, अतिशय क्लिष्ट भाषेंत लिहिलेलें आणि बारीक टाईपमध्यें छापलेलें असलें म्हणजे तर विचारूंच नका! क्रुश्चेव्हच्या भाषणाइतक्या महत्त्वाच्या प्रकाशनावर अगदीं ओझरता दृष्टिक्षेप टाकलेले अनेक कम्युनिस्टहि मला माहीत आहेत. पण त्याहिपेक्षां त्या भाषणाकडे ढुंकूनहि न पाहिलेले कम्युनिस्ट देखील कांहीं थोडेथोडके नाहींत. अर्थात् आपल्या समर्थनार्थ ते नाना सबबी पुढें करतात. पण त्या सगळ्या लंगड्याच असतात. खरें म्हणजे त्यांना असें कांहीं वाचण्याची भीतीच वाटत असते.

◎ ◎ ◎

## १२

सोव्हिएट यूनियनच्या कम्युनिस्ट पार्टीचा इतिहास हें कम्युनिझमची सभा घेऊं इच्छिणारांसाठीं नेमलेलें अधिकृत पुस्तक समजलें जातें. सबंध जगांतील कम्युनिस्ट वर्तुळांत त्या पुस्तकाची फार चहा केली जाते. परंतु खरें बोलावयाचें तर सोव्हिएट यूनियनमध्यें कम्युनिस्ट पक्षाची उभारणी कोणत्या विचारसरणीच्या आधारावर झालेली आहे हें त्या पुस्तकावरून अजिबात समजत नाहीं. सबंध पुस्तक एकाच भावनेनें ओथंबून गेल्याचें तटस्थ वाचकाला आढळून येतें; आणि ती भावना म्हणजे नवागत कम्युनिस्टांसमोर एक आधिदैवत उभें करून त्याचें स्तोम माजवायचें. पुस्तकांत "नव्या स्वरूपाचा" पक्ष म्हणून ठिकठिकाणीं उल्लेख आलेला आहे. पण हें नवें स्वरूप म्हणजे काय? जुन्या स्वरूपापेक्षां त्यांत निराळें काय आहे, आणि पक्षाचें कार्य प्रत्यक्ष कसें चालतें यावर कसलाहि प्रकाश पडत नाहीं. नव्या-जुन्या स्वरूपांतील फरक दाखवून देणारीं कांहीं पृष्ठें दुर्दैवानें पुस्तकांतून गाळून टाकण्यांत आलीं आहेत. ट्रॉट्स्की, झिनोव्हिव, कामेनेव्ह किंवा

बुखारिन, रायकॉव्ह यांच्यासारख्या प्रतिक्रान्तिकारकांच्या गटांनीं पक्षावर केलेले हल्ले परतवून लावून बोल्शेव्हिकांनीं पक्षाचें स्वरूप शुद्ध कसें राखलें आणि त्याची अधोगति कशी टाळली त्याचीं अतिरंजित आणि असंभाव्य वर्णनें पुस्तकांत जागोजागीं सांपडतात. पण त्या गटाबरोबरचे मतभेद नक्की काय होते त्याचा मात्र सबंध पुस्तकांत कोठें पत्ता लागत नाहीं. पक्षांतील त्या वेळच्या अल्पसंख्य गटाचें प्रतिपादन क्वचित् उजेडांत आलें असेल तर तेवढा अपवाद वगळून त्यांच्या भूमिकेचें विवेचन किंवा बहुसंख्य म्हणजे बोल्शेव्हिक गटानें विशिष्ट भूमिका कां घेतली त्याचा खुलासा कोठेंहि करण्यांत आला नाहीं.

थोडक्यांत सांगावयाचें तर तें पुस्तक मोठें विलक्षण आहे. त्याची भाषाशैली कांहीं औरच आहे. परमतांबद्दल जहरी टीका, हीन विशेषणें आणि छोटीं छोटीं आदेशात्मक वाक्यें हीं त्या पुस्तकाचीं वैशिष्ट्यें म्हणून दाखवतां येतील. आणि तरीहि जगांतील सर्व कम्युनिस्ट पक्षांत तें एखाद्या पाठ्य पुस्तकासारखें वापरलें जातें.

सुरुवातीला पक्षांतील आम्हां सभासदांना असें सांगण्यांत येत असे कीं, सोव्हिएट यूनियनमधील कांहीं मार्क्सवादी विचारवंतांनीं एकत्र येऊन संयुक्तपणें हें पुस्तक लिहिलें आहे. भाषाशैली वगैरे दोषांचें कारणहि हेंच आहे असें सांगण्यांत येई, आणि पुस्तकाच्या बाबतींत भाषाशैली किंवा वाक्यरचना यांच्यापेक्षां त्यांतील मुद्द्यांना महत्त्व दिलें पाहिजे असेंहि प्रतिपादिण्यांत येई.

त्या पुस्तकांतील विरोध-विकासवादी भौतिकवादाची चर्चा करणारें चौथें प्रकरण हें स्वतः स्टॅलिनच्या लेखणींतून उतरलें आहे. (अर्थात् या प्रकरणांत विरोध-विकासवादी विवेचन अगदीं ठोकळेबाजपणानें करण्यांत आलें आहे, हा भाग निराळा!) असा बोलबाला त्या वेळीं करण्यांत आला होता.

१९४६ सालापासून स्टॅलिन हाच या पुस्तकाचा एकमेव कर्ता आहे, असें सोव्हिएट यूनियनमधून सांगण्यांत येऊं लागलें. त्यामुळें साहजिकच आम्ही फार गोंधळून गेलों. कारण पुस्तकांत सुरुवातीपासून शेवटपर्यंत

स्टॅलिनचा उल्लेख तृतीय पुरुषीच केलेला आहे. यासंबंधीं कुजबूज सुरू झाल्यावर अशी सारवासारव करण्यांत आली कीं, पुस्तक जरी प्रत्यक्ष स्टॅलिननें लिहिलें नसलें तरी त्यामागची प्रेरणा ही त्याचीच आहे. आणि लेखक म्हणून त्याच्या नांवाचा जो उल्लेख केला जातो तोदेखील वस्तुत: त्याच्या मर्जीविरुद्धच. त्याच्याविषयींच्या नितान्त आदराचें तें एक प्रतीक आहे इतकेंच. शेवटीं कुश्चेव्हच्या भाषणांनीं हा सगळाच बुडबुडा फुटला. आपल्या गुप्त अहवालांत कुश्चेव्ह यासंबंधीं काय म्हणतो पहा :

"......हें पुस्तक पक्षाच्या मध्यवर्ती समितीनें नेमलेल्या एका मंडळानें लिहिलेलें आहे हें सर्वश्रुत आहे."

जातां जातां हेंहि नमूद केलें पाहिजे कीं, या पुस्तकांतहि व्यक्तिमाहात्म्य डोकावत असल्याचा पुरावा देतां येण्यासारखा आहे. 'शॉर्ट बायग्रॉफी ऑफ स्टॅलिन' (स्टालिनचें संक्षिप्त चरित्र) या पुस्तकाच्या मुद्रणप्रतींत खालील वाक्य होतें : "ऑल यूनियन कम्युनिस्ट पार्टीच्या (बोल्शेव्हिक) मध्यवर्ती समितीनें नेमलेल्या मंडळानें कॉ. स्टॅलिनच्या मार्गदर्शनाखालीं आणि प्रत्यक्ष सहकार्यानें (हें पुस्तक) लिहिलें."

पण एवढ्यानें स्टॅलिनचें समाधान झालें नाहीं. त्यानें त्या वाक्यांत खालील बदल करायला लावला :

"१९३८ सालीं कॉ. स्टॅलिननें लिहिलेलें आणि (बोल्शेव्हिक पार्टीच्या) मध्यवर्ती समितीनें नेमलेल्या मंडळानें मान्यता दिलेलें (हें पुस्तक) प्रसिद्ध झालें." यावर आणखी भाष्य करण्याची कांहीं आवश्यकता आहे का?

समितीनें संयुक्तपणें लिहिलेल्या पुस्तकाचें जनकत्व **हातोहात** स्टॅलिनला बहाल करण्यांत आलें. हा बदल कां आणि कसा घडून आला हें सहज समजण्यासारखें आहे.

त्या पुस्तकाच्या अमेरिकन आवृत्तींतील पृष्ठ १४२ मधील मजकूर येथें उद्धृत करण्यासारखा आहे :

"मेन्शेव्हिकांची हकालपट्टी करून आपली स्वतंत्र पक्षसंघटना उभारल्या-नंतर बोल्शेव्हिकांची ताकद खूप वाढली. पक्षांतील **संधिसाधु लोकांची**

**अशी हकालपट्टी केल्यानें पक्ष बलवान् होत** जातो ( अधोरेखित मूळचें ) हें बोल्शेव्हिक पार्टीचें एक सूत्र आहे. सेकंड इंटरनॅशनलमधील लोकशाही समाजवादी पक्षापेक्षां नवीन स्वरूपाच्या बोल्शेव्हिक पार्टीच्या उभारणीमध्यें हा मूलभूत फरक आहे....

...नव्या क्रांतिकारी पक्षाची उभारणी करतांना त्या पक्षाची संघटना मुख्यतः क्रांतीला वाहून घेतलेल्या **धंदेवाईक क्रांतिकारी** ( अधोरेखित लेखकाचें ) कार्यकर्त्यांवरच आधारली पाहिजे." यावर लेनिनचा भर होता. हें निश्चित ! पण तो पक्ष अशा धंदेवाईक क्रान्तिकारकांच्या हातचें बाहुलें बनावा असें त्याला अभिप्रेत होतें असें मुळींच सिद्ध करतां येणार नाहीं. उलट आपण धंदेवाईक क्रान्तिकारकांची एक नवीच नोकरशाही भुतावळ कायमची उठवून ठेवीत आहोंत असें त्यांच्या स्वप्नांतहि आलें नसेल.

उलट रशियांतील अनेक जुन्या व जाणत्या कम्युनिस्टांनीं मला असा निर्वाळा दिला आहे कीं, आपल्या अखेरच्या दिवसांत पार्टीला जें विकृत वळण लागत चाललें होतें तें पाहून स्वतः लेनिन भयचकित झाला होता. पण या सर्व सांगोवांगीच्या गोष्टी झाल्या. लेनिनच्या हातचें अशा आशयाचें लिखाण असलेंच तर तें नष्ट करून टाकण्यांत आलें असलें पाहिजे, निदान सोव्हिएट यूनियनतर्फे अद्यापपर्यंत तरी वरील विधानाला पुष्टि मिळेल असें कोणतेंहि निवेदन प्रसिद्ध झालेलें नाहीं आणि नजीकच्या काळांत प्रसिद्ध होईल अशी अपेक्षाहि करण्यांत अर्थ नाहीं.

कम्युनिस्ट पार्टीची संघटना आणि कार्यपद्धति कशी असते त्याचा मी या ठिकाणीं ऊहापोह करणार आहें. अर्थात् तो मुख्यतः अमेरिकेंतील कम्युनिस्ट पार्टीच्या आधारेंच केला जाईल. कम्युनिस्ट पार्टीचें स्वरूप हें मूलतः केंद्रानुवर्ती आणि पिरॅमिडच्या आकृतीसारखें असतें. निरनिराळ्या देशांतील परिस्थित्यनुरूप या स्वरूपांत कमी-जास्त फरक आढळून येत असेल, परंतु सर्वसाधारणपणें कम्युनिस्ट पार्टीचा संघटनात्मक सांगाडा हा वरील ठशाचा असतो.

कम्युनिस्ट पार्टीच्या अगदीं तळाशीं जी संघटना असते तिला शाखा म्हणतात. आणि यावरच कम्युनिस्ट पार्टीचा डोलारा उभा असतो. या

शाखेतर्फे जनतेच्या जिव्हाळ्याचे दैनंदिन प्रश्न हातीं घेऊन प्रसंगीं त्यासाठीं निकराचे लढेहि दिले जातात. पण कम्युनिस्ट पार्टीच्या या शाखा पातळीवर धंदेवाईक क्रान्तिकारक कोणी असत नाहीं. कारण त्याला मानधन देण्याइतका पैसा शाखेजवळ क्वचितच असतो. मात्र शाखांचें काम चालवणारे कम्युनिस्ट कार्यकर्ते हे अत्यंत निष्ठावान् आणि त्यागी असतात आणि त्यांच्याइतक्या त्यागी चारित्र्यवान् व्यक्ति क्वचितच असूं शकतील अशी, त्यांची श्रद्धा असते.

या निष्ठेमुळेंच ते स्वतःवर अत्यंत कडवी शिस्त लादून घेतात. स्वखुशीनें स्वतःवर लादून घेतलेले इतके कठोर निर्बंध अन्य कोणत्याहि पार्टींत क्वचितच पाहावयास सांपडतात. जो कोणी ही शिस्त धाब्यावर बसवील त्याच्या मानेवर हाकालपट्टीची तलवार टांगलेली असते. पक्षांतून काढून टाकलें जाण्याइतकी शरमेची आणि नामुष्कीची गोष्ट कम्युनिस्ट सभासदाच्या दृष्टीनें दुसरी कोणतीच असूं शकत नाहीं. या बाबतींत कम्युनिस्ट पार्टीनें धर्मालादेखील मागें टाकलें आहे. एखाद्या धर्मनिष्ठ माणसाला वाळीत टाकलें जाण्याचा धाक वाटणार नाहीं इतका कम्युनिस्टाला धाक वाटतो आणि मूलतः नास्तिक किंवा पाखंडी मताचा हिरीरीनें पुरस्कार करणारा कम्युनिस्ट हा आपल्या संघटनेच्या बाबतींत एखाद्या अंधश्रद्ध धर्मवाद्यांप्रमाणें आचरण करूं लागतो. एकदां का त्याचें सभासदत्व रद्द झालें आणि पक्षांतून त्याची हकालपट्टी झाली म्हणजे तो जगांतूनच उठल्यासारखा होतो. कम्युनिस्टांच्या वर्तुळांत तर त्याला कोठें थारा मिळत नाहींच, पण कम्युनिस्टांव्यतिरिक्त इतर संघटनांचीं दारेंहि त्याला बंद होतात. कारण काढून टाकलेला सभासद हा एक तर पोलिसांचा गुप्त हेर असला पाहिजे किंवा त्याचें चारित्र्य तरी डागाळलेलें असलें पाहिजे असाच सर्व जण ग्रह करून घेतात आणि हा ग्रह कायम टिकेल अशी दक्षता जगांतील प्रत्येक कम्युनिस्ट पार्टी मोठ्या कटाक्षानें घेत असते. कारण हकालपट्टीची अशी दहशत निर्माण केल्याखेरीज स्वखुषीनें लादून घेतलेली शिस्त पक्षांत टिकूंच शकणार नाहीं. पण काढून टाकलेल्या अनेक कम्युनिस्ट सभासदांचें चारित्र्य निष्कलंक होतें, ते सर्वस्वीं बेगुनाह होते हें आतां नव्यानें सांगण्याची जरूरी राहिलेली नाहीं.

या शाखांच्या वरची पायरी म्हणजे विभाग-संघटना. अनेक शाखांचा मिळून एक विभाग होतो. आणि या ठिकाणीं मात्र धंदेवाईक क्रांतिकारकांच्या स्वरूपांत कम्युनिस्ट पार्टीचा सर्व वेळ कार्यकर्ता काम करतांना आढळतो. तथापि, थोड्याच दिवसांत त्याचें क्रांतिकारी स्वरूप जाऊन तो नोकरशहा बनतो. परिस्थित्यनुरूप विभागांत एक किंवा अनेक पगारी सर्व वेळ कार्यकर्ते असतात. वरून येणारे आदेश खालपर्यंत पोहोंचवणें आणि त्यांना अनुकूल असेंच वातावरण सदैव राहील अशी काळजी घेणें हींच त्याचीं मुख्य कामें असतात. अगदीं तळच्या सभासदांचा कम्युनिस्ट नेतृत्वाशीं संबंध येतो तो यांच्यामार्फतच! त्यांचें सारें भवितव्य हें पक्षाच्या वरिष्ठ पुढाऱ्यांच्या मर्जीवर अवलंबून असल्यामुळें ते त्यांची तळी उचलून धरूं लागतात. त्यांच्यापुढें दोनच पर्याय असतात. एक तर शेवटपर्यंत आहे त्याच जागीं राहण्यांत समाधान मानणें किंवा नाना हिकमती करून वरवरच्या पायऱ्या गांठण्याची धडपड करणें. त्यामुळें 'वरच्या लत्ता झेलून' त्या खालीं झाडणें हा त्यांचा स्वभावधर्मच होऊन बसतो. कम्युनिस्ट पार्टीच्या पिरॅमिडसारख्या संघटनेची आणखी वरची पायरी म्हणजे जिल्हा कमिटी! या जिल्हा कमिट्या बऱ्याच शक्तिशाली असतात. कांहीं ठिकाणीं त्यांच्या स्वतःच्या मोठमोठ्या कचेऱ्या असतात आणि त्यांच्यातर्फे वृत्तपत्रें, प्रकाशन-विभाग आणि पुस्तकालयेंदेखील चालविलीं जातात.

जिल्हा कमिटीच्या वरची शेवटची पायरी म्हणजे राष्ट्रीय नेतृत्व. त्यांत राष्ट्रीय कचेरी आणि तेथील नोकरवर्ग यांचा समावेश होतो. जिल्ह्यापासून खालच्या सर्व कमिट्यांवर राष्ट्रीय समितीमार्फत सत्ता चालविली जावी अशी अपेक्षा असते. या राष्ट्रीय समितींत जिल्हा समितींतील सर्व पदाधिकाऱ्यांचा, त्याचप्रमाणें कामगार आणि सांस्कृतिक संघटनांच्या प्रतिनिधींचा घटनेनुसार समावेश असतो. परंतु प्रत्यक्षांत मात्र याची अंमलबजावणी क्वचितच होते. राष्ट्रीय समितीचें कामकाज पक्षाच्या सरचिटणिसामार्फत चालतें. पक्षाचें दैनंदिन कामकाज राष्ट्रीय समितीच्या वतीनें तोच पाहात असतो.

◎ ◎ ◎

१३ तत्त्वतः कम्युनिस्ट पक्षाची संघटना लोकशाही स्वरूपाची आहे. फार काय, इतकी लोकशाही दुसऱ्या कोणत्याहि संघटनेंत सांपडणार नाहीं असा दावा केला जातो. पण त्याचबरोबर ती केंद्रानुवर्ती आहे, हेंहि मान्य केलें जातें, आणि त्यामुळेंच कम्युनिस्ट पार्टीच्या कार्यप्रणालीला, ' लोकशाहीनिष्ठ केंद्रानुवर्ती ' असें विचित्र नामाभिधान दिलेंजातें. पार्टीच्या राष्ट्रीय अधिवेशनांत प्रत्येक पातळीवरील प्रतिनिधि निवडून यावेत आणि त्यांनीं पक्षाच्या राष्ट्रीय नेतृत्वाची निवड करावी अशी अपेक्षा असते. पण माझ्या माहिती-प्रमाणें एक अपवाद सोडून असें कधींहि घडून आलेलें नाहीं. तत्त्वतः जिल्हा आणि विभाग शाखांनादेखील आपले पुढारी निवडण्याचा किंवा बदलण्याचा अधिकार असतो. परंतु वरिष्ठ नेत्यांच्या संमतीशिवाय त्यांना कांहींहि करतां येत नाहीं अशी वस्तुस्थिति आहे.

राष्ट्रीय पक्षाचें कामकाज अधिवेशनांत निवडलेल्या समितीमार्फत चाला-वयाचें असतें. कमी-जास्त अधिकार असलेले नोकरशाही वृत्तीचे पगारी कार्यकर्ते पार्टीचीं सूत्रें हालवीत असतात. पण त्यांची नेमणूकदेखील कम्युनिस्ट-संघटनेच्या उतरंडीवरील सर्वांत वरच्या पदांवर असलेल्या नेत्यांकडूनच केली जाते. जोंपर्यंत ते अशा नेत्यांची मर्जी सांभाळून असतात, तोंपर्यंत त्यांचें आसन सुरक्षित असतें. सरचिटणिसाला आपल्या मर्जीनुरूप जिल्हा कमिटींतील किंवा विभाग कमिटींतील पुढाऱ्यांची उचलबांगडी करण्याचे सर्वाधिकार असतात. अर्थात् हे अधिकार घटनेनुसार देण्यांत आलेले नाहींत. आणि त्यामुळें माझ्या वरील विधानाचा इन्कार केला जाईल. पण ज्याला कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यपद्धतीचा प्रत्यक्ष अनुभव किंवा पुरेशी माहिती आहे त्याला मी काय म्हणतों तें सहज पटेल.

पक्षाच्या धोरणासंबंधींचे महत्त्वाचे निर्णय हे पक्षान्तर्गत चर्चा करून घेण्यांत यावेत असादेखील घटनेचा दंडक आहे. खालपासून वरपर्यंतच्या कमिट्यांचीं मतें विचारांत घेऊन त्या अनुरोधानें वरिष्ठ पुढाऱ्यांनीं निर्णय घेतले पाहिजेत याचाच निर्देश पक्षान्तर्गत लोकशाही म्हणून केला जातो.

पण प्रत्यक्षांत मात्र अशा स्वरूपाची चर्चा होण्यापूर्वींच निर्णय घेऊनहि टाकलेले असतात. कांहीं वेळेला पक्षाची मध्यवर्ती समिति किंवा कार्यकारी समिति हे निर्णय घेत असले तरी अनेकदां सरचिटणीसच आपल्या अधिकारांत निर्णय घेऊन मोकळा होतो. ठरावाच्या रूपानें तो ते निर्णय मध्यवर्ती समितीकडे पाठवतो आणि मध्यवर्ती समिति क्वचित् कांहीं शाब्दिक फेरबदल करून त्या ठरावावर आपलें शिक्कामार्तब करते. तेथून ते ठराव खालच्या कमिटीकडे पाठवले जातात. अशा कमिट्यांतून होणारी चर्चा अर्थातच त्यावरील सर्व वेळ कार्यकर्ते नियंत्रित करीत असतात. त्याचबरोबर पक्षाच्या नियतकालिकांतून त्या चर्चेला इष्ट तें वळण लावण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला जातो.

निरनिराळ्या कमिट्यांवरील पक्षाचे प्रमुख पगारी कार्यकर्ते अशा ठरावांना विरोध होणार नाहीं याची दक्षता घेतात. त्यासाठीं जरूर तर विरोधकांची हकालपट्टी करण्यांतहि हयगय केली जात नाहीं. साहजिकच ठरावांवर बराच काळ चर्चा चालू असल्याचें दृश्य दिसलें तरी तो निव्वळ फार्सच असतो. कारण ठरावाचें भवितव्य आधींच ठरून गेलेलें असतें. पण सभासदांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्यासाठीं शाब्दिक फेरबदलांच्या उपसूचनांचें नाटक रंगवलें जातें.

पार्टीची कार्यपद्धति इतकी विचित्र असून सुद्धां संघटनेच्या चिरफळ्या कशा होत नाहींत ? कारण सभासदांनीं धार्मिक कडवेपणानें स्वतःवर लादून घेतलेले निर्बंध आणि त्यांना वाटणारी हकालपट्टीची भीति ! त्याचबरोबर वरिष्ठ नेत्यांसंबंधीं तळच्या कार्यकर्त्यांत पक्षाचे प्रचारक जो अनन्यसाधारण भक्तिभाव निर्माण करीत असतात आणि तें कधीं चुकूंच शकणार नाहींत अशी भावना प्रसृत करीत असतात हेंहि एक महत्त्वाचें कारण आहे. ज्या देशांत कम्युनिस्ट पार्टी अधिकारारूढ असते त्या ठिकाणीं शिस्तीच्या नांवाखालीं विरोधकांची छळणूक होत असते. इतकेंच नव्हे तर त्यांना मारून देखील टाकण्यांत येतें हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. कम्युनिस्ट पार्टीच्या सर्व शाखोपशाखांनीं आपले निर्णय एकमतानेंच घेतले पाहिजेत. कारण त्यामुळें पार्टीची एकात्मता दिसून येते असा अलिखित दंडक असल्यामुळें लोकशाही बाजूला राहून पक्षाचें स्वरूप हुकूमशाही बनतें.

पक्षाच्या या कार्यपद्धतीमुळें पक्षांतर्गत दोन प्रवाह किंवा शक्ति स्पष्टपणें उठून दिसतात. एका बाजूला उच्च आणि उदात्त ध्येयांनीं भरलेले त्यागी, निष्ठावान् परंतु पक्षांतर्गत आणि पक्षाबाहेरील दडपणामुळें संकुचित आणि एखाद्या धर्मनिष्ठ सनातन्याप्रमाणें पक्षावर अंधविश्वास ठेवणारे सर्वसामान्य सभासद ! आणि वर म्हटल्याप्रमाणें वरच्या 'लत्ता खालीं झाडणारे' पुढारी दुसऱ्या बाजूला ! कम्युनिस्ट पुढाऱ्यांत कांहीं सत्प्रवृत्त आणि सचोटीचे कार्यकर्ते नसतात असें नाहीं. पण नेतृत्वाची शिडी ते भराभर चढून जाऊं शकत नाहींत. कारण कम्युनिस्ट पार्टींत मानवी मूल्यांची कदर करणारी आणि निरनिराळ्या समस्यांचा स्वतंत्रपणें मूलगामी विचार करणारी व्यक्ति सर्वोच्च स्थानापर्यंत पोहोंचूंच शकत नाहीं. त्यासाठीं ठोकळेबाज आणि डोळ्याला ढापणें बांधून वरिष्ठांच्या हुकुमाची तामिली करण्याची प्रवृत्तीच असावी लागते.

*        *        *

१९४९ सालीं वॉलडॉर्फ येथें जागतिक शांतता परिषद भरली होती. त्या वेळचा प्रसंग मला आठवतो. त्या परिदेला रशियाचे जे प्रतिनिधि आले होते त्यांचें नेतृत्व सुप्रसिद्ध लेखक 'अलेक्झांडर फेडेएव्ह' याच्याकडे होतें. या प्रतिनिधि-मंडळांत स्त्री मात्र एकसुद्धां नव्हती. रशियांत स्त्री-पुरुष समानता आहे आणि स्त्रियांचे प्रश्न सोडवण्याच्या कार्याला रशियानें स्वतःला वाहून घेतलें आहे; असें असतांना त्या देशाच्या प्रतिनिधि-मंडळांत एकाहि स्त्रीचा समावेश होऊं नये ही गोष्ट परिषद् यशस्वी करण्यासाठीं जिवापाड मेहनत घेत असलेल्या कांहीं स्त्री-कार्यकर्त्यांना चांगलीच खटकली. त्यांनीं खुद्द फेडेएव्हलाच याबद्दल खुलासा विचारला.

"पण आम्हीं तर 'स्त्रियांचा प्रश्न' केव्हांच सोडवून टाकला आहे. आमच्या देशांत स्त्रियांचा असा कांहीं प्रश्नच आतां उरलेला नाहीं." फेडेएव्ह थंडपणें उद्गारला !

साम्यवादी रशियांत घडलेल्या घटनांबद्दल जेव्हां जेव्हां कम्युनिस्टांना प्रश्न विचारले जात तेव्हां तेव्हां त्यांच्या उत्तरांत असलाच उपहासगर्भ उर्मटपणा

भरलेला असतो, हें अनेक वर्षांच्या अनुभवानें आतां माझ्या लक्षांत येऊन चुकलें आहे. फेडेएव्ह तरी त्याला अपवाद कसा ठरणार ! फेडेएव्हचीच आणखी एक आठवण येथें देण्यासारखी आहे. परिषदेच्या वेळीं साहित्यिक-समितीच्या बैठकींत ' मेरी मॅकार्थी ' आणि तिच्या कांहीं मैत्रिणी यांनीं सोव्हिएट रशियांतील कांहीं लेखकांचीं नांवें घेऊन त्यांना ठार करण्यांत आलें असल्याची बातमी खरी आहे का, म्हणून,विचारलें. त्यावर फेडेएव्हनें ते अगदीं सुरक्षित आहेत असें बेधडक ठोकून दिलें. इतकेंच नव्हे तर ते कोठें राहातात, सध्यां त्यांचें काय लेखन चालू आहे, याचा अगदीं बारीक-सारीक तपशील सुद्धां त्यानें पुरविला आणि वर भांडवलशाहीच्या हस्तकांनीं पिकवलेल्या या कंड्यांची ते कशी टर उडवतात त्याचेंहि त्यानें रसभरित वर्णन केलें. फेडेएव्ह अशा कांहीं थाटांत बोलत होता आणि ही सर्व हकीगत अशी कांहीं रंगवून सांगत होता कीं, तो धादांत खोटें बोलत असेल अशी शंकासुद्धां कोणाच्या मनांत येऊं नये.

त्या समितीचा अध्यक्ष या नात्यानें मला तर फेडेएव्हला असा प्रश्न विचारला जावा याचा राग आलाच, पण ' मेरी मॅकार्थी ' आणि तिच्या मैत्रिणीहि ओशाळल्या. आपल्या कथा-कादंबऱ्यांनाहि मागें टाकील इतकी कल्पनाशक्तीची भरारी फेडेएव्ह साध्या संभाषणांत देखील मारूं शकेल असें आमच्या मनांतहि त्या वेळीं आलें नाहीं.

पण वस्तुस्थिति तशी होती खरी ! पुढें आठ वर्षांनंतर रशिया आणि रुमानिया येथील कम्युनिस्टांकडूनच मला समजलें कीं, ज्या वेळीं ते लेखक जिवंत आहेत असें फेडेएव्ह मोठ्या तावातावानें आम्हांला सांगत होता त्या वेळीं त्यांच्यापैकीं कांहीं जण गुप्त– पोलिसांच्या छळाला आणि गोळ्यांना प्रत्यक्ष बळी पडले होते, तर कांहीं मृत्यूची घटका मोजीत होते.

फेडेएव्हनें त्या वेळीं तरी निदान अस्सल कम्युनिस्ट नेत्याची भूमिका बरोबर बजावली, पण अखेर त्याचा अंत कसा झाला ! क्रुश्चेव्हचें भाषण ऐकल्यानंतर घरीं येऊन त्यानें स्वतःला दारूच्या नशेंत बुडवून घेतलें. त्या बेहोषींत तो सतत १२ दिवस होता आणि नंतर स्वतःच्या रिव्हॉल्व्हरनें मस्तकांत गोळी झाडून घेऊन त्यानें स्वतःचा अंत करून घेतला !

◎ ◎ ◎

## १४

असें जर आहे तर मी इतके दिवस पक्षांत कसा राहिलों? यापूर्वींच राजीनामा देऊन मोकळा कां झालों नाहीं असें कोणीहि झालें तरी विचारील आणि तें साहजिक आहे. कारण पक्षांतील हे सारे प्रकार इतके दिवस माझ्या कसे लक्षांत आले नाहींत अशी शंका कोणाच्याहि मनांत येणें अगदीं शक्य आहे. पण वर वर पाहातां वाटतो तितका हा प्रश्न सोपा नाहीं. कांहीं गोष्टी मला पटल्या म्हणून मी कम्युनिस्ट पार्टींत सामील झालों. शांतता, समाजवाद आणि बंधुभाव निर्माण करावयाचा असेल तर तो फक्त कम्युनिस्ट पार्टीच काय ती निर्माण करूं शकेल अशी इतर अनेकां-प्रमाणेंच माझीहि दृढ समजूत होऊन बसली होती आणि त्या गृहीतकृत्यावर विसंबूनच मीं पक्षाचें अनुयायित्व पत्करलें. कम्युनिस्ट पार्टीचा सभासद होणें ही एक अतिशय गंभीर बाब आहे आणि गंभीर प्रवृत्तीचे लोक हे एखाद्या संघटनेंत सामील होण्यापूर्वीं किंवा तिच्यांतून बाहेर पडण्यापूर्वीं अंतर्मुख होऊन दहादां विचार करतात.

मी आज जें लिहितों आहें तें मी पक्षांत गेल्यानंतर वर्ष-सहा महिन्यांत लिहूं शकलों नसतों. माझा स्वभाव असा आहे कीं, कोणत्याहि गोष्टीविषयीं माझी चटकन् खात्री पटत नाहीं आणि एकदां खात्री पटली म्हणजे मनांतून ती गोष्ट चटकन् जातहि नाहीं. आधीं कसला ग्रह करून घेत नाहीं; पण एकदां बनलेला ग्रह सहजासहजीं बदलतहि नाहीं. आज या निष्कर्षाला येतांना त्यापाठीमागें माझा कित्येक वर्षांचा अनुभव आणि त्या काळांत घडलेल्या नाना घटना सांठलेल्या आहेत. त्यांतहि पुन्हां क्रुश्चेव्हसारख्या जगांतील सर्वश्रेष्ठ कम्युनिस्ट पार्टीच्या सर्वश्रेष्ठ नेत्याच्या भाषणाची भर पडली. अनेक वर्षांपासून मला पडलेलें कोडें त्या भाषणानें एकदम सुटलें. तरीदेखील एक प्रश्न मला सारखा सतावीत होता. कम्यूनिस्ट पक्षांतील या साऱ्या उणिवा, त्यांतील भयानक प्रकार हे एखाद्या दुष्ट व्यक्तीच्या हातीं पक्षाचीं सारीं सूत्रें गेल्यामुळें घडून आले कीं, कम्युनिस्ट पार्टीच्या संघटनेंतील अंगभूत दोषच या सर्वाला जबाबदार आहेत, यासंबंधीं निश्चित निर्णयाला येण्यापूर्वीं मला कित्येक

महिने चिंतनांत आणि मननांत घालवावे लागले आणि त्यानंतर किती तरी दिवसांनीं माझी मनोव्यथा मी शब्दबद्ध करूं शकलों. कम्युनिस्ट पार्टी-संबंधींचे अशा प्रकारचें विश्लेषण आजवर कोणीं प्रसिद्ध केलेलें नाहीं याची मला जाणीव आहे. त्यामुळेंच माझ्या या लिखाणाचे परिणाम फार दूरगामी ठरणार आहेत.

मी पार्टींत असतांना सारे जण मला बंडखोर समजत. सहसा माझ्यावर कोणी विश्वास टाकीत नसे. मी कोणाच्या आहारीं जाणार नाहीं किंवा कोणाचें नियंत्रण मानणार नाहीं अशी पक्षांतील नेत्यांची सर्वसाधारण समजूत होती. मला त्याची खंत वाटत नाहीं. कारण त्यावरून इतकाच निष्कर्ष निघतो कीं, मी माझी बुद्धि कोणाकडे गहाण टाकायला तयार नव्हतों. माझें सभासदत्व रद्द करण्याचा एकूण बारा वेळां प्रयत्न करण्यांत आला. पण प्रत्येक वेळीं मी त्याला पुरून उरलों. काय वाटेल तें झालें तरी आपलें सभासदत्व रद्द करूं द्यावयाचें नाहीं असा माझा निर्धार होता. त्याचीं दोन कारणें होतीं. एक तर सुरुवातीला माझा पार्टीवर संपूर्ण विश्वास होता. आणि पुढें तो विश्वास उडाल्यावर ज्यांना आपली भीति वाटते आणि आपला उत्कर्ष सहन होत नाहीं अशा क्षुद्र लोकांनीं आपला कांटा काढण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी आपण त्याला दाद द्यावयाची नाहीं, असें मीं ठरवून टाकलें होतें.

म्हणून कम्युनिस्ट पार्टीसंबंधीं वरील निर्णयाला आल्यानंतर मी आपण होऊन बाहेर पडलों. मी असें म्हणूं शकतों कीं, असें करतांना माझा भ्रम-निरास झाला किंवा माझें मन विषण्ण होऊन गेलें असें मुळींच नाहीं. कम्युनिस्ट पार्टींत असतांना मी मोठ्या आणीबाणीच्या काळांतून गेलों आहें. पण याच काळांत मानवानें प्रगतीचा फार मोठा टप्पा गाठला आहे. अर्थात् कम्युनिस्ट पार्टीची शिस्त अगदीं पोलादी असली तरी या प्रगतीचें श्रेय तिला घेतां येणार नाहीं. समाजवाद, न्याय आणि बंधुभाव हीं फार उदात्त ध्येयें आहेत. इतकेंच नव्हे तर आजच्या काळांतील ती एक जबरदस्त शक्ति होऊन बसली आहे. आणि कम्युनिस्ट पार्टीदेखील ती अडवूं शकणार नाहीं. सोव्हिएट यूनियनमधील समाजवाद यापुढें फार काळ पक्षाच्या हुकूमशहाच्या मगर-मिठींत अडकून पडणें अशक्य आहे.

ठोकळेबाजी, अंधश्रद्धा, मार्क्सवादाची चालवलेली ओढाताण, स्वतंत्र बुद्धीबद्दलचा अनादर आणि उपेक्षा, आणि संकुचित मनोवृत्तींचे पुढारी इत्यादि दोषांनीं भरलेली कम्युनिस्ट पार्टी सुसंस्कृत जगांत टिकूं शकणार नाहीं. सर्व जगभर पसरलेल्या लक्षावधि कम्युनिस्ट सभासदांना याची जाणीव होऊं लागली असून ते भराभर पक्षाचा त्याग करून बाहेर पडत आहेत. या सर्वांची " ट्रॉट्स्कीवादी " किंवा भांडवलदारांचे " हस्तक " अशा शेलक्या विशेषणांनीं संभावना करून आतां कोणाचीहि दिशाभूल करतां येणार नाहीं. कम्युनिस्ट पार्टीचें सत्य स्वरूप आम्ही उघड करून सांगणारच आणि आतां वेळ अशी आली आहे कीं, सारें जग आमचें म्हणणें ऐकून घेण्याच्या मनःस्थितींत आहे.

◎ ◎ ◎

## १५

लेखक मग तो कितीहि श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असो, तो आपल्या सदसद्विवेक बुद्धीनुसार सत्याचें दर्शन घडविण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यामुळें हंगेरींतील कम्युनिस्ट पक्षाच्या जुलुमाविरुद्ध प्रथम तेथील लेखकांनीं आपला आवाज उठविला. यांत मला तरी निदान गूढ किंवा आश्चर्यजनक असें कांहीं वाटलें नाहीं.

ज्या समाजांत जुलूम, जबरदस्ती आणि छळ यांचा धुडगूस चालू असतो त्या समाजांत कलावंत म्हणून लेखक जगूंच शकणार नाहींत. स्वतंत्र मानवसमाजांत कलेच्या सर्वांगीण विकासाशिवाय साहित्य टिकूं शकेल कीं नाहीं तें मला सांगतां येणार नाहीं. परंतु कला म्हणून साहित्याची जोपासना आणि संवर्धन अशा समाजांतच होऊं शकतें एवढें मात्र मी म्हणूं शकेन ! मानवी स्वातंत्र्याची गळचेपी झाली तर त्या समाजांतील साहित्य देखील खुरटून जातें. जुलूम-जबरदस्तीचा वरंवटा फिरत असतांना सुतार आपलें घरबांधणीचें काम यथापूर्व चालू ठेवूं शकेल. कामगारां-कडून उत्पादनाचें काम करून घेतां येईल किंवा डॉक्टरला त्यांचा वैद्यकीय व्यवसाय चालू ठेवण्यांत देखील फारसा प्रत्यवाय येणार नाहीं. परंतु

साहित्यिक किंवा कलावंत मात्र दंडुक्याच्या इशाऱ्याबरोबर आपली लेखणी वळवूं शकणार नाहीं. सध्यांची लोकशाही ही पूर्णावस्थेला पोहोंचलेली नाहीं. त्यांत उणिवा आहेत हें मी मानतों. परंतु जग पूर्णावस्थेला पोहोंचलेलें नाहीं या जाणिवेंतच त्याच्या पुढील प्रगतीची आशा सामावलेली आहे. अमेरिकन लेखक म्हणून माझ्या व्यवसायावर अनेक गंडांतरें आलीं. मला माझा लेखनव्यवसाय चालू ठेवण्यासाठीं फार मोठी आर्थिक झळ सोसावी लागली. आणि माझी वाङ्मयनिर्मिति जनतेपर्यंत जाऊन पोहोंचणें दुरापास्त होऊन बसलें. पण इतकें मात्र खरें कीं, तरी देखील,

१) मी माझें लेखनकार्य चालू ठेवूं शकलों.

२) मला जिवंत राहतां आलें.

३) 'माझ्या अंतःप्रेरणेनुसार' लेखन करण्यासाठीं मी झगडत राहूं शकलों.

आमच्या देशांतील सरकारच्या धोरणाला माझा तीव्र विरोध होता. आणि त्यावर कडाडून हल्ला चढविण्यांत मीं कधींहि हयगय केली नाहीं. तरी देखील वर उल्लेखिलेल्या तीनहि बाबी अबाधित राहिल्या.

याउलट सोव्हिएट रशियांतील माझ्या सहकाऱ्यांची परिस्थिति कशी असते? ते माझ्याप्रमाणें सरकारला विरोध करण्याचें तर बाजूलाच राहो; पण सरकारवर साधी टीका करण्याचीहि त्यांची प्राज्ञा नसते. फार तर आपल्या वाङ्मयांतून क्वचित् एखादे वेळीं तें आपलें अंतरंग थोडें फार उघडें करूं शकतात. पण तरीहि त्यांच्या नशिबीं तेथें काय येतें तर—

१ ) आपलें लेखन चालू ठेवण्याची त्यांना मुभा राहत नाहीं. त्यांचें लिखाण बंद पाडलें जातें.

२ ) ते जगूंहि शकत नाहींत. कारण हालहाल करून त्यांना ठार मारण्यांत येतें.

३ ) 'आपल्या अंतःप्रेरणेनुसार' लिहिण्यासाठीं झगडत राहण्याचें स्वातंत्र्य त्यांना उपभोगतां येत नाहीं. कारण अंतःप्रेरणा अशी कांहीं चीज असूं शकते हेंच मुळीं त्यांना माहीत नसतें. आणि तें माहीत करून घेण्याचा त्यांनीं प्रयत्न केला तर त्यांच्या नशिबीं मृत्यु ठेवलेलाच असतो.

तो गुप्त अहवाल बाहेर पडला नसता आणि त्याला पुस्ती देणारी आणखी किती तरी माहिती उजेडांत आली नसती, तर माझ्या वरील विधानावर कोणाचा विश्वासहि बसला नसता. यापूर्वीं जगांत अशा तऱ्हेचे पाशवी अत्याचार आणि बेछूट शिरकाण कधीं घडलें नाहीं असें नाहीं, पण स्वतः साम्यवादी म्हणविणाऱ्या सरकारनें अशा तऱ्हेनें लेखकांची हत्या करावी ही केवढी विसंगति म्हटली पाहिजे!

आजकाल सर्व जगांत कम्युनिझमला लेखकवर्गाकडून कडवा प्रतिकार होऊं लागला आहे आणि त्यांतील बरेचसे लेखक हे एका काळीं कम्युनिस्ट होते. याचेंहि अनेकांना गूढ वाटतें. लेखक असें करण्यास उद्युक्त कां होतात, आणि मानवी स्वातंत्र्य ही त्यांना निकडीची गरज कशी भासूं लागते याचें विवेचन मी करणार आहें. पण तत्पूर्वीं रशिया आणि पूर्व युरोपांतील देशांत नेमके याच्या उलट प्रकार कसे घडून आले तें बघण्यासारखें आहे.

क्रान्तीनंतर रशियांत एक नवीच परिस्थिति निर्माण झाली. वर वर्णन केल्याप्रमाणें कम्युनिस्ट पार्टीच्या हातीं सर्व सत्ता येऊन ती सर्वाधिकारी बनली. औद्योगिकरणाची झपाट्यानें वाढ झाली. पण रूढ अर्थानें आपण ज्याला सरकार म्हणतों असें मुळीं तेथें शिल्लकच उरलें नाहीं. फार तर राज्यकारभाराची एक यंत्रणा तेथें अस्तित्वांत आली असें म्हणतां येईल. पण ती सर्वस्वीं कम्युनिस्टांच्या नियंत्रणाखालीं आली. जुलूम आणि अधिकारशाही यांना सबंध मानवी इतिहासांत तोड राहिली नाहीं. निवडणुका, लोकसभा, न्यायालयें, पोलिस इत्यादि सर्व संस्था हीं समतोल सरकारचीं प्रतीकें समजलीं जातात. ऐतिहासिक दृष्ट्या प्रगत होत गेलेलीं हीं प्रतीकें कम्युनिस्ट पार्टीनें आपलें प्रभुत्व कायम टिकविण्यासाठीं वेठीला धरलीं आहेत. त्यामुळें कम्युनिस्ट पार्टीच्या संमतीशिवाय तेथें पानहि हलूं शकत नाहीं. आणि जोंपर्यंत कम्युनिस्ट पार्टीचें सध्यांचें केंद्रानुवर्ती आणि सर्वंकष स्वरूप कायम आहे तोंपर्यंत तेथील कम्युनिस्ट पार्टींतच एखादा गट उभा करणें किंवा नवीन पक्ष स्थापन करणें अगर सत्तारूढ पक्षाकडून होणाऱ्या जुलुमाचा प्रतिकार करणें या गोष्टी अशक्यप्राय होऊन बसल्या आहेत.

या परिस्थितीचा सोव्हिएट वाङ्मयावर अत्यंत विदारक असा परिणाम घडून आला. १९२० सालच्या रशियन वाङ्मयांत जोम दिसून येत होता

आणि क्रान्तिपूर्व काळांतील जनतेच्या भावनांचा आविष्कार त्या वाङ्मयांतून पाहावयास मिळत होता, त्या वेळीं कम्युनिस्ट पार्टीचें सामर्थ्य इतकें वाढलेलें नव्हतें आणि आपल्या मर्जीनुरूप इतरांना वाकावयास लावण्याची प्रवृत्तीहि पैदा झाली नव्हती. १९२० सालच्या वाङ्मयांतील हा जोम पुन्हां हिटलरनें रशियावर स्वारी केली त्या वेळीं प्रगट झाला. पण त्याचें कारण असें होतें कीं, नाझीवादाचें आक्रमण परतवून लावण्याच्या बाबतींत सर्वसामान्य जनता आणि जुलमी नोकरशाही एकचित्त झाली होती. परंतु १९२० च्या सुमारास रशियन वाङ्मयांत जो जोम आणि आवेश पाहावयास मिळत होता तेवढा उन्मेष या युद्धकाळांतहि आढळून आला नाहीं. कारण परचक्रापासून सोव्हिएट मातृभूमीचें संरक्षण झालें पाहिजे एवढ्या भावनेपुरताच तो मर्यादित होता. या वेळेपर्यंत लेखकाला जे खास अधिकार सर्वत्र उपभोगावयास मिळत ते नष्ट करून टाकण्यांत आले होते. लेखक हा आपल्या लेखणीच्या द्वारें वास्तवतेचें दर्शन घडवीत असतो. टीका आणि विरोध करण्याचा अधिकार— लेखकाच्या दृष्टीनें ती एक निकडीची गरज असते— एव्हांना रशियांत काढून घेण्यांत आला होता. साम्यवादी तत्त्वप्रणाली आणि आशा-आकांक्षा यांना भ्रष्ट स्वरूप प्राप्त झालें होतें. न्यायाची प्रस्थापन किंवा त्यासाठीं झगडण्याचा हक्क यासारख्या शुद्ध नैतिक मूल्यांऐवजीं पार्टींतील हुकूमशहांनीं बनविलेल्या नसत्या आदर्शवादी कल्पना जनतेच्या माथीं मारण्यांत आल्या होत्या.

आणि या सर्वांवर कळस म्हणजे सोव्हिएटमधील जीवन म्हणजे कम्युनिस्ट पार्टी आणि पक्षनेता हीं सर्व एकरूप बनून गेलीं होतीं. कर्तबगार लेखक आपल्या लेखणीच्या फटकाऱ्यानें कम्युनिस्ट पार्टीला कधीं काळीं माणुसकीची कदर करायला लावील ही आशा ट्रॉट्स्की आणि त्याच्या सहकाऱ्यांचा पराभव होऊन त्यांची वासलात लावण्यांत आली त्याच वेळीं मालवली गेली होती. अशा तऱ्हेनें कलावंत म्हणून लेखकाची मुस्कटदाबी करून त्याला हतबल करून टाकण्यांत आलें होतें. एवढेंच नव्हे तर त्याच्या व्यवसायाच्या विशिष्ट स्वरूपामुळें त्याला पक्षाचा दुष्मन लेखण्यांत आलें होतें.

आणि एक परीनें कम्युनिस्ट पार्टीच्या दृष्टीनें तें योग्यच होतें. मला सबंध आयुष्यभर जे अनुभव आले, जें निरीक्षण करतां आलें आणि मी जे

५०२९८

निष्कर्ष काढले त्यावरून मी अगदीं ठामपणें असें म्हणूं शकतों कीं, कम्युनिस्ट पार्टीचें आजचें स्वरूप कायम असेतोंपर्यंत, लेखक मग तो पक्षाशीं कितीका एकनिष्ठ असेना, कधींना कधीं तरी पक्षाचें शत्रुत्व पत्करल्याशिवाय आणि पक्ष नष्ट करण्यास प्रवृत्त झाल्याशिवाय राहणार नाहीं.

एकदां या वस्तुस्थितीचें नीट आकलन झालें म्हणजे अनेक कूटप्रश्नांचीं उत्तरें आपोआपच सांपडूं लागतात. क्रेमलीनमधील सत्ताधीशांना रशियन वाङ्मयाची महती गातां आली असती तर नको होती असें नव्हे. पण तरीहि सोव्हिएट यूनियनमधील कम्युनिस्ट पार्टीनें रशियन वाङ्मयाची खच्ची करून टाकली. याचें मुख्य कारण असें आहे कीं, पार्टीच्या हातीं आलेल्या अमर्याद सत्तेच्या समर्थनार्थ तसें करणें अपरिहार्यच होऊन बसलें होतें.

पूर्व युरोपांतील इतर समाजवादी राष्ट्रांत नांव घेण्यासारखी अशी एकहि वाङ्मयीन कलाकृति गेल्या दहा-बारा वर्षांत—त्या राष्ट्रांत समाज-वादी राजवट असल्याचा दावा करण्यांत येत असूनहि—निर्माण झाली नाहीं. निदान त्या राष्ट्रांतील एकाहि लेखकाच्या ग्रंथाचें भाषान्तर निदान माझ्या तरी पाहाण्यांत आलेलें नाहीं. कदाचित् एकाद-दुसरें पुस्तक माझ्या नजरेंतून सुटलेंहि असेल. पण वाङ्मयांत लक्ष घालणाऱ्या तेथील राजनीति-ज्ञांनींहि हें कबूल केलें आहे कीं, भाषांतर करण्याजोगती अशी फारशी ग्रंथनिर्मितीच त्या देशांत झालेली नाहीं. हंगेरी व पोलंडमधील घटनांवरून याची चांगली कल्पना येऊं शकेल.

लेखकाची वासलात कां लावण्यांत येतें तें यावरून थोडें तरी ध्यानांत येऊं शकेल. जीं ध्येयें त्यानें आपल्या मनांत रंगाविलीं तीं किती भयानक होतीं हें सिद्ध करणारे पुरावे त्याच्या वाङ्मयांतून डोकावूं लागतात आणि त्यामुळें त्याचें अस्तित्वच धोकादायक ठरतें. अशा वाङ्मयीन कृति म्हणजे आपल्या सत्तेखालीं पेरून ठेवलेले सुरुंगच आहेत असें सत्ताधाऱ्यांना वाटूं लागतें.

मी स्वतः लेखक असून लेखकांसंबंधीं असें लिहावें हें विचित्र वाटेल. पण वस्तुस्थितीच तशी आहे. या पुस्तकाचा पहिला भाग लिहून पुरा झाल्यावर अचानक सोव्हिएट यूनियनचें माझ्यासंबंधींचें धोरण बदललें.

इतके दिवस माझ्या अस्तित्वावर जो पडदा टाकण्यांत आला होता तो आतां काढून घेण्यांत आला. मी कम्युनिस्ट पार्टी सोडल्याचें जाहीर केल्यापासून माझ्यासंबंधी त्या देशांत एक अक्षरहि कोठें प्रसिद्ध झालें नव्हतें. कीं, कोणी माझ्याशीं कसला संबंध ठेवीत नव्हतें. कां कोणास ठाऊक, पण या धोरणांत बदल होऊन आतां माझें नांव प्रतिगाम्यांच्या यादींत गोंवण्यांत येऊन माझ्यावर टीकेची झोड उठविण्यांत येऊं लागली. कम्युनिस्ट विरोधकांच्या प्रचाराला बळी पडून मी सोव्हिएट यूनियनविरुद्ध अपप्रचार करतों, आणि वाटेल तीं खोटीं विधानें करीत सुटतों, मी ज्यूवाद्यांचा हस्तक आहें, इत्यादि ठोकळेबाज आरोप माझ्यावर करण्यांत येऊं लागले.

पण जो कोणी सोव्हिएट यूनियनविरुद्ध मतें मांडील त्याच्यावर असे आरोप करून त्याला कम्युनिस्ट जगांतून उठविणें हें कम्युनिस्टांचें तंत्रच आहे. प्रतिगामी ज्यूवादी ही त्यांच्या कोशांतील अशीच एक शेलकी शिवी आहे. इस्रायलचें राज्य कायम टिकावें असें कोणी प्रतिपादन करूं लागला कीं सोव्हिएट सत्ताधारी त्याच्यावर ज्यूवादाचा शिक्का मारून मोकळे होतात. कारण, मध्ययुरोपांत तेलाच्या सांठ्यासाठीं जी सत्तास्पर्धा चालू आहे त्यांत रशिया गोंवला गेला असून इस्रायलचें स्वतंत्र अस्तित्व त्याला अत्यंत धोक्याचें वाटतें. सोव्हिएट यूनियनमधील सर्वश्रेष्ठ ज्यूंची कत्तल कां करण्यांत आली किंवा ज्यूंची संस्कृति उध्वस्त करण्यामागें कोणता क्रान्तिकारी उद्देश होता त्याचा खुलासा अद्यापहि सोव्हिएट यूनियनमधील सत्ताधाऱ्यांना करतां आलेला नाहीं. कॅनडा आणि इंग्लंडमधील कम्युनिस्ट पार्टीतर्फे मुद्दाम या प्रश्नाचा खुलासा करून घेण्यासाठीं रशियाला खास शिष्टमंडळें धाडण्यांत आलीं होतीं.

मीं स्वतःदेखील 'डेली वर्कर' मधून या प्रश्नाला वाचा फोडली होती. सोव्हिएट यूनियनमध्यें राहणाऱ्या ज्यूंना इस्रायलला जाण्याची परवानगी नाकारणें म्हणजे त्यांना जबरदस्तीनें डांबून ठेवण्यासारखेंच आहे. तो एक प्रकारचा कारावासच आहे, असा मुद्दा मीं माझ्या लेखांत उपस्थित केला होता.

पण त्यासाठींच माझ्यावर आग पाखडण्यांत आली. इतके दिवस सोव्हिएट यूनियनवर अशा प्रकारची टीका करणारांना, कम्युनिस्टविरोधक

व सोव्हिएट यूनियनबद्दल अपप्रचार करणारे ठरविण्यांत येत असे. आणि मीहि त्यावर विश्वास ठेवीत असें. आज तोच प्रयोग माझ्यावर करण्यांत येऊं लागला आहे. श्रद्धा ही जशी एक महान् शक्ति आहे; तशीच एखाद्या गोष्टीवरील श्रद्धा नष्ट होणें ही देखील एक प्रचंड शक्तीच आहे. आणि म्हणूनच सोव्हिएट यूनियनबद्दल संपूर्ण भ्रमनिरास झाल्यामुळें मी ज्या निर्णयाला येऊन पोहोंचलों आहें, त्याचा उच्चार एकदां सोडून हजारदां केल्याशिवाय राहणार नाहीं.

" सोव्हिएट यूनियनबद्दल असे भलतेसलते आरोप करतांना तूं सत्याचा अपलाप करीत आहेस; ज्यांना कामगारांचें राज्य बघवत नाहीं त्यांनीं पिकवलेल्या कुजक्या कंड्यांपेक्षां त्याला जास्त किंमत नाहीं " असें मला सुचविण्यांत येतें.

पण मी इतके दिवस ज्याला सत्य समजत होतों तें सत्याचें केवळ कलेवर होतें अशी माझी आतां खात्री होऊन चुकल्यामुळें आतां माझ्याकडे बोटें दाखवून हा खोटें बोलतो आहे, असें कोणीं कितीहि सांगायचा प्रयत्न केला तरी मी गप्प कसा बसेन? मीं कम्युनिस्टांचा विश्वासघात केला असा माझ्यावर आरोप करण्यांत येतो. पण मी त्यांचा विश्वासघात कशाला करूं? आणि केलाच असेल तर मानवानें अनादिकालापासून पूजिलेल्या स्वातंत्र्य आणि समता या दोन उदात्त ध्येयांचाच मीं विश्वासघात केला असें फार तर म्हणतां येईल.

ज्या देशांत लेखक आणि कवि यांचे अनन्वित हाल करून शेवटीं त्यांना ठार मारण्यांत येतें, त्या देशांत स्वातंत्र्याची कदर केली जाते असें कसें म्हणतां येईल? विख्यात रशियन कवि इट्झिक् फेफर याच्या मृत्यूची हकिगत हृदय पिळवटून टाकणारी आहे. एका सदिच्छा मंडळाचा सभासद म्हणून तो एकदां अमेरिकेंत आला होता. त्यामुळें आमचा त्याच्याशीं चांगला परिचय झाला होता. तो स्वतः ज्यू होता. रशियांत त्याच्या कविता अत्यंत लोकप्रिय झाल्या होत्या. आपल्या पितृभूमीबद्दलचें--सोव्हिएट रशिया-बद्दलचें--त्याचें प्रेम आणि निष्ठा संशयातीत होती.

आणि तरीहि तो वारल्याची बातमी येऊन थडकली. त्याच्या मृत्यूचें गूढ कोणालाच उकलेना. त्याबद्दल कुजबूज सुरू झाली. पण पुनः पुन्हा हा

प्रश्न उकरून काढणारे आम्हींच मूर्ख ठरूं लागलों. ' प्रवदा 'च्या अमेरिकेंतील बातमीदाराशीं बोलतांना हा प्रश्न निघाला त्या वेळीं तो रागारागानें म्हणाला—

" हॉवर्ड, तूं ज्यूंचें एवढें स्तोम कां माजवितोस ? जेव्हां पाहावें तेव्हां ज्यू, ज्यू, ज्यू. स्टॅलिननें ज्यूंव्यतिरिक्त इतर कुणाला मारलेंच का नाहीं ? "

यावर मी काय बोलणार ? पण मी अगदीं शपथेवर सांगतों कीं, यांतलें एक अक्षरहि खोटें नाहीं.

त्यानंतर कम्युनिस्ट पार्टीचें विसावें अधिवेशन होऊन गेलें. तरीहि इट्झिक् फेफरच्या मृत्यूचें गूढ कांहीं उकललें नाहीं. पण त्यानिमित्तानें रशियाला जाऊन आलेल्या अनेक जणांनीं सांगितलेल्या हकिगतीचे धागेदोरे जुळविल्यानंतर त्याच्या हत्येची संगती लावतां आली. त्या भीषण कहाणीची सुरुवात डेव्हिड बर्गलसन् नांवाच्या रशियांतील ज्यू लेखकाच्या अटकेपासून होते असें म्हणावयास हरकत नाहीं. त्याला कां पकडण्यांत आलें तें कदाचित् रशियनच सांगू शकतील; पण तो ज्यू होता हेंच बहुधा त्याच्या अटकेचें मुख्य कारण असावें.

त्याला पकडण्यांत आल्यानंतर त्याच्या हातून कधींहि न घडलेल्या गुन्ह्यांचा कबुलीजबाब त्यानें लिहून द्यावा म्हणून त्याचा अतोनात छळ करण्यांत आला आणि त्यांतच शेवटीं तो मेला.

पण तो मरण्यापूर्वीं इट्झिक् फेफरला त्याची कुणकूण लागली होती. आपल्या मित्राला वांचविण्यासाठीं जिवाचें रान करण्याचा त्यानें निर्धार केला. अनेक लेखकांना तो याबाबत भेटला. पण त्या सर्वांनीं त्याला धुडकावून लावलें. उलट तो स्वतःच एखादे वेळीं पकडला जाईल अशी धास्तीहि त्यांनीं त्याला घातली. पण तो आपल्या निश्चयापासून ढळला नाहीं. शेवटीं तो एव्हरन बर्गला भेटला. त्याचा स्टॅलिनपर्यंत वशिला होता. पण त्यानेंहि आपला शब्द खर्च करण्याचें नाकारलें. त्यावर असें सांगतात कीं, इट्झिक् फार संतापला आणि त्याला म्हणाला,

" मग मला एकट्याला जें काय करतां येण्यासारखें आहे तें मी केल्याशिवाय राहाणार नाहीं. पण लक्षांत ठेव कीं, मला अटक झाली आणि मी

अनुक्रम २५७८९
क्रमांक ११७८
नोंदे
२८-११

मेलों तर जन्मभर त्याचा तळतळाट तुझ्या माथीं येईल. सबंध जन्मभर तुला कधीं चैन पडणार नाहीं."

आणि शेवटीं जें व्हायचें तेंच झालें. त्याच्यांतील माणुसकी त्याला स्वस्थ बसूं देईना म्हणून तो फेफर, बर्गलसन्च्या मदतीला धांवला. पण त्याचा परिणाम काय झाला तर बर्गलसनबरोबर त्यालाहि जगांतून नाहींसें करण्यांत आलें. त्या दोघांचीच अशी वासलात लागली असें थोडेंच आहे ? विसाव्या कॉंग्रेसनंतर फेडेएव्हनें काय करून घेतलें ? पोलोव्होय, सिमोनोव्ह, शोलोकोव्ह या सर्वांची गत काय झाली ? हे सर्व जण साम्यवादाचे पाईक नव्हते का ? साम्यवादासाठींच ते अविरत झटले होते ना ? मग त्यांची अशी अवस्था कां व्हावी ?

इतर लेखकांच्याबद्दल मला कांहीं म्हणावयाचें नाहीं. पण स्वतःपुरतें मात्र मी इतकें सांगूं शकतों कीं, लेखक म्हणून कम्युनिस्ट पार्टींत राहणें मला घृणास्पद वाटूं लागलें होतें. फार काय, माझ्या लेखनव्यवसायाचा देखील मला अगदीं उबग येऊन गेला होता.

आणि त्याला कारणेंहि तशींच घडत होतीं. कम्युनिस्ट पार्टी आणि कम्युनिस्ट लेखक यांच्याविषयीं मला एकसारखे अत्यंत कटु अनुभव येत होते. त्यांच्या सहवासांत राहाणें देखील घृणास्पद वाटूं लागलें होतें. बॉरिश पॉलोव्होयनें देखील मला असाच धक्का दिला. तो सोव्हिएट यूनियन-मधील लेखकांत सर्वश्रेष्ठ समजला जाई. तो अमेरिकेंत आला असतांना आम्ही एकमेकांना भेटलों होतों. मीं त्याला माझ्या घरीं नेलें होतें आणि तेथें किती तरी वेळ आम्ही एकमेकांशीं गप्पा मारीत बसलों होतों.

दुसऱ्या दिवशीं त्याच्या सन्मानार्थ एक समारंभ घडवून आणला होता. तेथेंहि मी हजर होतों. त्या वेळीं कोणी तरी पोलोव्होयला क्विक्टो नांवाच्या ज्यू लेखकासंबंधीं माहिती विचारली. इतर ज्यू लेखकांप्रमाणेंच क्विक्टोचीहि वासलात लावण्यांत आली होती अशी बातमी पसरल्यानें मुद्दाम त्यासंबंधीं खुलासा करण्याची त्याला विनंती करण्यांत आली होती.

पोलोव्होयनें अर्थातच रशियासंबंधीं उठविण्यांत आलेल्या अनेक कंड्यां-पैकीं एक म्हणून त्या बातमीची संभावना केली; पण तेवढ्यावरच तो थांबला

नाहीं. तर त्याचा पुरावा म्हणून त्यानें अशीहि माहिती दिली कीं, क्रिक्टो आणि तो एकाच घरांत राहातात.

तें एकून जमलेल्या सर्वांनाच मोठें समाधान वाटलें. त्यानंतर क्रिक्टो-संबंधीं आणखीहि बोलणें झालें, त्या वेळीं त्याचें काय लिखाण चाललें आहे तेंहि पोलोव्होयनें मोठ्या आस्थेनें सांगितलें आणि आम्हां अमेरिकेंतील लेखकांना त्यानें नमस्कार सांगितले आहेत असें सांगण्यासहि त्यानें कमी केलें नाहीं.

हा सर्व प्रकार घडला त्या वेळीं अनेक लोक तेथें हजर होते. यांतील शब्दन् शब्द खरा असल्याचें तेदेखील सांगूं शकतील. परंतु पोलोव्होय स्वदेशीं परत गेला. २० व्या कॉंग्रेसचें अधिवेशनहि होऊन गेलें, आणि त्यानंतर पोलंडमधील एका कम्युनिस्ट वृत्तपत्रानें असें प्रसिद्ध केलें कीं, फेफर आणि बर्गलसन्प्रमाणेंच क्रिक्टोचीहि केव्हांच वाट लावण्यांत आली होती.

हा सारा प्रकार किती घृणास्पद म्हटला पाहिजे ! पोलोव्होय एकटाच खोटें बोलत नव्हता तर त्याच्या मुखानें सबंध कम्युनिस्ट पार्टी लेखकांना कशा तऱ्हेनें वागविते त्यावर झगझगीत प्रकाश पडत होता.

◎ ◎ ◎

## १६

विसाव्या कॉंग्रेसनंतर माझें सारें जीवन जणूं गतिशून्य होऊन गेलें. माझ्या अंगांतील प्राणच नाहींसे झाले. बॉरिश पोलोव्होयच्या त्या प्रसंगाचा मी जेव्हां जेव्हां विचार करतों, तेव्हां तेव्हां मला माझ्या मनाशीं कबूल करावें लागतें कीं, मी त्याच्या जागीं असतों तर बहुधा असाच वागलों असतों. कारण आम्ही दोघे एकाच मानसिक अवस्थेंतून गेलों होतों. खरोखरी माणसाचें मन ही एक अजब चीज आहे. वास्तवता झांकून टाकण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी मन तिची ग्वाही देऊन उठल्याशिवाय राहात नाहीं. मी पक्षांत सामील झालों तेव्हांपासून माझ्या मनावर

तिरस्काराचीं पुटें चढत होतीं. इतरांना देखील कम्युनिस्ट पार्टींत हाच अनुभव येतो. मी तर बेधडकपणें असें सांगूं शकेन कीं, ज्याच्या रोमरोमांत तिरस्कार भरलेला नाहीं, असा कम्युनिस्टच कोठें भेटायचा नाहीं. त्याला कारण आहे. जे वृत्तीनें बंडखोर असतात ते सहजासहजीं कोणाच्या आहारीं जात नाहींत. पक्षशिस्तीच्या धारेवर धरूनच त्यांना सुतासारखें सरळ करावें लागतें. पण पक्षशिस्तीच्या आसुडाचे वळ मात्र त्यांच्या मनावर तिरस्काराच्या रूपानें वज्रलेप होऊन राहातात.

या ठिकाणीं कम्युनिस्ट पार्टींत मला आलेले सारे अनुभव ग्रथित करण्याचा माझा मानस नाहीं. परंतु, शेवटीं मी ज्या निर्णयाला येऊन पोहोंचलों त्याला कारणीभूत झालेले कांहीं प्रसंग नमूद करणें मात्र अपरिहार्य आहे.

पक्षांत फार वरच्या पदाला मी कधींच पोहोंचलों नाहीं. तेरा वर्षें मी पार्टींत होतों, पण इतक्या वर्षांत मला बढती अशी कधींच मिळाली नाहीं. 'फास्ट चांगलें बोलतो. आणखीहि कांहीं गुण त्याच्यांत आहेत; पण राजकीय दृष्ट्या मात्र त्याची पुरेशी वाढ झालेली नाहीं.' असें माझ्याविषयीं पार्टींत बोललें जाई. आणि सुरुवातीला मला तें खरें वाटे. ज्या विभागांत मला दाखल करून घेण्यांत आलें होतें त्या विभागाचा प्रमुख हा मला भेटलेला पहिला कम्युनिस्ट पुढारी. त्यानेंहि माझ्या मनावर असेंच ठसविण्याचा प्रयत्न केला कीं, माझ्या मनांत विचारांची स्पष्टता नसून माझा नुसता गोंधळ उडून गेलेला आहे. पण माझ्या "राजकीय वाढीच्या दृष्टीनें ही गोष्ट अत्यंत हानिकारक ठरणारी आहे," अशी तो मला भीति घाली आणि माझ्या विचारांत स्पष्टता येण्यासाठीं मला जरूर ती मदत करण्याचीहि तो मोठ्या आनंदानें तयारी दर्शवी.

मीं मागें एका ठिकाणीं पक्षाला मंदिराची उपमा दिली होती. आणि पक्षाचे फतवे हे कार्यकर्त्यांनीं वेदवाक्याप्रमाणें मानले पाहिजेत; पक्षाच्या नेत्यांपुढें धर्मप्रमुखाप्रमाणें मान तुकविली पाहिजे अशी परिस्थिति असल्याचें म्हटलें होतें, त्याचें रहस्य आतां लक्षांत येऊं शकेल.

हा प्रसंग घडला त्या वेळीं 'फ्रीडम रोड' हें माझें पुस्तक छापून तयार झालें होतें. लवकरच त्याचें प्रकाशनहि होणार होतें. मी आमच्या ह्या

विभाग-प्रमुखाला त्याची एक प्रत वाचावयास दिली होती. पण त्यानें उलट त्या पुस्तकाच्या आणखी पांच-सात प्रतींची माझ्याकडे मागणी केली.

त्यानें मला सांगितलें कीं, माझ्या पुस्तकामुळें बऱ्याच भानगडी उपस्थित होणार आहेत. मीं तें पुस्तक पक्षाचा सभासद होण्यापूर्वीं लिहिलें होतें, ही गोष्ट त्यालाहि मान्य होती. पण तेवढ्यानें त्या भानगडी मिटण्यासारख्या नव्हत्या. मी पक्षांत आल्याबरोबर अशा प्रकारें टीकेचा विषय बनावें असें त्याला वाटत नव्हतें.

त्याचें हें बोलणें ऐकून मी कमालीचा अस्वस्थ होऊन गेलों. आणि पुढें दर पुस्तकाच्या वेळीं मला असाच अनुभव येऊं लागला. माझ्या हातून अशी चूक तरी काय झाली आहे ? असें मीं त्याला मोठ्या आजीजीनें विचारलें. त्याच्या मतें मीं फार घोडचूक केली होती. माझ्या कादंबरींत कांहीं ठिकाणीं मी निग्रोंचा ' निगर ' म्हणून उल्लेख केलेला होता आणि तेवढ्यासाठीं मला पक्षांतून हाकून देखील लावतां आलें असतें. त्याशिवाय ' सिटिझन् टॉम पेन ' या माझ्या मागच्या एका कादंबरींत कांहीं ट्रॉट्स्कीवादी प्रवृत्ति डोकावत असल्याचेंहि माईक गोल्डच्या निदर्शनास आलें होतें. अर्थात् आमचा हा विभागसंघटक त्याच्याशीं सहमत होता असें नव्हे. उलट, तो महामूर्ख आहे त्याची अशीच समजूत होती. पण नुसती अशी समजूत असून काय उपयोग ? कारण माईक गोल्डच्या शब्दाला पार्टींत जास्त किंमत होती.

मीं तो शब्द कोणत्या पार्श्वभूमीवर वापरला आहे आणि तो वापरणेंच कसें अपरिहार्य होतें तें पटवून देण्याचा परोपरीनें प्रयत्न करून पाहिला. शिवाय, पुस्तक छापून तयार झालें असल्यानें आतां कांहीं करतां येण्यासारखें नाहीं हेंहि त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा कांहींहि उपयोग झाला नाहीं. तथापि, कांहीं प्रमुख कम्युनिस्ट पुढाऱ्यांपर्यंत त्याचे हात पोहोंचण्यासारखे होते. त्याचा फायदा घेऊन त्यांच्यापाशीं माझ्याबद्दल रदबदली करण्याचें त्यानें मला आश्वासन दिलें. अशा तऱ्हेनें माझ्यावरचें पहिलें गंडांतर टळलें.

विशेष म्हणजे त्या पुस्तकाच्या जवळ जवळ वीस लाख प्रती खपल्या. आणि मुख्य म्हणजे ज्या निग्रोंचा मी ' निगर ' म्हणून अधिक्षेप केला

असा माझ्यावर आरोप करण्यांत आला होता, त्यांना तर तें पुस्तक कमालीचें आवडलें. पक्षानें त्याच्यावर आपल्या नापसंतीचा शिक्का मारतांना निग्रो जनतेच्या या भावना जरादेखील विचारांत घेतल्या नव्हत्या, पण असा आचरटपणा पक्षातर्फे सारखाच करण्यांत येतो.

कम्युनिस्ट पार्टीनें वर्ज्य ठरविलेले कांहीं शब्द नुसते उच्चारले, एवढ्या कारणासाठीं अनेक जणांचें सभासदत्व रद्द करण्यांत आल्याचें मला माहीत आहे. त्याचा परिणाम शेवटीं असा झाला कीं, कम्युनिस्टांना निग्रो लोकांत काम करणें अशक्य झालें, आणि पक्षाला तेथें ओहोटी लागली. शेवटीं वुइल्यम झेड् फॉस्टरला मध्यें पडून एकांतिक भूमिकेला पायबंद घालावा लागला; आणि त्यानें तसें केलें नसतें तर तेथील सारी पक्षसंघटनाच ढांसळून पडली असती.

पण पक्षाचा आचरटपणा काय सांगावा ! पक्षाच्या प्रकाशनांतून " निगर " हा शब्द कटाक्षानें गाळण्यांत येई. आणि त्याऐवजीं त्याचीं नुसतीं आद्यन्त अक्षरें लिहिलीं जात. हा शब्द निग्रोंच्या भावना दुखवणारा आहे हें तर खरेंच, पण त्यांतील मधलीं अक्षरें गाळल्यानें सामाजिक परिस्थिति का एकदम पालटणार आहे ? पण कम्युनिस्ट नीतीच्या कल्पना या अशा विचित्र आहेत.

साहजिकच कोणीहि असें म्हणेल कीं, असें जर होतें तर हॉवर्ड फास्ट इतकीं वर्षें कम्युनिस्ट पक्षांत राहिलाच कसा ? त्यांची शंका बरोबर असली तरी त्याचें उत्तर देणें इतकें सोपें नाहीं. " मी पक्षांत आलों तो फॅसिझम्-विरोधक आणि समाजवाद व जागतिक शांतता यांचा पुरस्कर्ता म्हणून. लेखनाच्या बाबतींत पार्टीचीं मतें चूक असलीं तरी तेवढ्यासाठीं मला पक्ष सोडून चालणार नाहीं," असें त्या वेळीं मी स्वतःचें समाधान करून घेत असें.

आणि जसजशीं वर्षें लोटत गेलीं तसतशी माझ्यावर असें लटकें समाधान करून घेण्याची पाळी वारंवार येऊं लागली. शेवटीं एक वेळ अशी येऊन ठेपली कीं, ' इतकें सर्व होऊनहि मी टिकून राहिलों, कम्युनिस्ट पक्षांतून माझी हकालपट्टी होऊं शकली नाहीं,' यांतच मला एकप्रकारचा विकृत अभिमान वाटूं लागला. कम्युनिस्ट पक्षाचे पुढारी वारंवार बदलत होते.

परंतु त्या सर्वांची वृत्ति एकाच सांच्याची होती. अर्थात् या बाबतींत मीं जो चिवटपणा दाखविला त्यांत अभिमान वाटण्यासारखें कांहींच नव्हतें. त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट इतकीच कीं, मीं माझें लेखन सोडलें नाहीं.

त्या काळांत अमेरिकेंतील धंदेवाईक प्रकाशक माझीं पुस्तकें हातांतहि धरीत नसत. कारण त्यांच्या मतें मी कम्युनिस्टांचा भाट बनलों होतों. आणि कम्युनिस्ट माझ्या लिखाणांत भांडवलशाही प्रवृत्ति डोकावते म्हणून माझ्यावर आग पाखडीत होते. पण कम्युनिस्ट पार्टींतील प्रत्येक कलावंताची अशीच अडकित्त्यांत सांपडल्यासारखी अवस्था होऊन जाते. आणि अगदीं खरें सांगायचें तर इतर लेखकांपेक्षां माझी स्थिति कांहींशी बरी होती. कारण कम्युनिस्टेतर जगांतहि माझा खूप बोलबाला झाला होता. इतकेंच नव्हे तर आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत आणि विशेषतः रशियांत मला चांगली प्रतिष्ठा प्राप्त झालेली होती.

परंतु रशियाचा वरदहस्त माझ्या पाठीशीं असूनहि माझ्यामागचा पार्टीचा ससेमिरा चालूच होता. कम्युनिस्ट लेखकांनीं काय लिहावयाचें त्याचा आदेश पार्टीकडून येत असतो अशी एक समजूत प्रचलित आहे. पण ती आजिबात खरी नाहीं. कारण एक तर कलावंतांना आदेश देण्याइतकी कल्पकता कम्युनिस्ट नेत्यांजवळ नसते, आणि दुसरें म्हणजे असे आदेश देण्यांत आले तर ते निष्प्रभ आणि निष्क्रिय बनून जातील याची त्यांनाहि बरोबर जाणीव असते.

कम्युनिस्ट लेखकांसंबंधीं दुसरी अशी एक समजूत प्रचलित आहे कीं, त्यांना आपलीं हस्तलिखितें प्रकाशनापूर्वीं पार्टीच्या पुढाऱ्यांना दाखवावीं लागतात. पण एक स्टेव्ह नेल्सन्चा अपवाद वगळला, तर पक्षांतील कोणत्याहि पुढाऱ्यानें ग्रंथ प्रसिद्ध होण्यापूर्वीं माझें हस्तलिखित कधीं वाचून पाहिलेलें नाहीं. पार्टींतील तज्ज्ञांनीं माझ्या लिखाणांतील भांडवलशाही पापें चव्हाट्यावर मांडून त्याविरुद्ध पक्ष-पुढाऱ्यांकडे दाद मागितली म्हणजे मग माझ्या लिखाणाकडे त्यांचें लक्ष वेधलें जावयाचें. मात्र मला कांहीं लेखक असे माहिती आहेत कीं, जे स्वखुषीनें आपलीं हस्तलिखितें पक्षाच्या

सांस्कृतिक नेत्याकडे तपासण्यासाठीं पाठवीत. अर्थात् त्यांच्या पार चिंधड्या उडविल्या जात. माझ्या बाबतींतहि अगदीं योगायोगानें असा प्रकार घडून आला आहे. मीं लिहिलेलें एक नाटक बसविण्यांत येत होतें. त्यांत काम करणाऱ्या एका नटीनें तें सहज वाचायला म्हणून पक्षाच्या एका कार्यकर्त्याला दिलें. तें वाचल्यानंतर त्यानें मला टेलिफोन करून ताबडतोब भेटीला बोलाविलें. आणि तेथें गेल्यावर मला त्या नाटकांतील तिसरा अंक सगळाच्या सगळा बदलून टाकायला फर्माविलें. मीं त्याचें ऐकलें नाहीं तर माझी पार्टींतून हकालपट्टी करण्याची धमकीहि त्यानें मला दिली. कारण त्या वेळचा पक्षाचा सरचिटणीस पेटिस पेरी हा त्याचा जानी दोस्त होता आणि नाइलाजानें मला त्याच्या सांगण्याप्रमाणें वागावें लागलें.

अशीं किती तरी उदाहरणें देतां येतील. त्यांत एक प्रकारची मानहानि असली तरी आतां मात्र मला असें वाटतें कीं, ती सारी मानहानि पत्करूनहि मी पार्टींत राहिलों आणि माझें सभासदत्व रद्द करूं दिलें नाहीं हेंच चांगलें झालें. कारण तसें झालें असतें तर पार्टींतून काढून टाकलेल्या इतर अनेक लेखकांप्रमाणेंच माझें केवळ निर्माल्य होऊन गेलें असतें. कस्पटाइतकी देखील किंमत मला कोणी दिली नसती.

पण तें इतकें सोपें नव्हतें. माझ्या प्रत्येक पुस्तकाच्या वेळीं पार्टींत माझ्यावर टीकेची झोड उठविण्यांत येत होती. 'क्लार्कटन' या माझ्या कादंबरीवरील टीकेचें वादळ शमल्यानंतर कांहीं दिवसांनीं माझें "माय ग्लोरियस ब्रदर्स" हें नवें पुस्तक प्रसिद्ध झालें. त्यांत मी ज्यूंच्या भांडवलशाही राष्ट्रवादाला चिथावणी दिल्याच्या आरोपावरून मला पक्षाच्या चिटणीस समितीपुढें उभें करण्यांत आलें. इतरांच्या बाबतींत राष्ट्रवाद हा पुरोगामी आणि कौतुकास्पद ठरतो. परंतु ज्यूंच्या बाबतींत मात्र तोच राष्ट्रवाद पक्षविरोधी प्रतिगामी आणि रशियाविरोधी कसा ठरतो ? पक्षांत देखील त्या वेळीं हा एक चेष्टेचा विषय होऊन बसला होता. रशियानें मात्र या प्रश्नाची निराळ्याच तऱ्हेनें वाट लाविली. मीं हें पुस्तक लिहिलें आहे हें कोणाला समजणारच नाहीं याची तेथें दक्षता घेण्यांत आली. त्या पुस्तकावरचे अभिप्राय तर दडपून टाकण्यांत आलेच, पण माझ्या समग्र वाङ्मयाची जी तपशीलवार यादी प्रसिद्ध करण्यांत आली तींत मी लिहिलेल्या अगदीं

सटरफटर लेखांचा देखील नामनिर्देश करण्यांत आला. परंतु माझ्या या पुस्तकाचें नांव मात्र नेमकें त्यांतून वगळण्यांत आलें.

माझें " दि प्राइड अँड दि फ्री " हें पुस्तक बाहेर आल्यावर पुन्हा एकदां मला पक्षाच्या खास समितीसमोर उभें करण्यांत आलें. त्या वेळीं माझ्यावर फार गंभीर आरोप करण्यांत आले होते. आणि त्या पुस्तकाबद्दल जर मीं जाहीर माफी मागितली नाहीं, तर मला पक्षांतून काढून टाकण्यांत येईल अशी धमकीहि देण्यांत आली.

माझ्या सगळ्या पुस्तकांत हें पुस्तक मला सर्वांत जास्त आवडतें. अमेरिकेंतील क्रान्तीच्या पार्श्वभूमीवर मीं तें लिहिलेलें आहे. सारा विनय बाजूला सारून इतकेंच नव्हे तर गर्विष्ठपणा पदरीं येण्याचा धोका पत्करूनहि मी सांगतों कीं, त्या विषयावर इतकें चांगलें पुस्तक अमेरिकेंत लिहिलें गेलेलें नाहीं. त्यासाठीं मीं मेहनतहि खूप घेतली होती. फार परिश्रमपूर्वक संशोधन करून क्रान्तीच्या वेळची माहिती मीं मिळविली होती. त्याचप्रमाणें त्या वेळीं जी भाषा बोलली जात असे, ती कानांत बसावी म्हणून मी दूरदूरच्या लोकांत जाऊन मुद्दाम मिसळलों होतों.

आणि इतकें सगळें करून पक्षानें नेमलेली खास समिति मला जाहीर माफी मागण्याचा हुकूम फर्मावीत होती. आणि ती कशाकरितां तर त्या पुस्तकांत मीं एका शिपायाच्या तोंडीं निग्रोला उद्देशून ‘ नेगर ’ असा अठराव्या शतकांतील शब्द घातला होता म्हणून ! ‘ पोलिटिकल ॲफेअर ’मधून या माझ्या पापाची मीं जाहीर कबुली द्यावी व त्याबद्दल क्षमायाचना करावी अशी पक्ष-नेत्यांची अपेक्षा होती. म्हणजे मी ज्या काळाचें चित्रण केलें होतें त्या काळांतील सैनिकदेखील फार जागृत होते. आणि आपल्या तोंडीं जे शब्द घातले आहेत त्यामुळें मार्क्सवादांतील मूलभूत क्रान्तीकारी तत्त्वांना बाध येईल याची त्यांनादेखील जाणीव होती, असेंच मीं कबूल करावयाचें होतें.

पण माझ्यानें तें होणें शक्य नव्हतें. माझ्या पहिल्या पुस्तकावरून जो प्रसंग निर्माण झाला होता त्याला आतां सात वर्षें होऊन गेलीं होतीं. आणि अशा गोष्टींचा मला आतां सराव झाला होता. तरीदेखील माफी मागायचें नाकारून मी माझें सभासदत्व रद्द करून टाकायला तयार झालों

असतों कीं, नाहीं हा प्रश्नच आहे. परंतु एकपरीनें सरकारनेंच मला त्या संकटांतून सोडविलें. 'पोलिटिकल ॲफेअर' या नियतकालिकावर आणि त्यांत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवर सरकारनें अचानक धाड घातली. त्यामुळें मग हें माफीचें प्रकरण वर्ष दीड वर्ष मागें पडलें. त्यानंतर तें कदाचित् पुन्हां उपटलें असतें; पण तोंपर्यंत "स्पार्टैकस" या माझ्या नव्या कादंबरीनें एक नवेंच गडांतर निर्माण करून ठेविलें होतें.

'स्पार्टैकस' ही माझी कादंबरी सर्वोत्तम समजली जाते. रोमन साम्राज्याच्या उतरत्या काळांत 'स्पार्टैकस' नांवाच्या एका गुलामानें बंड करून रोमन लोकांची सारी सत्ता खिळखिळी करून टाकली, ती हकिगत मीं या कादंबरींत रंगविली आहे. पण त्यांतील पात्रांचें स्वभाव-चित्रण कम्युनिस्ट पार्टींतील सांस्कृतिक नेत्यांना कम्युनिस्ट संस्कृतीला बाधा आणणारें व भांडवलशाही वृत्तीचें द्योतक वाटलें व तेवढ्यासाठीं त्यांनीं माझ्यावर टीकेचा भडिमार सुरू केला.

मला बदनाम करण्यासाठीं म्हणून मुद्दाम कम्युनिस्टांकडून माझ्या त्या पुस्तकावर अभिप्राय मागविण्यांत आले; पण ते सर्व चांगलेच आल्यामुळें अखेर ते प्रसिद्ध न करतां दडपून टाकण्यांत आले.

तें पुस्तक पार बरबाद करून टाकण्याचा पक्षांतील पुढाऱ्यांचा ठाम निश्चय होता. कारण त्यांच्या मतें मीं एक अत्यंत रद्दी व टाकाऊ असें पुस्तक लिहिलें होतें. आणि आपला हा निर्धार त्यांनीं बोलूनहि दाखविला.

त्या रात्रीं मला किती वाईट वाटलें म्हणून सांगूं! माझ्या त्या पुस्तकाबरोबरच लेखक म्हणून मी जें कांहीं नांव मिळविलें होतें तें साफ धुळीला मिळणार, हा विचार मला असह्य होत होता. आमच्या पुढाऱ्यांच्या मतें मी पक्षाचे आदेश धुडकावून एक महापातक करून बसलों होतों. अमेरिकेंतील प्रकाशक तर माझ्याकडे ढुंकूनहि पाहायला तयार नव्हते कारण मी कम्युनिस्ट होतों, आणि इकडे कम्युनिस्टहि मला साहित्यक्षेत्रांतून कायमचें उठविण्यासाठीं सिद्ध झाले होते. आपल्या पक्षाच्या शिस्तीच्या कैचींत ते मला पकडूं पाहात होते, माझ्या लेखनव्यवसायाची ती इतिश्री ठरणार या जाणिवेनें त्या रात्रीं मी अक्षरशः रडलों. लेखक म्हणून मी संपूर्णपणें अपेशी ठरलों होतों.

◎ ◎ ◎

## १७

त्यानंतरहि मीं अनेक पुस्तकें लिहिलीं. पक्षाचीं सर्व पथ्यें पाळून आणि माझीं हस्तलिखितें पुनः पुन्हा काळजीपूर्वक तपासून मगच तीं मी हातावेगळीं करीत असें. त्यामुळें पक्षनेत्यांच्या रोषाला तीं बळीं पडलीं नाहींत हें खरें, पण त्यांत पूर्वींच्या पुस्तकांची चमक जरादेखील नव्हती.

पण यावरून असा मात्र निष्कर्ष काढतां येणार नाहीं कीं, लेखकांसंबंधीं कम्युनिस्टांचें धोरण हें केवळ त्रास देण्याचेंच असतें. उलट जनतेचीं मतें बनविण्यांत लेखक फार मोठी कामगिरी बजावूं शकतो याची पार्टीला यथार्थ जाणीव असते. आणि म्हणून साहित्यिक हा कम्युनिस्ट आंदोलनाचा सुप्त विरोधक ठरण्याचा धोका असला तरी त्याच्या मदतीवांचून त्या आंदोलनाला धार येऊं शकणार नाहीं किंवा त्याचें पाऊल पुढें पडूं शकणार नाहीं, हें कम्युनिस्ट नेते ओळखून असतात.

लेखकाचें वर्णन स्टॅलिननें " मानवी मनाचे शिल्पकार " असें केलें आहे. अर्थात् हे शब्द स्टॅलिनचेच आहेत कीं, ते त्याच्या तोंडीं घालण्यांत आले आहेत हा प्रश्नच आहे. कारण स्टॅलिनच्या नांवावर खपविण्यांत येणारीं पुष्कळशीं वचनें त्याचीं स्वतःचीं नाहींत. पण तो महत्त्वाचा मुद्दा नाहीं. त्यांतील खरी विसंगति ही आहे कीं ' मानवी मन ' अशी कांहीं चीज आहे हेंच मुळीं तो मान्य करायला तयार नव्हता. त्यानें मानवी मनाचे शिल्पकार म्हणून साहित्यिकांचा गौरव करावा आणि इतरांनीं मुकाट्यानें त्याला माना डोलवाव्यात.

शिवाय मानवी मनाचे शिल्पकार म्हणवून घेतांना लेखकाच्या मनाला गुदगुल्या झाल्या तरी त्यामागें त्यानें एका विशिष्ट यांत्रिक पद्धतीनेंच आपलें लेखन केलें पाहिजे ही कल्पना अध्याहृत असते हें विसरून चालणार नाहीं. आणि लेखनांत यांत्रिकता आली म्हणजे हास्य किंवा सहजता मावळलीच म्हणून समजावें. केवळ मनोरंजन म्हणून लेखन करण्यांत जो एक अपार आनंद आहे त्याला कम्युनिस्ट लेखकाला कायमचें पारखें व्हावें लागतें.

लेखक म्हणून आम्हां कम्युनिस्टांना कम्युनिस्ट पार्टीचा जो विलक्षण अनुभव येत गेला त्याची कांहींशी कल्पना माझ्या या लिखाणावरून येऊं शकेल. आम्हीं उराशीं बाळगलेलीं ध्येयस्वप्नें आणि तीं पार उद्‌ध्वस्त करून आपली अनिर्बंध आणि अबाधित सत्ता जनतेवर लादण्यासाठीं कम्युनिस्ट पार्टीची चाललेली धडपड अशा कात्रींत आम्ही सांपडलों होतों. अमेरिकेंत लोकशाहीच्या विशिष्ट परंपरा आहेत. आणि त्यांना कायद्याचें संरक्षणहि आहे. रशियांत यांपैकीं कशाचाच पत्ता नाहीं. त्यामुळें सत्तांध बनलेल्या कम्युनिस्ट नेत्यांना पदच्युत करावयाचें असेल, तर जनतेनेंच पुढाकार घेऊन त्यांच्याभोंवतीं निर्माण करण्यांत आलेलें वलय नाहींसें करून टाकलें पाहिजे. कम्युनिस्ट पार्टीच्या चौकटीला एखाद्या पवित्र मंदिरासारखें पवित्र मानण्याची वृत्ति टाकून देऊन त्या मंदिरांतील बडव्यांविषयींची अंधभक्ति सोडून दिली पाहिजे. आणि तशी वेळ येणार आहे.

कम्युनिस्ट लेखकांनीं काढलेला एकंदर निष्कर्ष हाच आहे. स्वातंत्र्य, बंधुभाव इत्यादि ध्येयांनीं आम्हीं भारलें गेलों होतों. परंतु त्याचा खरा अन्वयार्थ आमच्या ध्यानांत आल्याबरोबर आम्हीं कम्युनिस्ट पार्टीबरोबर दोन हात करावयास सिद्ध झालों. तसें करतांना माझ्या अनेक सहकाऱ्यांची आहुति पडली.

कम्युनिस्ट पार्टीसाठीं मला स्वतःला मानखंडना सहन करावी लागली. मी मोठ्या आशेनें बांधलेले उंच उंच मनोरे जमीनदोस्त झाले; पण मला त्याचें कांहीं वाटत नाहीं. कम्युनिस्ट मठपति माझ्यासारख्या लेखकाची कशी ससेहोलपट करून टाकतात त्याला खरें महत्त्व आहे.

पण तरीहि साहित्यिकांचा आवाज कायमचा गुदमरवून टाकण्याच्या कामीं त्यांना यश आलेलें नाहीं. अमेरिकेंतील कोणत्याच नांव घेण्यासारख्या लेखकाच्या बाबतींत त्यांचें उद्दिष्ट सफल झालेलें नाहीं. रशियासारख्या ज्या देशांत कम्युनिस्ट पार्टी सत्तारूढ आहे तेथें तिच्या हातीं लेखकांचा हवा तसा छळ करण्याची सुभा असूनहि ते लेखकांना नमवूं शकले नाहींत.

"प्रत्येक मनुष्याच्या कपाळीं नियतीनें स्वतंत्रता लिहूनच ठेवलेली असते. नियतीनें म्हणण्याचें कारण असें कीं, मनुष्याची निर्मिति त्याच्या हातीं नसते. पण एकदां त्यानें जगांत पदार्पण केलें कीं, मग मात्र त्याच्या

प्रत्येक कृत्याला त्याचा तोच जबाबदार असतो.'' असें सात्रे नांवाच्या विख्यात लेखकानें लिहून ठेवलें आहे.

त्याचें हें वचन अंतिम सत्याच्या कसोटीला उतरतें कीं नाहीं, तें मला सांगतां येणार नाहीं. एवढेंच नव्हे तर अंतिम सत्य अशी कांहीं चीज असते कीं नाहीं हेंहि मला सांगतां येणार नाहीं. पण लेखकाच्या बाबतींत मात्र तें विधान सत्याशीं अगदीं सुसंगत आहे असा निर्वाळा मी देऊं शकेन. लेखकाला पुनर्निर्मितीचें कार्य पार पाडावयाचें असतें. ही पुनर्निर्मिति त्याला आलेल्या अनुभूतीच्या आधारें तो करीत असतो. या अनुभूतीशीं जर तो एकनिष्ठ राहिला नाहीं, तर त्याच्या हातून सत्याची प्रतारणा झाल्यावांचून राहणार नाहीं.

हा सर्व अनुभव घेऊन शेवटीं कम्युनिस्ट पार्टीबरोबरचे संबंध झुगारून दिलेल्या आम्हां सर्व लेखकांचा कांहीं फायदा झाला नाहीं असें मात्र म्हणतां येणार नाहीं. त्या अनुभवामधूनच आम्हांला अत्यंत महत्त्वाचा धडा शिकतां आला. त्यासाठीं आम्हांला फार मोठी किंमत मोजावी लागली हें खरें. पण मोल दिल्यावांचून कोणतीच गोष्ट आत्मसात् करतां येत नाहीं. कम्युनिस्ट पार्टीमधून फुटून निघतांना आम्हांला मानसिक यातना सहन कराव्या लागल्या हें तर खरेंच; पण जे अन्य लेखक या मार्गाचा अवलंब करूं शकले नाहींत ते अपार यातनांनीं मनांतल्या मनांत एकसारखे पिचत राहिले आहेत. इतकीं वर्षें आम्ही एका विचित्र मार्गानें जात होतों; पण आतां तो प्रवास संपला आहे. आमच्या या मार्गक्रमणाचा शेवट मन अस्वस्थ करून टाकणारा असला तरी त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट अशी आहे कीं, आम्ही आतां पार्टीच्या काचांतून मुक्त होऊन स्वतंत्र वातावरणांत आलों आहोंत.

◎ ◎ ◎

## १८

कम्युनिस्ट पार्टी सोडतांना विलक्षण भीति वाटत असते. कम्युनिस्ट पार्टीचें स्वरूप आजच्यापेक्षां निराळें असतें, किंवा इतर चार संघटनांसारखी ती एक असती तर अशी भीति वाटली नसती. जेव्हां एखादा कम्युनिस्ट हा

पक्षाचा त्याग करतो तेव्हां त्याची काय अवस्था होते त्याची इतरांना कल्पना येणार नाहीं.

सर्वसामान्य लोक चटकन् बोलून जातात कीं, ‘ कम्युनिस्ट पार्टी ही काय चीज आहे हें आम्हीं कधींच ओळखलें होतें. तुम्हांस तें ‘ समजावयाला इतका वेळ कसा लागला ? ’

पण हा भ्रम आहे. कम्युनिस्टांव्यतिरिक्त इतरांना मुळीं पक्षाचें अंतरंग समजणारच नाहीं. फार काय, या पुस्तकांत मीं पक्षाचें जें चित्र रगविण्याचा प्रयत्न केला आहे त्याचें तरी किती जणांना आकलन होईल हा प्रश्नच आहे. पक्षाच्या सभासदांच्या मनांत तर नाना प्रकारच्या उलटसुलट विचारांचा नुसता कल्लोळ माजलेला असतो. मागें एके ठिकाणीं एका कम्युनिस्टानें काढलेले उद्‌गार असे आहेत.

तो म्हणतो, “ आम्हीं कम्युनिस्टांनीं धैर्यानें आणि इज्जतीनें मृत्यु कसा पत्कारावा त्याचा जगाला धडा घालून दिला. पण आमच्या स्वतःवर ज्या वेळीं दुसऱ्याच्या हातून मरण्याची पाळी आली त्या वेळीं मात्र त्यांनीं आम्हांला थोडी देखील प्रतिष्ठा लाभूं दिली नाहीं...”

कम्युनिस्ट पक्षांत कितीहि दोष असोत, व्यक्तिशः कम्युनिस्ट सभासद हा उदासतेला कायमचा पारखा झालेला असतो, असें कोणी म्हणेल तर कम्युनिस्ट पक्षाच्या ज्या विशिष्ट संघटनेमुळें ही भयानकता निर्माण होते तिचें त्याला नीट आकलनच झालें नाहीं असें म्हणावें लागेल.

स्टॅलिन आणि त्याचे हस्तक ह्यांच्या हुकुमावरून रशियन गुप्त-पोलिसांनीं २००० कम्युनिस्ट पोलिसांची कत्तल केल्याची हकीगत अमेरिकेंतील वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाली होती कीं नाहीं तें माझ्या स्मरणांत नाहीं. परंतु ती हकीगत मला पोलिस व्यक्तीकडूनच समजली आहे आणि त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल संशय घ्यावयाला कोणतीहि जागा नाहीं. त्याच्याच शब्दांत सांगावयाचें तर मारले गेलेले सारे जण कम्युनिस्ट आंदोलनाचे बिनीवरील लढवय्ये होते.

अशा तऱ्हेनें कम्युनिस्ट पार्टी आपल्यांतीलच खंद्या कार्यकर्त्यांचा नायनाट कसा करूं शकते तें समजणें सोपें नाहीं. पण त्या योगें पार्टी स्वतः स्वतःचा

नाश करून घेत असते एवढें मात्र खरें. शुद्ध आणि सात्त्विक प्रवृत्तींचा चोळामेळा करून पक्षांत हीन तेवढें जमा केलें जातें, बुद्धिवादाचा निर्वाळा देतां देतां बुद्धिवादाशींच वैर पत्करलें जातें आणि एकीकडे पुरोगामित्वाचा टेंभा मिरवीत असतांना दुसरीकडे प्रगतीची वाट पक्षाकडूनच रोखली जाते.

बदल हाच काय तो जगांत एक अविनाशी आहे असें 'मार्क्सवादा 'चें मूलभूत सूत्र आहे. म्हणून कम्युनिस्टांनीं पक्षाला प्राप्त झालेलें ओंगळ मंदिराचें स्वरूप टाकून देऊन त्या मंदिरांतील बडव्यांप्रमाणें वागणाऱ्या पुढाऱ्यांची भंबेरी उडविण्यास सिद्ध झालें पाहिजे. त्यामुळें ते केवळ त्यांच्या पक्षाचीच नव्हे तर साऱ्या मानवजातीची सेवा बजावणार आहेत. त्याचप्रमाणें जे कम्युनिस्ट नाहींत त्यांनीं देखील कम्युनिस्ट पार्टीची ऐतिहासिक वाढ कसकशी होत गेली तें समजावून घेतलें पाहिजे.

केवळ सामर्थ्याच्या जोरावर कम्युनिस्ट पार्टीचा बींमोड करतां येणार नाहीं. पण कम्युनिस्ट पक्षांतील सभासदांना जर सत्याचें दर्शन घडत गेलें तर मात्र पावसानें मीठ विरघळून जावें तशी कम्युनिस्ट पार्टीची अवस्था होऊन जाईल. त्या पार्टीचे दिवस आतां भरत आले आहेत. रशिया आणि चीन-मधील जनतेला हें सत्य दर्शन होऊं लागलें आहे. असें कांहीं घडून येईल असें ह्या शतकाच्या सुरुवातीला कोणाच्या स्वप्नांतहि आलें नसतें. कुश्चेव्हनें स्वतःच आपल्या भाषणांत नमूद केल्याप्रमाणें स्टॅलिनसारख्या पिसाटाच्या हातीं सत्ता गेल्यामुळेंच रशियाचा पाडाव होण्याची घटका भरत आली होती. आणि तरीहि त्यांनीं रशियांत नवनिर्मितीचें महान् कार्य तडीस नेलें असें कोणी समजत असेल तर त्याची गणना मूर्खांतच केली पाहिजे. राष्ट्राच्या उभारणीला लागणारे गुण रशियन जनतेंत नाहींत असें मुळींच नाहीं. कम्युनिस्ट पार्टीच्या जोखडांतून तिची मुक्तता होऊन सध्यांच्या सामाजीकरणाला तेथें लोकशाहीची जोड मिळाली तर रशियाची जनता अल्पावकाशांत आपल्या देशाचें नंदनवन बनवून टाकील.

पण हें घडून कसें येणार? निरनिराळ्या देशांप्रमाणेंच रशियांतहि कम्युनिस्ट पार्टीबरोबर कशा प्रकारचे संबंध ठेवावयाचे तें तेथील जनतेनेंच ठरवावयाचें आहे. ज्या वेळीं बहुसंख्य पक्ष-सभासदांना कम्युनिस्ट पार्टीचें-

सत्य स्वरूप समजूं लागेल, त्याच वेळीं तिची एकतंत्री सत्ता संपुष्टांत येण्याचा सुदिन उगवेल.

पण त्यासाठीं त्यांनीं भीति टाकून दिली पाहिजे. कारण ईश्वरासमान होऊन बसलेल्या पक्षांतील छोट्या-मोठ्या पुढाऱ्यांविषयींच्या भीतीनें सारा पक्ष पछाडला गेला आहे. दुर्दैवानें पाश्चात्त्य राष्ट्रेंच आतां आपल्या मूर्ख-पणामुळें कम्युनिस्ट पार्टीला जीवदान देतात कीं काय, असा धोका निर्माण झाला आहे. कुश्चेव्हच्या भाषणावरून हें स्पष्ट झालें आहे कीं, रशियावर युद्ध लादलें गेलें तर तो त्या देशाला शाप न ठरतां वरदानच ठरेल. कारण युद्धामुळें रशियांतील सर्व गट आपापले मतभेद विसरून एकजूट होतात व त्यामुळें पक्षाचा सांगाडा अभंग राहण्यास मदतच होते.

देव करो आणि असें कांहीं न होवो ! आज असा एक क्षण येऊन ठेपला आहे कीं, ज्या वेळीं समाजविकासाला एक नवी कलाटणी मिळण्याचा संभव आहे. मात्र, आपण उतावीळ न होतां मानवसमाजावर संपूर्ण भरंवसा ठेवून आपलें पाऊल उचललें पाहिजे. कम्युनिस्ट पार्टीचा अस्त होऊन समाजवादी नोकरशाही आणि मानवतेचा उदय होण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं आहेत. मात्र, ज्या देशांत कम्युनिस्ट पार्टीची सत्ता आहे त्या देशांतील जनताच या प्रश्नाचा निकाल लावूं शकेल.

◎ ◎ ◎

## ११

हें सगळें लिहितांना माझ्या मनांत संदेह निर्माण झाला नाहीं असें नाहीं. त्याशिवाय मुळीं मी हें लिहूंच शकलों नसतों. ऐतिहासिक दृष्ट्या घडत गेलेल्या घटनांची संगति लावण्याचा प्रयत्न करीत असतांना आपल्या हातून सत्याची प्रतारणा तर होत नसेल ना अशी शंका लेखकाच्या मनांत डोकावल्यावांचून कशी राहील ? मी या साऱ्या घडामोडींचा जाहीरपणें परिस्फोट न करतां खाजगीरीत्या कांहींहि बोललों असतों तर माझ्या कम्युनिस्ट मित्रांना त्याचें कांहीं वाटलें नसतें. त्यांचें मत असें होतें आणि आजहि आहे— कीं, विसाव्या कॉंग्रेसचें अधिवेशन झालें आणि

त्यांत क्रुश्चेव्हनें साऱ्या दुष्कृत्यांचा पाढा वाचणारा गुप्त अहवाल सादर केला हेंच मुळीं पक्षांत इष्ट तो बदल घडून येत असल्याचें द्योतक आहे.

१९५६ च्या फेब्रुवारींत रशियन कम्युनिस्ट पार्टीचें विसावें अधिवेशन झाल्यापासून सबंध एक वर्ष म्हणजे १९५७ च्या फेब्रुवारीपर्यंत मीं अगदीं मौन पाळलें होतें. कम्युनिस्ट पक्षाविषयीं माझ्या भूमिकेंत झालेल्या बदलाचा गौप्यस्फोट मीं होऊं दिला नाहीं त्या काळांत क्रेमलिनमध्यें क्रुश्चेव्हचा उदय होऊन तो सर्वसत्ताधारी बनला. " नवीन प्रकारचा पुढारी " म्हणून त्याचा उदोउदो होऊं लागला. स्टॅलिन इतका क्रूरकर्मी आणि पाषाणहृदयी खरा; परंतु रासवटपणा, आत्मश्लाघा आणि सत्तापिपासु वृत्ति यांचे बाबतींत त्याला देखील क्रुश्चेव्हनें मागें टाकलें. अर्थात् तो आपलीं पावलें फार मुत्सद्देगिरीनें टाकीत होता. पक्षाला हें सर्व नवीन होतें.

परंतु एका अर्थानें त्यानेंहि स्टॅलिननें घालून दिलेल्या परंपरेशीं इमान राखलें. कम्युनिस्ट पार्टीचा नेता हा सर्व ज्ञानाचा गाभा असला पाहिजे, या समजुतीला त्यानेंहि धक्का लागूं दिला नाहीं. कारण पक्षाचें नेतृत्व आतां त्याच्या हातीं आलें होतें. पक्षाचा " नव नेता " म्हणून विसाव्या कॉंग्रेसनंतर लेखकवर्गांत क्रांतीची जी लाट उसळूं पाहात होती ती काबूंत आणण्याची कामगिरी त्यानें स्वतःकडे घेतली. कम्युनिस्ट राष्ट्रांतील कला व तिचें नियंत्रण यांसंबंधीं त्यानें अगदीं अलीकडे जे उद्गार काढले त्यामुळें मात्र माझी संपूर्ण संशयनिवृत्ति झाली आणि पक्षासंबंधीं माझी उरलीसुरली आशा देखील हरपली.

विसाव्या कॉंग्रेसपुढें निकिता क्रुश्चेव्हनें स्टॅलिनच्या अनन्वित कृत्यांना वाचा फोडल्यानंतर सोव्हिएटमधील लेखकांच्या संघटनेचा प्रमुख फेडेएव्ह यानें आत्महत्या करून घेतली. परंतु इतर लेखकांत मात्र स्वातंत्र्याच्या ऊर्मि उसळूं लागल्या होत्या. एकदां का होईना, पण स्वातंत्र्याची नशा त्यांनीं अनुभवली होती आणि त्याचे पडसाद त्यांच्या लेखनांतूनहि उमटूं लागले होते. " नॉट बाय ब्रेड अलोन " हें पुस्तकदेखील त्या स्वातंत्र्यप्रेमाचें एक द्योतक आहे. या पुस्तकामुळें रशियांतील वाङ्मयाचा कायापालट तर होऊन गेला नाहीं ना, असा सुखद विचार माझ्याप्रमाणेंच इतरहि अनेकांच्या मनांत येऊन गेला. पण तो क्षणकालच टिकला. कारण त्या पुस्तकाबद्दल वाङ्मयीन टीकाकारांनींच

केवळ लेखकाला धारेवर धरलें असें नाहीं तर राष्ट्राच्या सर्वश्रेष्ठ सूत्रधारानेंहि त्या लेखकाचे चांगलेच कान उपटले. इतकेंच नव्हे तर त्यानें स्वच्छच सांगून टाकलें कीं,

" आम्ही अशा तऱ्हेच्या पुस्तकाचें लेखन यापुढें चालूं देणार नाहीं."

आणि हीच तर कम्युनिस्ट लेखकाची खरी शोकांतिका आहे. पुष्कळजण मोठ्या कळवळ्यानें असें विचारतात कीं, " समजा, लेखक म्हणून तुम्हांला अत्यंत मोलाचें वाटणारें असें स्वातंत्र्य थोडेंसें गमवावें लागलें, नव्हे अगदीं अभिजात वाङ्मयालादेखील कांहीं काल मुकावें लागलें, तरी सबंध मानव-समाजाची, समाजवादाच्या दिशेनें जी आगेकूच झालेली आहे, त्यासाठीं एवढा त्याग करायला काय हरकत आहे ?

ही विचारसरणी फार धोकेबाज आहे. कारण, त्यामागें अत्यंत जुलुमी व पाशवी मार्गाच्या समर्थनार्थ कोठल्या तरी अमूर्त ध्येयाचा उद्बोध करून त्यासाठीं सर्वसामान्य जनतेला स्वातंत्र्याची गळचेपी उघड्या डोळ्यांनीं बघावयास भाग पाडण्याची वृत्ति असते. अर्थात् यांत नवीन असें कांहीं नाहीं. ॲडॉल्फ हिटलरनेंदेखील याच मार्गाचा अवलंब केला होता. असत्य हेंच या बाबतींत दोघांचें भांडवल असतें.

वर उल्लेखिलेल्या क्रुश्चेव्हच्या भाषणांत या असत्याची चुणूक कशी दिसते ती पहा. तो म्हणतो :

" सोव्हिएट यूनियनमधील समाजाचें सामर्थ्य जर कशांत असेल तर तें तेथील जनता आणि कम्युनिस्ट पार्टी यांच्या एकात्मतेंतच आहे......"

कांहीं जण या विधानामुळें भारून जातील. कांहींना त्याच्या सत्यतेविषयीं शंका येईल; परंतु ज्यांनीं आपल्या आयुष्याचीं कांहीं वर्षें कम्युनिस्ट आंदोलनांत घालविलीं आहेत त्यांना मात्र त्यांतील बेछूट असत्याची तात्काळ ओळख पटेल. कम्युनिस्ट पार्टी आणि जनता एक नाहीं, त्यांच्यांत अजिबात एकात्मता नाहीं हें कम्युनिस्टांना माहीत आहे. क्रुश्चेव्ह धादान्त खोटें बोलत आहे याविषयींहि त्यांची मनोमन खात्री पटलेली आहे. इतकेंच नव्हे तर मीं या पुस्तकांत दाखवून दिल्याप्रमाणें खुद्द कम्युनिस्ट पार्टींत देखील एकात्मता नसते. निरनिराळ्या गटांनीं आणि परस्परांविषयींच्या

तिरस्कारानें ती विंधून निघालेली असते. परंतु केवळ धाकदपटशाहीच्या जोरावर पक्षांतील अनुयायी आणि पुढारी यांच्यांत कृत्रिम संबंध निर्माण करून त्यांच्यांतील मतभेद बाहेर येऊं दिले जात नाहींत. ज्या देशांत कम्युनिस्ट पार्टी सत्तारूढ नाहीं तेथें ही परिस्थिति मग ज्या देशांत कम्युनिस्ट पार्टी अधिकारारूढ असेल त्या देशांतील जनता आणि कम्युनिस्ट पार्टी यांतील संघर्ष किती तीव्र असेल आणि त्याचें स्वरूप किती भयानक असेल ! आणि तरीहि कुश्चेव्ह हा पार्टी आणि जनता यांच्या ऐक्याचा निर्वाळा देतो ही निलाजरेपणाची परमावधीच नव्हे काय ?

अशा रीतीनें कुश्चेव्हच्या गुप्त अहवालानंतर वर्ष दीड वर्षांतच लेखकांच्या स्वातंत्र्याचें भरत-वाक्य रशियांतील राष्ट्रप्रमुखानें उच्चारलें !

कम्युनिस्टांच्या कार्यपद्धतींत एकूण कांहींच बदल झाला नव्हता तर ! १९५४ सालीं रशियाचे प्रतिनिधी मला मोठ्या कळवळ्यानें सांगत कीं, यापुढें त्यांच्या देशांत एका व्यक्तीच्या हातीं इतकी सत्ता कधींच एकवटली जावयाची नाहीं. परंतु प्रत्यक्षांत काय दिसतें आहे ? एक व्यक्तीच सर्वसत्ताधारी बनली आहे. स्टॅलिनच्याच पाशवी मार्गानें त्यानें तें पद कसें बळकाविलें तें उभ्या जगाला माहीत झालें आहे., फरक इतकाच कीं, स्टॅलिन आपल्या सहकाऱ्यांचें शिरकाण करीत असे. कुश्चेव्ह त्यांचा पराभव झाल्यानंतर त्यांना जीवदान देतो. परंतु जाहीरपणें त्यांची टर उडवून त्यांची छीः थूः करून टाकतो.

मोलोटोव्ह, मॅलेन्कॉव्ह आणि शेपिलॉव्ह यांच्यासारख्या जागतिक कीर्तीच्या पुढाऱ्यांची कुश्चेव्हनें काय दशा करून टाकली ? रोमन सम्राट् ज्याप्रमाणें राजवाड्यांत जरा कोणी वरचढ होतो आहे असें वाटलें तर त्याला दूरच्या एखाद्या किरकोळ कामगिरीवर पाठवून देत त्याचप्रमाणें कुश्चेव्हनें आपल्या वरील सहकाऱ्यांना अगदीं क्षुल्लक अशा जागीं नेमून त्यांचा उपमर्द चालविला आहे.

'प्रवदा'चा संपादक म्हणून अत्यंत लोकप्रिय असलेल्या शेपिलोव्हबद्दल-केवळ कुश्चेव्हची भाटगिरी करण्यासाठीं– आपली लेखणी उचलतांना 'प्रवदां'तील त्याच्या पूर्वीच्या सहकाऱ्यांना काय वाटलें असेल ? त्यांच्या मनांत भावनांचें केवढें उधान उसळून आलें असेल !

अनेक रशियन लेखकांशीं माझा दाट परिचय आहे. त्यांपैकीं कांहींना मी प्रत्यक्ष भेटलों आहें. कांहीं जणांशीं पत्रव्यवहारानें परिचय वाढला आहे. त्यांना क्रुश्चेव्ह धोकेबाज कां म्हणतो तें मला बरोबर माहीत आहे. परंतु क्रुश्चेव्हला त्यांचें अचूक मूल्यमापन करतां आलेलें नाहीं. कारण, त्याला जनतेची नाडीच बरोबर समजलेली नाहीं. आणि तें बरोबरच आहे. कारण मारेकरी जनतेच्या आशा आकांक्षांची कशाला फिकीर करील ? आपण ज्याला मारणार तो आपल्यावर उलटणार तर नाहीं ना, एवढी भीतीची भावनाच काय ती त्याच्या मनांत वसत असते. आणि म्हणून तो लेखकांना धोकेबाज म्हणतो. परंतु त्याला वाटतें त्यापेक्षांहि त्यांची भयानकता किती तरी अधिक आहे.

साहित्यिकाचा जन्म कसा होतो ? त्याचें अंगीकृत कार्य काय ? डांस ज्याप्रमाणें दुसऱ्याला उपद्रव देण्यासाठींच जन्माला येतो त्याप्रमाणें लेखक हा कांहीं इतरांना सदैव अडचणींत टाकण्याचेंच काम करीत नसतो. त्याचबरोबर तो वाचकांची करमणूक करणारा पगारी नोकरहि नव्हे. सामाजिक विकासाची जी एक विचित्र आणि गुंतागुंतीची प्रक्रिया सदैव सुरू असते तिचा तो एक अपरिहार्य घटक असतो. आणि टीकाकार, उपदेशक व समाजसुधारक या नात्यानें तो समाजाच्या सांस्कृतिक विकासांत फार मोलाची भर टाकीत असतो.

क्रुश्चेव्हनें आपल्या भाषणांमधून रशियन लेखकांना उपदेशाचे जे डोस पाजले आहेत त्यामुळें एकंदर विचारपद्धतीच सदोष आणि विकृत बनण्याचा धोका आहे, आणि कम्युनिस्ट आंदोलनांत लेखकाला नेमक्या या विकृत विचारसरणीचाच पदोपदीं अनुभव येतो. मी कम्युनिस्ट पार्टीबाहेर पडण्याचा निर्णय घेतल्यापासून मला जें अनुभवायला मिळालें त्याची वानगी वाचकांना या पुस्तकाच्या पानापानांमधून मिळालेलीच आहे. या अनुभवाच्या आधारावरच मीं सोव्हिएट यूनियनमधील माझ्या कांहीं लेखकमित्रांना पत्र पाठवून पक्ष सोडण्याचा माझा मनोदय कळविला. त्यांच्याशीं माझे फार जिव्हाळ्याचे संबंध होते. आणि माझ्या भावना ते समजूं शकतील. पक्षाच्या चाकोरीबाहेरहि त्यांच्यांतील सौहार्द टिकून राहूं शकेल अशी माझी समजूत होती. बॉरिश पोलोव्होयनें क्रिक्टोच्या बाबतींत माझा जबरदस्त अपेक्षाभंग केला होता. तरी देखील माझ्याशीं तो सहमत झाला नाहीं. तरी माझ्या मनांत

चाललेली कालवाकालव त्याला कळूं शकेल, मानवी मूल्यांची तेवढी तरी बूज तो ठेवील असें मी मानीत होतों.

सोव्हिएट यूनियनमधील लेखकांच्या संघटणेचा प्रमुख म्हणून माझ्या त्याच्याकडून कांहीं अपेक्षा होत्या. राजकीय आणि नैतिक क्षेत्रांत कांहीं चांगले पायंडे घालून देण्याची जबाबदारी त्याची नव्हती का ? मी कांहीं केवळ त्याचा एक मित्र आणि लेखक म्हणून त्याला पत्र पाठविणार नव्हतों. तर एके काळचा कम्युनिस्ट म्हणून मी त्याच्याजवळ माझें मन उघडें करणार होतों. पोलोव्होयप्रमाणेंच मीं बॉरिश इझेकोव्हलाहि पत्र पाठविलें. त्या वेळीं तो सोव्हिएट यूनियनमधील लेखक संघाच्या परराष्ट्रीय समितीचा प्रमुख होता. "भीतीमुळें तो माझ्या पत्राचें उत्तर देण्याचें टाळणार नाहीं" अशा आशयाचा मजकूर त्याच्या पत्रांत लिहून एकपरीनें मी त्याला डिंवचलेंच होतें आणि बॉरिश पोलोव्होयनें मला लिहिलेल्या उत्तरांत नेमका त्याबद्दलच मला टोला हाणला आहे. पोलोव्होयचें पत्र मी जसेंच्या तसें खालीं उद्धृत करीत आहें. त्यावरून मीं या पुस्तकांत जे प्रश्न हाताळण्याचा प्रयत्न केला आहे, त्याची यथार्थ कल्पना वाचकांना येऊं शकेल. माझें पत्र मिळाल्यानंतर सात आठवड्यांनीं त्यानें मला उत्तर धाडलें.

प्रिय हॉवर्ड,

मी तुला पत्र लिहायला बसलों आहें आणि सुरुवातीलाच तुला सांगून टाकतों कीं, आपल्या दोघांचाहि मित्र असलेल्या इझेकोव्हबद्दल तूं जी शंका प्रदर्शित केली होतीस तसल्या भीतीचा लवलेशहि माझ्या मनांत नाहीं. खरंच तूं त्याला असें दुखवायला नको होतेंस. तूं कलावंत आहेस आणि कलावंत म्हणून तरी आपल्या मित्रांना असल्या बोचऱ्या भाषेंत लिहूं नये हें समजण्याइतकी सहृदयता तूं दाखवायला हवी होतीस.

तूं आपल्या पत्रांत जे मुद्दे उपस्थित केले आहेस ते वाचून मला परमावधीचें दुःख झालें, हें मला कबूल केलें पाहिजे. आपली प्रत्यक्ष अशी भेट एकदांच झाली. परंतु, आपण एकमेकांना खूप पत्रें लिहिलीं. तुझ्या पत्रांची मी नेहमींच मोठ्या उत्सुकतेनें वाट पाहात असें. तुझ्या पत्रावरून आणि तूं लिहिलेल्या पुस्तकावरून तूं म्हणजे प्रवाहाच्या विरुद्ध जाण्याचें

धाडस करणारा आणि उच्च ध्येयासाठीं अपार त्याग करणारा माणूस आहेस अशी माझी खात्री होऊन चुकली होती. आणि आमच्या वाङ्मयीन चर्चा होत त्या वेळीं देखील धैर्य आणि निष्ठा यांचा तूं आदर्श घालून दिला आहेस असें मी सांगत असें.

त्यामुळें तुझ्याविषयीं नुकतीच प्रसृत झालेली बातमी ज्या वेळीं समजली त्या वेळीं मला धक्काच बसला. तूं स्वतः मला तें कळवलें असतेंस किंवा गेलीं कित्येक वर्षें तुम्ही मोठ्या धैर्यानें जें छोटेंसें नियतकालिक चालवीत आहांत त्यांत मला ती वाचायला मिळाली असती तर मला त्याचें इतकें वाईट वाटलें नसतें, परंतु एका बड्या भांडवलदारी वृत्तपत्रांतून आणि तेंहि पुन्हा ज्याच्याबद्दल पत्रकार म्हणून मला काडीचाहि आदर नाहीं अशा एका माणसाला तूं दिलेल्या मुलाखतीवरून ती बातमी मला समजावी याचें विशेष वैशम्य वाटलें.

मी एक जुना सैनिक आहें आणि माझें मनहि अगदीं घट्ट आहे. परंतु तरीहि त्या रात्रीं मला झोंप लागली नाहीं. सारखे तुझ्या पुस्तकासंबंधींचेच विचार येत होते. त्यांतील निरनिराळीं पात्रें जिवंत होऊन माझ्या डोळ्यांपुढें उभीं राहात होतीं. माझी खात्री आहे कीं, शेवटपर्यंत धैर्यानें लढत राहिलेला गिडियन जॅकसन् हा देखील माझ्याप्रमाणेंच तुझा निर्णय त्याला समजला असता तर आश्चर्यानें दिङ्मूढ होऊन गेला असता. तसाच तूं निर्माण केलेला स्पार्टेकस त्याचा काळ निराळा होता. आजच्यासारखी तात्त्विक सिद्धान्ताची शिदोरी किंवा प्रत्यक्ष अनुभवाचें ज्ञान त्या वेळीं त्यांच्या गांठीं असणें शक्य नव्हतें. आजच्या सांस्कृतिक मूल्यांची त्या वेळीं जगाला ओळखहि नव्हती. किंवा शांततेचें निशाण फडकत ठेवण्यासाठीं आज बुद्धिवादी तरुण जी शर्थ करीत आहेत त्याची कल्पना त्या काळांत येणें शक्य नव्हतें. अर्थात् तुझ्या स्पार्टेकसला तूं माझ्यापेक्षां जास्त ओळखत असशील हें मी कबूल करतों; पण तरीहि मला असें वाटतें कीं, त्या रात्रीं खरोखरीच स्पार्टेकस जर माझ्याजवळ असता तर तोहि माझ्याइतकाच चकित होऊन गेला असता. किंवा तुझ्या कादंबरींतील जॉर्ज वॉशिंग्टन– लहानपणींहि मीं त्याची गोष्ट वाचली होती; पण तुझें पुस्तक वाचल्यानंतर त्याच्या व्यक्तित्वाचे नवे पैलू माझ्या प्रत्ययाला आले. तो

देखील प्राप्त परिस्थितींत असेंच म्हणाला असता कीं, " काय वाटेल तें झालें, कितीहि निकटचा लढा द्यावा लागला तरी उद्यांचें यश पदरांत पाडून घेण्यासाठीं आज मला खंबीरपणें पाय रोवून उभें राहिलेंच पाहिजे ! " सिलास टिंबरमनचें पात्र तूं ज्या तऱ्हेनें रेखाटलें आहेस तें पाहिलें तर तुझ्यासारखाच अत्यंत बिकट परिस्थितींत तो सांपडला असता तरीदेखील तूं जो निर्णय घेतलास त्याच्याशीं तो सहमत होऊं शकला नसता. तेंच तर्काला धरून आहे.

असें म्हणतात कीं, लेखक आपल्यांतील अंशभाग आपल्या नाटकांत उतरवीत असतो. आणि म्हणूनच लक्षावधि वाचकांना त्यांच्या अंगच्या धैर्य, चिकाटी वगैरे गुणांमुळें आवडूं लागलेल्या तुझ्या नायकांनीं जर रशियनांसाठीं चालविल्या जाणाऱ्या रेडिओवरून तुझ्या नांवाचा उपयोग करून सांगितलेली ती बातमी ऐकली असती तर तेदेखील माझ्याप्रमाणेंच अस्वस्थ होऊन गेले असते. त्या रेडिओचा अंतस्थ हेतूदेखील माझ्या दृष्टीनें अगदीं स्पष्ट आहे. ९० कोटी वाचकांत तूं आणि तुझीं पुस्तकें जीं एवढीं लोकप्रिय झालीं आहेत तीं बदनाम करावींत हा त्यांचा डाव आहे. परंतु, त्या रेडिओंना किती महत्त्व द्यावयाचें तें तुझ्या मित्रांना पुरतें ठाऊक आहे. तूं जो निर्णय घेतला आहेस त्याबद्दल आम्हांला कांहींच म्हणावयाचें नाहीं. कारण तो तुझा खाजगी प्रश्न आहे. पण तरीदेखील तूं अगदीं परवांपरवांपर्यंत आपल्या पुस्तकांतून, भाषणांतून आणि पत्रांतून ज्याचा ज्याचा म्हणून उद्‌घोष करीत आलास त्या सर्वांचाच त्या रेडिओनें जो धिक्कार चालविला आहे त्यांत तूं कधींहि सहभागी होणार नाहींस अशी आमची अजूनहि समजूत आहे.

फ्रान्समधील लेखकांच्या राष्ट्रीय समितीचा अध्यक्ष व्हरकॉर्स तुला आठवतो का ? त्याचीं अनेक पुस्तकें तूं वाचलीं असशील. फ्रान्समधील प्रतिकाराच्या मोहिमेंत त्यानें फार हिरीरीनें भाग घेतला होता. तो एक श्रेष्ठ कलावंत आहे. पण त्याचीं राजकीय मतें कम्युनिझमशीं अजिबात मिळतीं जुळतीं नाहींत. तो मध्यंतरीं येथें आला होता. त्या वेळीं मुद्दाम माझ्या घरीं आला होता. आम्हीं मध्यरात्र उलटून जाईपर्यंत त्या दिवशीं गप्पा मारीत बसलों होतों. गप्पांबरोबरच आम्ही कॉफीहि ढोसत होतों. ज्युलिया बराच वेळ आमच्याबरोबर बसली होती. पण शेवटीं कंटाळून ती झोपायला

क्रमांक ...११९६........ नों दि: १०-

निघून गेली. त्या दिवशीं किती तरी विषयांवर आम्ही बोलत होतों. सर्वच बाबतींत आमचें मतैक्य झालें असें नाहीं. पण तरीहि आमच्या मैत्रींत कसलाच बाध आला नाहीं. कारण आम्हां दोघांनाहि एक उद्दिष्ट समान होतें आणि तें म्हणजे पौर्वात्य आणि पाश्चिमात्य लेखकांत जिव्हाळ्याचे संबंध निर्माण करणें आणि तें साध्य करायचें असेल तर एकमेकांना घालून पाडून बोलतां कामा नये, किंवा एकमेकांची निंदा-नालस्ती करूनहि चालणार नाहीं. कारण त्यामुळें परस्परसंबंध दुरावण्याखेरीज आणि इतरांना आपली टर उडवायला आयती संधि मिळण्याखेरीज दुसरें काय साधणार आहे ? त्यापेक्षां परस्परांनीं शांतपणें एकमेकांचीं मतें समजून घेण्याचा आणि विचारांची देवाण-घेवाण करण्याचा प्रयत्न करायला नको का ? आणि शांततेच्या मुद्द्यावर तरी सर्वांचें एकमत होणें शक्य आहे ना ? शांतता कोणाला नको आहे ? पौर्वात्य आणि पाश्चिमात्य अशा कोठल्याहि देशांतील जनतेला शांततेची असूशी लागली आहे. आणि अगदीं मवाळा-पासून तों ज्वलज्जहालापर्यंत आणि व्हरकॉर्ससारख्या कॅथॉलिकापासून तों माझ्यासारख्या निरीश्वरवाद्यापर्यंत सर्वांचेंच या एका मुद्द्यावर एकमत व्हायला हरकत असूं नये.

हॉवर्ड, मी तुला हें मुद्दाम अशाकरितां सांगत आहें कीं, माझ्या लेखक-मित्रांपैकीं अनेकजण कम्युनिस्टांत मोडत नाहींत. इतकेंच नव्हे तर मी ज्यांना प्रतिगामी समजतों अशा कांहीं पक्षांतील लेखकांशींदेखील माझी दाट मैत्री आहे. जीवनाकडे बघण्याचा आमचा दृष्टिकोण किंवा भवितव्या-संबंधींच्या आमच्या कल्पना भिन्न भिन्न असल्या तरी एकमेकांना भेटण्यांत किंवा एकमेकांशीं पत्रव्यवहार करण्यांत त्यामुळें कधीं प्रत्यवाय आला नाहीं. आणि त्यांच्यापैकीं कोणींहि कधीं शीतयुद्धाला निष्कारण चालना मिळेल असें कांहीं लिहिलें नाहीं.

मला काय म्हणावयाचें आहे तें तुझ्या ध्यानांत येईल. आणि या बाबतींत तरी निदान तूं माझ्याशीं सहमत होशील अशी मी आशा करतों. मी तिकडे असतांना आपली भेट झाली त्या वेळीं तुझ्या देशबांधवांविषयीं तूं किती प्रेमानें आणि अभिमानानें बोलत होतास. आणि त्यांना पवित्र वाटणाऱ्या गोष्टींची बेछूटपणें टवाळी करण्याच्या किंवा तुमच्या ध्वजाची

आणि तुमच्या राष्ट्राभिमानाची टर उडविणारांवर किती रागावत होतास त्याची मला पुरती आठवण आहे. तुझ्या त्या भावनांशीं मीहि संपूर्णपणें सहमत होतों आणि 'अमेरिकन डायरीज' या माझ्या पुस्तकांतहि मीं त्याचा उल्लेख केलेला आहे. माझ्या हातून तुझे देशबांधव दुखावले जाऊं नयेत म्हणून मी किती खबरदारी घेत असें, तें हवें तर तूं पाहूं शकतोस. मीं तुला त्या पुस्तकाची एक प्रत पाठविली होती हें तुला स्मरत असेलच. मीं तुझ्या भावनांची इतकी कदर केल्यानंतर तरी तूं माझ्याशीं तसेंच वर्तन करावयास हवें होतेंस अशी अपेक्षा केली तर हॉवर्ड, ती माझी चूक ठरेल का ?

तुझ्या पुस्तकांविषयीं बोलावयाचें तर मीं वर उल्लेखिलेल्या रेडिओंनीं कितीहि घसा कोरडा केला तरी त्यांची लोकप्रियता जराहि कमी झालेली नाहीं. तिकडचीं मासिकें आणि प्रकाशक पूर्वींप्रमाणेंच त्यांचें स्वागत करीत आहेत आणि लहानथोरांच्या हातांत तीं पडावींत म्हणून त्यांची धडपड सुरूच आहे. विशेषतः मीं तुला फेब्रुवारी महिन्यांत पाठविलेल्या पत्रांत लिहिल्याप्रमाणें एव्हांना तुला तें मिळालें असेल असें धरून चालतों. तुझ्या 'लोला ग्रेग' चा रशियन अनुवाद प्रसिद्ध झाला असून त्याच्यावर वाचकांच्या उड्या पडत आहेत.

तेव्हां प्रिय हॉवर्ड, एकंदर परिस्थिति ही अशी आहे. मी तुझ्या पत्राची पूर्वींच्याच आतुरतेनें वाट पाहात राहीन. कारण, माझी खात्री आहे कीं, आपणा दोघांनाहि–होय—होय आपणां दोघांनाहि ! माझ्या मनांत तरी निदान लवमात्रहि शंका नाहीं— शांतता आणि प्रगति यांच्या सिद्धीसाठीं एकत्र येऊन खूप काम करावयाचें आहे आणि आपण दोघे मिळून तें करूं शकूं असा मला भरंवसा आहे.

आपण दोघेहि कुटुंबवत्सल आहोंत. तुला दोन मुलें आहेत. मला तीन. निदान त्यांच्यासाठीं म्हणून तरी आपण एकत्र येऊन शांतता-प्रस्थापनेचें कार्य करावयास नको का ? आपण पुन्हा एके ठिकाणीं जमून व्हिस्कीची नाहीं तर व्होडकाची लज्जत घेत रात्रभर गप्पा छाटीत बसूं शकलों तर अशी मजा येईल म्हणतोस ! मला माहीत आहे, आपल्या गप्पांना कंटाळून

दोघांच्याहि बायका जांभया द्यायला लागतील—पण आपण तिकडे लक्षच द्यावयाचें नाहीं हं ! पण आतां मला अमेरिकेंत प्रवेश मिळणार नाहीं आणि तुला अमेरिकेबाहेर पाऊल टाकूं दिलें जाणार नाहीं.

मी कांहीं तरीच भरकटत सुटलों नाहीं ? आतां पत्र थांबविलेंच पाहिजे. नाहीं तर तें विमानानें जाऊं शकणार नाहीं. बेटीला माझे आणि माझी पत्नी ज्युलिया हिचे नमस्कार सांग. त्या दोघी कधीं एकमेकींना प्रत्यक्ष भेटल्या नसल्या तरी आपल्यामुळें त्यांच्यांत जे संबंध निर्माण झाले आहेत ते दुरावण्याचें तरी कांहींच कारण नाहीं. म्हणतात ना ! बायका या नवऱ्यापेक्षां फार चाणाक्ष असतात म्हणून !

तुझा विश्वासू,

१८ मार्च १९५७ बॉरिश पोलोव्होय

ता. क.—मी या पत्राबरोबरच तुला तार करीत आहें. कारण, हल्लीं टपालखातें फार अव्यवस्थित बनलेलें दिसतें. मी गेल्या फेब्रुवारीच्या मध्यास लिहिलेलें पत्र तुला अद्याप मिळालेलें दिसत नाहीं तें यामुळेंच.

पोलोव्होयला लिहिलेल्या पत्रांत मीं कांहीं मूलभूत प्रश्न उपस्थित केले होते. ते सर्व त्यानें अशा रीतीनें उडवून दिले. ज्या दिवशीं मला त्याचें पत्र मिळालें त्या दिवशींच लगेच मीं त्याला खालील उत्तर पाठविलें :

प्रिय बॉरिश,

तुझें पत्र पाहून फार आनंद झाला. मला तें आजच मिळालें. आणि हातांत पडल्याबरोबर मीं तें अधीरतेनें वाचून काढलें. त्या पत्रामुळें पुन्हा तुझें संभाषणच जणू ऐकायला मिळतें आहे असा क्षणभर भास झाला. आणि तुझ्या भावनांचा जिव्हाळा जाणवला. तुला आणि इझ्कोव्हला मी—आणि बेटीदेखील—परम मित्र समजतों. त्यांत कधीं अंतर पडतां कामा नये.

पण तुझ्या पत्रांत मी उपस्थित केलेल्या कांहीं मुद्द्यांची तरी तूं दखल घ्यायची होतीस ! मीं घेतलेल्या निर्णयाचें अमेरिकेंतील रेडिओवरून भांडवल केलें जातें ही कांहीं मोठीशीं महत्त्वाची गोष्ट नाहीं. क्रुश्चेव्हच्या ‘ गुप्त भाषणा ’चा तर त्यांनीं याहूनहि गाजावाजा केला होता. अमेरिकन रेडिओ फायदा घेईल म्हणून कोणतीच टीका करावयाची नाहीं असें म्हणून कसें चालेल ?

मीं जे प्रश्न उपस्थित केले होते त्यांना माझ्या दृष्टीनें अपार महत्त्व होतें. माझ्या जीवनमरणाचाच तो प्रश्न होता म्हणेनास ! तुझ्याजवळ त्याला कांहींच उत्तर नाहीं का ? आम्ही इतक्या अजीजीनें कांहीं गोष्टींचा खुलासा तुमच्याकडून मागतों आणि दर वेळीं तुम्ही आमचा नुसता उपहासच करतां. तुम्ही आम्हांला काय दुधखुळीं पोरं का समजतां ? तुझ्या सरकारनें ज्यू लेखकांची कत्तल कां केली ? बुल्गानिन आपल्या परराष्ट्रीय धोरणांत ज्यूविरोधी भावनांचा उपयोग कां करून घेतो ? तुमच्या देशांत विश्व-ऐक्याच्या नांवाखालीं ज्यूविद्वेषाची घृणास्पद विचारसरणी कशी फोंफावूं शकते याचें स्पष्टीकरण केलेंत तर त्यामुळें आतां आणखी नुकसान तें काय होणार आहे ?

स्टॅलिनच्या राजवटींत जे रक्ताचे पाट वाहिले त्याला केवळ 'विभूति-पूजा' म्हणण्यापलीकडे तुमच्याजवळ दुसरें कांहीं समाधानकारक उत्तर आहे का ? असें सांगितलें जातें कीं, बेरियानें स्टॅलिनच्या अघोरी कृत्यांना पायबंद घालण्याचा प्रयत्न केला, पण कुश्चेव्ह आणि कंपनीनें त्याचाच खून पाडला ! कां तर त्यांनीं केलेले गुन्हे बेरियाला माहीत होते. हें खोटें असेल तर तुम्ही त्याचा इन्कार कां करीत नाहीं ? या कंड्या बंद पडतील असा पुरावा पुढें कां आणीत नाहीं ? बेरियाच्या खटल्याचा अधिकृत वृत्तान्त प्रसिद्ध करण्याची तुमची छाती आहे काय ?

'नॉट बाय ब्रेड अलोन' या पुस्तकाच्या बाजूनें तूं, इझ्रेकोव्ह आणि इतर लेखक चकार शब्दहि कां उच्चारीत नाहीं ? कदाचित् तें पुस्तक अगदीं टाकाऊहि असेल, पण म्हणून त्याच्या लेखकाला संरक्षणाची हमी मिळूं नये असें थोडेंच आहे ? इट्झिक फेफरला मृत्यु कसा आला तें तुमच्यापैकीं कोणीहि कां सांगत नाहीं ? कांहीं पोलिश मित्रांनीं आम्हांला असें सांगितलें कीं, पोलंडमधील अंतर्गत संघर्ष दडपून टाकण्यासाठीं कुश्चेव्हनें देखील ज्यूविरोधी भावना चेतवण्याचा प्रयत्न केला. या गोष्टीचा तरी कोणी इन्कार कसा करीत नाहीं ? आम्ही इतके दिवस 'टीका', 'आत्मटीके'चा घोष खूप ऐकत होतों, पण आतांच ती कोठें गेली ?

अमेरिकन पक्षांत भांडणें आहेत हें लपविण्याचा आणि फॉस्टर व त्याच्या गटांतील सभासदांनाच उचलून धरण्याचा आटापिटा 'प्रवदा'नें काय

म्हणून करावा ? फॉस्टरच्या गटांतील माणसें कांहीं मोठींशीं चांगलीं आहेत असें नाहीं. आमच्या देशांतील प्रत्यक्ष परिस्थितीपासून तर जणूं त्यांनीं स्वतःची फारकतच करून घेतली आहे. पक्षांतील उत्तमोत्तम आणि अत्यंत निधड्या छातीच्या सभासदांचा त्या गटाला तीव्र विरोध आहे.

आणि बॉरिश, तुझ्या पत्रांतील मजकूर तरी काय आहे ? टपालखातें अव्यवस्थित बनत चाललें आहे अशी नुसती बतावणी कशाला करतोस ? गेल्या सबंध वर्षांत असा एकहि दिवस गेला नसेल कीं, मला रशियांतून दररोज निदान एक-दोन तरी पत्रें आलीं नाहींत. माझ्या पत्र-लेखकांत समाजांतील सर्व थरांतील लोक होते. त्यांत जसे शाळकरी विद्यार्थी होते तसे कामगारहि होते. लेखक होते, संपादक होते, रंगभूमीवर काम करणारे कलावंत होते आणि तुझ्यासारखे सहकारी तर होतेच होते. असें असतांना मीं कम्युनिस्ट पार्टी सोडल्याची बातमी 'न्यू यॉर्क टाइम्स'मध्यें प्रसिद्ध झाल्यापासून बरोबर तीन दिवसांनीं रशियाहून मला येणारीं सर्व पत्रें एकाएकीं बंद झालीं हें कसें ?

माझ्याप्रमाणेंच तुलाहि हें माहीत आहे कीं, माझ्या निर्णयाचा रशियांत कोठेंहि परिस्फोट होऊं देण्यांत आला नाहीं. आणि तरीहि रशियांतून एकहि पत्र मला येईनासें झालें. मला येणारीं सगळीं पत्रें पोस्ट-ऑफिसांतच अडविलीं जातात हें अगदीं उघड आहे. आणि तुझ्या पहिल्या पत्राची तीच गत झाली असणार ! यालाच का स्वातंत्र्य म्हणायचें ? अमेरिकेविषयीं तूं कांहींहि म्हण, पण गेलीं कित्येक वर्षें रशियांतील मित्रांना मी जशीं पत्रें पाठवीत आहें तशींच त्यांचींहि पत्रें मला येत आहेत. आणि माझीं मतें कांहींहि असलीं किंवा माझ्या भाषणांतून अगर पुस्तकांतून मी कांहींहि प्रतिपादीत असलों तरी माझ्या पत्रव्यवहारावर कसलींहि बंधनें पडलेलीं नाहींत हें असें कां होतें ?

कम्युनिस्ट पार्टीशीं मतभेद झाले तर ते प्रामाणिकपणें बोलून दाखवून उघडपणें कम्युनिस्ट पार्टीचा त्याग कां करतां येऊं नये ? तसेंच सोव्हिएट पुढाऱ्यांवर उघडपणें टीका करणाऱ्यालाहि माणूस म्हणून जगतां कां येऊं नये ? तूं स्वतःच तुझ्या पत्रांत लिहिलें आहेस कीं, मी कसाहि वागलों

असलों तरी तूं मला अद्यापहि आपला मित्र समजतोस! — पण मीं कांहीं तरी लाजिरवाणें आणि घृणास्पद असें कृत्य केलें आहे असें तूं कां समजतोस?

स्वतःच्या अंतःप्रेरणेनुसार वागण्यांत घृणास्पद काय आहे? आज लक्षावधि लोक जगांत असे आहेत कीं, ज्यांच्या मनांत माझ्यासारख्याच शंका आहेत. मीं ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याच त्यांच्याहि मनांत वसत आहेत. त्या सर्वांना तूं असाच का वळवून घेणार? तूं व्हरकॉर्सचा उल्लेख केला आहेस. मलाहि त्याच्याबद्दल आदर आहे. पण तो कांहीं कम्युनिस्ट नव्हता. सोव्हिएट यूनियनला त्यानें आपली निष्ठा वाहिलेली नव्हती. किंवा त्यासाठीं आपल्या प्राणांची आणि प्रतिष्ठेची कुर्वंडी करावयाची त्यानें कधींहि तयारी दाखविली नव्हती. पण मी तशी तयारी दाखविली होती. आणि तोच तर आमच्या दोघांतील फरक आहे. हें तुलादेखील पटेल.

तूं केवळ माझ्यापुरताच विचार करणार असशील तर तुला किंवा तुझ्या सहकाऱ्यांना कसलाहि बोध होणार नाहीं. क्रुश्चेव्हचा अहवाल प्रसिद्ध झाल्यापासून पक्षाच्या बाहेर पडणारा मीच कांहीं एकटा बुद्धिवादी नाहीं. माझ्यापूर्वींहि अनेक जणांनीं पक्षाचा त्याग केलेला आहे आणि त्यांच्या-बरोबर शेंकडों कामगारांनीं आणि इतर सभासदांनींहि पक्षाला रामराम ठोकला आहे.

बॉरिश, गेल्या उन्हाळ्यांत मॉस्को रेडिओवरून मला एक केबल आली होती. अणू बॉम्बच्या चांचणीसंबंधींचीं माझीं मतें त्यांनीं विचारलीं होतीं. मीं त्यांना कळविलें होतें कीं, सर्वच राष्ट्रांतून अशा प्रकारचे चांचणी प्रयोग बंद झाले पाहिजेत. परंतु सोव्हिएट यूनियन हें मानवजातीच्या कल्याणासाठीं बद्धपरिकर झालेलें समाजवादी राष्ट्र असल्यामुळें त्यांनीं या कामीं पुढाका र घेतला पाहिजे. इतर राष्ट्रें करोत न करोत, सोव्हिएट रशियानें ताबडतोब चांचणी स्फोट बंद केले पाहिजेत. कदाचित् माझी ही विचारसरणी चुकीचीहि असेल; पण तीं माझीं प्रामाणिक मतें होतीं. मॉस्को रेडिओनें तीं दाबून ठेविलीं. आणि त्याबद्दल मला एका अक्षरानेंहि कळविलें नाहीं. तुम्हांला अप्रिय असलेलीं मतें खुशाल कायमचीं दडपून ठेवतां येतील ही कल्पना अगदीं पोरकटपणाची आहे, असें नाहीं तुला वाटत! गेनी डेनिसचें

सगळें भाषण ' प्रवदा 'नें छापलें होतें. पण त्यांतला ज्यू संस्कृति नष्ट केल्या-संबंधींचा भाग मात्र वगळण्यांत आला होता. हा खुळचटपणासुद्धां याच नमुन्याचा नाहीं का ? तुम्ही जाणूनबुजून इतकें भयंकर असत्य कसें बोलूं शकतां ?

आणि बॉरिश, तूं न्यू यॉर्कला आला होतास त्या वेळीं यिडिश लेखक क्फिटोची जिवंत आहे आणि तो अगदीं तुझ्याचघरांत शेजारच्या बिऱ्हाडीं राहातो असें तूं आम्हांला कां सांगितलेंस ? तूं हें सांगत होतास त्याच्या कित्येक दिवस आधीं तो गेला होता– त्याला मारण्यांत आलें होतें– हें तुला माहीत होतें ना ? त्याचा मृत्यु दडवून ठेवण्याचा खोटेपणा तुला कां करावा लागला ? मला क्फिटोची कांहीं माहिती नाहीं किंवा मी त्या प्रश्नाची चर्चा करूं इच्छीत नाहीं असें कांहीं तरी सांगून तूं तो प्रश्न टाळूं शकला नसतास का ? मग तूं इतकें धादांत असत्य कां ठोकून दिलेंस ?

' मेनस्ट्रीम ' मध्यें प्रसिद्ध झालेलें माझें निवेदन एव्हांना तुला मिळालें असेल. तें प्रसिद्ध कर. माझें हें पत्रहि प्रसिद्ध होऊं दे. मीं उपस्थित केलेल्या मुद्द्यांना समर्पक उत्तरें तूं दिलींस तर मला हवींच आहेत. कम्युनिस्ट राजवटींत आतां भीतीला लवलेशहि राहिलेला नाहीं. ज्यूविरोधाला मूठमाती मिळालेली आहे, असें मला कोणीं सांगितलें तर मला निरतिशय आनंद होईल. तें ऐकायला माझे कान आसुसले आहेत. सोव्हिएट देशांतून आतां देहान्ताची सजा दिली जात नाहीं. समाजवादाचें एक प्राचीन रम्य स्वप्न साकार झालें आहे, असें तुझ्या तोंडून मला ऐकूं दे. सत्य तेवढेंच मला तुझ्याकडून ऐकायला हवें आहे. कम्युनिस्ट पद्धतींतील जबरदस्त दहशतीचा सुगावा मला यापूर्वीं लागला नाहीं. हा कदाचित् माझा मूर्खपणा असेल; पण मला त्याची जाणीव नव्हती एवढें खरें. एखाद्या मूर्तिपूजका-सारखे मीं कम्युनिस्ट पार्टीच्या भजनीं लागावें असें तुला म्हणावयाचें आहे का ? मी तुला खरेंच सांगतों कीं, त्यापेक्षां उच्च मूल्यांसाठीं माझी धडपड चालली आहे. सत्य आणि स्वातंत्र्य यांचा मी पुजारी आहें. कोणत्याहि एखाद्या पंथाचा नाहीं. आणि एकानें जुलूम केला म्हणून दुसऱ्यानें करावा असें तूं कसें म्हणतोस ? एकानें गाय मारली म्हणून का दुसऱ्यानें वासरूं मारायचें ?

११८६ नों: दि: १५-१-८८

मला सत्याची जी प्रचीति आली तिचें इतरांना दर्शन घडविण्यासाठीं मीं माझ्या घरादारावर तुळशीपत्र ठेवलें. त्यासाठीं मीं माझ्या प्राणांची देखील बाजी लावली. तुझी तशी तयारी आहे का? असेल तर हा पत्र-व्यवहार 'लिटररी गॅझेट'मध्यें प्रसिद्ध करण्याचें धाडस कर. बंद झालेले दरवाजे पुन्हां उघडूं देत. शब्दांचीं रूपें घेऊन विचारांची स्वैर देवाण-घेवाण होऊं दे. तसें झालें तरच जगाला झालेली जखम भरून येऊं शकेल. आपल्या मनांतले विचार स्पष्टपणें आणि प्रामाणिकपणें व्यक्त करण्याबद्दल यापुढें कोणालाहि त्रास सहन करावा लागतां कामा नये.

आणि हें बघ, अजूनहि मला तुझी मैत्री हवी आहे. तूं ती देणार का? आतां तें तुझ्यावरच अवलंबून आहे.

—हॉवर्ड फास्ट

यावरून साहित्यिक आणि कम्युनिस्ट पार्टी यांची यथातथ्य कल्पना आतां कोणालाहि येऊं शकेल असें मानायला हरकत नाहीं.

मीं मैत्रीचा हात पुढें केला होता. पण पोलोव्हाय मला मित्र मानायला तयार नाहीं असें दिसतें. कारण मी पत्र पाठवल्याला आतां इतके दिवस झाले, पण त्याच्याकडून बोटभर चिठ्ठी देखील आलेली नाहीं. मीं का त्याची बदनामी केली? हा क्रिक्टो मारला गेलेला असतांना त्यानें तो जिवंत आहे म्हणून सांगितलें असा आक्षेप मीं जरूर घेतला आहे. पण त्याला अनेक साक्षीदार आहेत आणि ते सगळे कम्युनिस्ट आहेत. पोलोव्हाय तो जिवंत आहे म्हणून सांगत होता त्या वेळीं क्रिक्टो खरा जिवंत नव्हता असें सांगितलें तर ती बदनामी झाली का? मग हीं माणसें अशीं कां वागतात? त्याला तशींच कांहीं सबळ कारणें असतील तर तीं तरी त्यांनीं उघडपणें सांगून टाकावींत.

कम्युनिस्ट पार्टींत असतांना मीं जीं मोठ्या आणीबाणीचीं वर्षे घालविलीं त्या वेळीं देखील बुद्धिवादावरील माझी निष्ठा मी मलिन होऊं दिली नाहीं. सत्य घटनांचा मी नेहमीं शोध घेत असें. सोव्हिएट यूनियनच्या हितशत्रूंनीं कांहीं घटना उजेडांत आणल्या तर त्यांचा मला मोठा तिटकारा येई. त्या खऱ्या मानतांना एखादी कडू गोळी गिळल्याप्रमाणें होई. परंतु त्याच घटना

आतां कम्युनिस्ट पक्षातर्फे प्रसिद्ध करण्यांत आल्यावर त्यावर विश्वास न ठेवून कसें चालेल? त्यामुळेंच माझी आणि माझ्या सहकाऱ्यांची अवस्था काय झाली आहे तें समजून घेण्याची, आणि जे कम्युनिस्ट नाहींत त्यांना त्याचा पुनः प्रत्यय आणून देण्याची गरज भासली आणि त्यांतूनच या पुस्तकाचा जन्म झाला.

पोलोव्होय स्वतःला कदाचित् स्वतंत्र समजत असेल; पण या स्वातंत्र्याची त्याची व्याख्या मात्र कम्युनिस्ट पार्टीच्या चौकटींत जखडलेली असणार. कम्युनिस्ट पार्टीनें घातलेल्या शिस्तीच्या ढापणांतून जें दिसेल त्यालाच तो स्वातंत्र्य समजतो.

आणि असें तिनपाट स्वातंत्र्य त्यास उपभोगावयास मिळतें हें मी नाकारीत नाहीं. पण त्या स्वातंत्र्यांत काय अर्थ आहे? तुरुंगांतल्या कैद्याला देखील आपल्या कोठडींत शतपावली करण्याची मोकळीक असतेच कीं! पण म्हणून कांहीं त्याला कोणी स्वातंत्र्य म्हणत नाहीं.

पोलोव्होयला लिहिलेलें पत्र अनुत्तरित कां राहिलें त्याचा कयास बांधतां येण्यासारखा आहे. सोव्हिएट यूनियनमधील त्याचप्रमाणें त्याबाहेरील जगांतील कम्युनिस्ट लेखक माझ्यावर हवी तशी टीका करतील— त्यांना तसें करणें भागच आहे. पण त्यांनासुद्धां माझ्या पत्राला उत्तर कां मिळालें नाहीं, याची पूर्ण जाणीव आहे.

माझें पत्र अनुत्तरित राहाण्याचें मुख्य कारण हेंच आहे कीं, मीं स्वातंत्र्याचा लाभ करून घेतला आहे. आणि ते मात्र अद्याप बंधनांतच पिचत पडले आहेत. अमेरिकेंतील लोकशाही पूर्णावस्थेला पोहोंचली आहे असें मुळींच नाहीं. त्यांतील उणिवा दाखविणारीं अनेक पुस्तकें आजवर लिहिलीं गेलीं आहेत. आणि पुढेंहि लिहिलीं जातील. पण इतकें मात्र खरें कीं, अमेरिकेंत व्यक्तीचें स्वातंत्र्य मान्य केलें जातें. त्याच्या अधिकारावर अतिक्रमण केलें जात नाहीं. आणि त्याला संरक्षणाची हमी दिली जाते.

मानवाच्या उज्ज्वल भवितव्यासंबंधीं कांहीं बोलण्याचा निकिता क्रुश्चेव्ह किंवा बॉरिस पोलोव्होय यांना काय अधिकार आहे? इतिहासानें आपणा सर्वांना एक धडा शिकविला आहे. आणि तो हाच कीं, ज्या देशांतील व्यक्ति

भीतीनें पछाडलेली असते— मग ती भीति राजाची असो, राज्यसंस्थेची असो कीं एखाद्या पक्षाची असो— आणि त्या भीतीमुळेंच अपमानास्पद नियंत्रणा-पुढें मान तुकवून स्वतःची अवहेलना करून घेत असलेल्या त्या देशाचें भवितव्य उज्ज्वल कोठून असणार ? तें निश्चितच काळेंकुट्ट आणि अंधःकारमय असणार !

कम्युनिस्ट पार्टीचें स्वरूप पूर्वीं कधीं काळीं कसें असेल तें असो; आज तरी कम्युनिस्ट पार्टी हा व्यक्तीच्या आशा-आकांक्षा खुरटवून टाकणारा एक भयानक कैदखानाच बनला आहे. ज्याच्या मनगटांत तुरुंगाच्या भिंती फोडण्याची धमक असते तेच उद्यांचें भवितव्य घडवूं शकतात. शेळपट-पणानें जे त्या भिंतीलाच चिकटून बसतात त्यांच्यानें काय होणार आहे ? व्यक्तिस्वातंत्र्याचा अधिकाधिक विकास होत जाणें, आणि बुद्धिवादाची प्रभा सर्वत्र फांकणें, यांतच मानवसमाजाच्या उज्ज्वल भवितव्याची आशा सामावलेली आहे.

◎ ◎ ◎

ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
क्रम २५०८१ वि: मुंबई
ांक ११८६ नों. दि:
REFBK-0010268
१०२६८

आम्ही प्रकाशित केलेल्या कांहीं कादंबऱ्या

### ना. सी. फडके

प्रवासी ६
अंजली ६
पतंग ५
शिकार ५
इशारा ३॥
प्रवासी ( संक्षिप्त ) १।
अल्ला हो अकबर (संक्षिप्त) १॥
उद्यांची बात ३

### चिं. वि. जोशी

संशयाचें जाळें २॥
आमचा पण गांव ४

### ग. त्र्यं. माडखोलकर

भंगलेलें देऊळ ३
अरुंधती ३॥
मुक्तात्मा (संक्षिप्त) १॥

### श्रीपाद जोशी

विस्कटलेलं घरटं ३

### श्री. कृ. कोल्हटकर

श्यामसुंदर १॥

### गो. नी. दांडेकर

पवनाकांठचा धोंडी ३

### वि. वा. शिरवाडकर

कल्पनेच्या तीरावर ३

### य. गो. जोशी

साहित्यिकांची सफर १॥

### नाथ माधव

स्वराज्याचा श्रीगणेशा (संक्षिप्त) १॥
स्वराज्याची घटना ,, १॥
स्वराज्याची स्थापना ,, १॥
स्वराज्यावरील संकट ,, १॥
स्वराज्याचा कारभार ,, १॥
स्वराज्याचें परिवर्तन ,, १॥
स्वराज्यांतील दुफळी ,, १॥

### खलिल जिब्रान

तुटलेले पंख ३

### मामा वरेरकर

धांवता धोटा (संक्षिप्त) १॥

### ना. ल. वैद्य

प्रवाहाचीं वळणें ५

### यादवेन्द्र शर्मा चन्द्र

पुनर्मीलन ३

### वि. वि. बोकील

बेबी २

### ना. वि. बापट

पानिपतची मोहीम ५

### भा. ब. बोरकर

भावीण ४

### रामतनय

प्रमिला बेन ४

### रमाकांत वेलदे

भूक ४

कॉन्टिनेन्टल प्रकाशन